. सं. ठाणे
विषय
सं. नं.
१९८८

म. ग्रं. सं. ठाणें

| विषय | लेखक |
| --- | --- |
| संग्रहालय क्रमांक | पुस्तकाचें नांव आ। आ। ३ । ती |

सन

३५०

४२

नाटक

श्री

# बालशिवाजी नाटक

सीताराम नरहर ढवळे
यांणीं
करून

तें
रत्नागिरी
येथें
जगन्मित्र छापखान्यांत छापून
प्रसिद्ध केलें.

सर्व प्रकारचे हक्क
मालकानें आपलेकडे ठेविले
आहेत.

कि० ८ आणे.

ता० १९ मे १८८४.

## प्रस्तावना.

ज्या भाग्यशाली आणि वीर पुरुषाचे पराक्रमानें संपूर्ण महाराष्ट्री यांस पृथ्वीभर विख्यात केलें; ज्यानें आपल्या युक्तिबळानें व बाहुबळानें मदोन्मत्त झालेल्या यवनांस जेरीस आणिलें; ज्याच्या अपूर्व चातुर्यानें मोठ मोठे बादशहां ही धाक पावले; जो आह्मा महाराष्ट्री यांचा केवळ प्रिय प्राण; जो स्वदेश धर्मोद्धारार्थच अवतरला; त्या परमवंद्य व सन्मान्य शिवरायाचें चरित्र यथामति वर्णावें अशी मनांत उत्कट इच्छा उद्भवली. याचें कारण काव्येतिहास संग्रहांत त्यांची बखर छापिली आहे, व " राजा शिवाजी " या नांवाचा ग्रंथ कुंटे यांणीं केला आहे--तसेंच शिवाजीकाव्य ह्मणून एक ग्रंथ लेले यांणीं केला आहे, या सर्वांवरून आपण ही तसें एक अल्पसें नाटक रचावें अशी इच्छा झाली; परंतु कोणतेही पुरुषाचें चरित्र लिहिण्यास त्याची व त्याचे संबंधी यांची माहिती असावी लागते; या शिवाय त्या वेळची देशस्थिति, लोकस्थिती व धर्मस्थिति हीं ही ठाऊक असलीं पाहिजेत. त्या सर्वांचा अभाव असतां ही केवळ मनीषा तृप्त करण्या करितांच हें काम हातीं घेतलें.

आलिकडील ग्रंथांत प्रस्तावना मोठाल्या असतात व मोठी प्रस्तावना लिहिण्याचा मख्य उद्देश जो पुढील कथानकांत जें सांगितलें आहे, त्याचा सारांश लौकर ध्यानांत यावा, तो समजण्यास जेव्हां बराच मोठा ग्रंथ असावा तेव्हां उपयोगी. तसा प्रकार एथ नाहीं. आमच्या परमपूज्य शिवरायाचें वर्तन लहानपणापासून कसें होतें याचें फक्त दिग्दर्शन करण्याचा हेतु या अल्प ग्रंथांत असून हा शेवट पर्यंत वाचला तरी या पुढें आणखी कांहीं तरी याचा भाग असावा एवढें लोकांच्या अंतःकरणांत रहावें असाच उद्देश आहे.

फक्त बाळपण सांगण्यासाठीं हें पुस्तक तयार केलें असून त्याच्या ( शिवरायाच्या ) मनांत ठसलेली स्वदेश धर्मप्रीति व तिच्या योगानें त्यानें केलेली लीला ही दुसरे पुस्तकांत---तरुण शिवाजी नाटक यांत---सांगिली असल्यामुळें या पुस्तकाची अपूर्तता राखिली आहे.

संविधानकादि चातुर्य, पात्रापात्र योग्यता, रसाविर्भाव इ० अंतरंगें आणि भाषा सौंदर्य, व्याकरणशुद्धि, ग्रंथरचनापाटव इ० बाह्यांगें हीं जीं ग्रंथाचीं मुख्य लक्षणें त्यां विषयीं हें पुस्तक रचणारा अगदींच अनभ्यस्त आहे, तथापि सारग्रहणार्थ प्रार्थना साविनय करीत आहे.

आमच्या नाटकनायकानें अगदीं रानटी परंतु साळे भोळे अशा मावळे लोकांचीं वेडीं वांकडीं भाषणें जशीं गोडीनें ऐकिलीं तशींच यांतील रसज्ञ लोकांनीं ऐकावीं (... दृष्टांत सांठवावीं ) व ऐकिल्याचा उद्गार लोकांत प्रकट केला तर तेवढ्यानेंही पुस्तकाचा श्रम सफल झाले असें मानील.

ठिकाण

आ...

जवळ...

# वाल शिवाजी नाटक.

## अंक १.

## स्थळ—देवडी.

( हैबती आणि जगू. )

है०—काय व जगवा, आल्याड तुमी पइल्यावानी येत जात न्हाई! का रागबीग आलाया जनू?

ज०—न्हाइव हैवतराव! राग मजी कसला खोम्हाइतच न्हाई पन वगा अक्शी मजीअवशी येळच न्हाइ मिळत न् काय!!

है०—ऑ? आन् कसलत्ये काम? काय राव सांगतायसा!

०—व्हय व्हय! तुमावानी खुइयाल पडलत हातपाय तानुन देवडीव—!यील येळ तवा वसल उटून जाल आन् काय! तस का आमच हाय? वगा, ह्ये ह्माराजाला संवाळता संवाळता पुरपुर व्हतया! खोड्या मजी किती? दांडगावाबी तसाच! नाचन, उड्यामारन त—लईच!! वगा दादा, याक खिनभर सवस्त वसायच न्हाइतच. हाकड चल, तकड चल; ह्ये घोड्याव—वसव, ये घोड्याव वसव; वगीतल हरनलागलपाटी; वाग वगितला धावल त्येवर!! काय ह्मनाव? हा हा हा ह्मटल तरिवी न्हाइच ऐकत. भ्या ह्मनून कसल ते—! आमचीनी लकवाची त—वगा धिंड धिंड काडत्यात!! ज्येवनखान काइवी सुचू देत न्हाईत. आल मनामधी का लागल रातीच पळाय! आसा काय जीव तरासलाय. पन दादा, जरी मारत्यात ठोकत्यात तरी मायावी तसीच करत्यात! कल हरनामाग धावत व्हत, आन् खाल सपश्याल पडल. मी व्हतोच जवळ, लगच धरल; तरिपन वाइच कपाळाला लागल त्येची. आन् माला वगा त्ये—(दाखवतो) दगोड लागुनशान खाक पडलिया. लगच वगा आदी माज्या खाकत कायस आनुन घातल नी पटीवी मारली; आन् मंग आपल्या लावली. ता... आसल ह्मनुन मायाळू व्हायाच न्हाइत! ह्मनुन वगा काइवी झालतरि—

है०—खरच हाय. मागलोर वगायचच न्हाइत. पन वावा, ह्ये त्येच करन दादासावाला न्हाइ आवडत. पन करत्यात काय? वोलत्यात वोलत्यात झाल. तरी पन त्येच्याह्मोर म्हाराज योकबी सवद न्हाइ काडीत वर! जरा रागावलस दिसल का मांडीव—जाउन वसत्यात, आन् दादासावाच्या गळ्याला घट मिटी घालत्यात—मंग कसलाबी राग आसला तरी काय करनार? वगा हिकमती मोट हाईत!

ज०—(पाहून) उटा उटा राव, त्ये वगा समूर—

है०— व्हय व्हय. जगवा चला चला. दादासावनी म्हाराजवी—( जातात )

## प्रवेश २.

## स्थळ—खोलीचा पुढचा भाग.

( दादोजी व शिवाजी )

दा०—शिवबा, कालरात्रीं फारवेळ पर्यंत मातोश्रीचें व तुझें कसलें बोलणें चाललें होतें?

शि०—आजोबा—(पुढें कांहीं नबोलतां उगाच रहातो )

दा०—(कुरवाळून) कां रे बा अडलास कां? बोल कायतें.

शि०—मी काल जरा दौलत्यावर—

दा०—बोल बोल कायतें. दौलत्यावर काय?

शि०—नाहीं—ह्मटलें—जरा रागावलों ह्मणून आई मजवर रागावली!

दा०—तें कां बरें? सगळें सांग पाहूं.

शि०—तो मजकडे आपला उगाच येत होता कांहीं बोलण्यास, त्याला दौलत्यानें जाऊं नको आंत ह्मटलें, तें मीं ऐकलें.

दा०—तो कोण आला होता?

शि०—तो आपला तानाजी.

दा०—मग तो आंत आला होता?

शि०—दौलत्या त्याला सोडीना तेव्हां मीं त्याला ह्मटलें, कीं तो मजकडे येत असतां कधींच अडवूं नको. तेव्हां तो म्हणाला —ह्मणून मला राग आला.

दा०—काय म्हणाला दौलत्या?

शि०—" त्यो उनाड प्वोर हाय, आन् दांडगा बी. त्येच्या येन्यान आपुनबी तस व्हाल"

दा०—( किंचित् हंसून ) हं! शिवबा, तुला नाहींकाय वाटत तसें?

शि०—लोकांना तो कसा वाटत असेल तो असो, मण मला तर भारी आवडतो!

दा०—(यट्टेनें) ठीकचतें! " जशास तसा भेटे आणि मनचा संशय फिटे," अशी म्हणच आहे. बरें असो; मग त्याच्या तुमच्या कसल्या गोष्टी चालल्या होत्या.

शि०—दुसरें कांहीं नाहीं. तो म्हणाला—

दा०—असें वरचेवर अडखळूं नको. बोल पाहूं.

शि०—तो—म्हणाला—"आमचा मामा दांडपटा, भाला वगैरे चांगला खेळतो; आणि मला म्हणतो कीं तूं शीक. तेव्हां मी म्हटलें—आमच्या शिवरायालाही शिकवाल काय? त्यानें होय म्हटल्या वरून लगेच हा मी तुजकडे धांवत धांवत आलों, तर चल येतोस काय? "

दा०—मग तुम्हीं काय सांगितलें?

शि०—मी म्हटलें. मी काय आपल्या—?

दा०—(भाव समजून हर्षानें) अहाहा!! समजलों. मग तुम्हीं शिकणार काय? असलास तर सांग, म्हणजे त्याला वाड्यांतच आणून ठेवतों.

शि०—( मिठीमारून ) मग तर फारच मौज होईल!

दा०—बरें तर चल, त्याची तजवीज करूं. ( जातात )

## प्रवेश ३.

## स्थळ—जिजाबाईची खोली.

( जिजाबाई व शिवाजी )

जि०—शिवबा, आज दुपारपासू तूं कुठं गेला होतास? आजोबानीं दोनदां बगायला पाठविलं होतं.

शि०—आई, रागावणार नाहींस तर सांगतों.

जि०—मी काय तुजवर दिवसभर रागावतें बरें खरें सांग.

शि०—नाहीं पण—बरें ऐक—तानाजी आणि मी मिळून तळ्याकडे हिंडावयास गेलों होतों. अंमळशी इकडची तिकडची मौज बघत होतों इतक्यांत आमचा हुसन्या धांवत व रडत आला, आणि म्हणाला त्या पलीकडच्या ओढ्यावर मी गेलों होतों तों कासम गडकऱ्यानें मला मारलें. मग आह्मीं सगळेजण जाऊन तो लेक पळत होता त्याला धरला आणि बुकल बुकल बुकलला !

जि०—अग बाई! बाळा, असं करीत जाऊं नकोहो. ते मेले द्वाड केव्हां तरी—अगदीं त्यांच्या वाटेस—

शि०—अंः त्या लेकानीं काय करायचें

जि०—नकोरे बाबा. तुला ठाऊक नाहीं. राज्य त्यांचें आहे.

शि०—(हंसून) काय? तो कासम गडकरी राजा आहे? आई, तूं वेडीतर नाहीसना?

जि०—बाळा, तसें नव्हे. त्यांच्या जातीचें आहे. आणि ते मेले दांडगे असतात, म्हणून त्यांच्याशीं कसलाच संबंध ठेऊं नये.

शि०—अगे पण आह्मीं होऊन काय त्याकडे गेलों होतों? तोच आला होता. बरें येऊन उगाच तरी—? त्यानें कां मारावें अर्धा? लेकाला चांगला ठेचायचा होता पण एक वेळ सोडला.

जि०—सोडलास तेंच चांगलं. पण संभाळहो, ध्यानांतधर मी काय सांगितलं आहे तें.

शि०—माझ्या ध्यानांत तें अगदीं बिंबलें आहे, आणि तेंही पण ठसलें आहे चांगलें!

जि०—ऑं? तें तें काय?

शि०—कांहीं नाहीं. पण ते लेक तोडगे जर आमच्या वाटेस जातील तर—असो; आई, तूं कांहीं म्हण पण मस्तवाल खरे. जरा कांहीं एवढेंसें कोणी बोललें नुस्तें तर लागलीच हंबे तुंबेवर येतात, हें मीं पुष्कळ वेळां पाहिलें आहे.

जि०—कसं जरी झालं तरी पाच्छाई त्यांची आहे, आणि कावळ्यासारखें त्यांचें आहे. एक ओरडला कीं हजारों तिथं एकदम जमतात, तसं काय आपलं आहे? आणखी कोळ्याच्या सुताच्या धाग्याला जसा अंत नाहीं, तसा त्यांच्या गोतालाही नाहीं. ते ( शहाजी ) किती भिऊन वागतात तें तुला काय ठाऊक? आजोबास विचार म्हणजे समजल.

शि०—मला नको समजायला. त्यांना पुरवत असेल. मी तर लेकांचीं हाडें मऊ करीन—हो. माझ्या वाटेला मात्र जावें त्यांनीं, मग-

जि०—( मध्येंच ) थांब थांब. उगाच असं बडबडू नको. ( इतक्यांत २ घंटा वाजतात ) शिवबा, जा तूं आतां नीज; मीही निजतें. ( जातात )

# प्रवेश ४.

## स्थळ—दिवाणखान्याची खोली-

( दादोजी )

दा०—( आपणाशीं ) असा हा एव्हांपासूनच हूड व स्वेच्छ होत चालला तर पुढें कसें होईल? समजून उमजून सांगा; धाक दाखवून सांगा; मारून सांगा तरी "राम कृष्ण गोविंदा" लहान लहान म्हणून गप बसावें तों तों ज्यास्तच बिघडत चालला. बरें याचें करणें म्हणजे अगदीं वाईट आहे असें नाहीं; पण माझे जिवास हा मोठा घोर आहे. एक दोन दिवसांनीं एक दोन दिवसांनीं मुसलमानाच्या पोरांचे आणि याचे तंटे आहेतच. किती तरी त्यांची समजावीशी करावी? शहाजी राजाचा जरी मजवर पूर्ण भरंवसा आहे तरी—हे बोवा तर महाव्रात्य, या परीचे! आईचे लाडके. माझा म्हणजे लाडका नाहीं असें नाहीं. मला माझ्या मुलांपेक्षां ही ज्यास्त आवडतो ह्मटलें तरी चालेल! पण याच्या या हूडपणास आणि दाडगाईस काय करूं? बरें दांडगाईंत तरी चमत्कार हाकीं नसतेंच खुसपट काढून मुसलमानांच्या पोरांस ठोकतो! आपल्या मंडळींतल्या लोकांस कांहीं बोलत सुद्धां नाहीं!! हें एव्हां बरें दिसतें, पण विकोपास जाण्यास काय उशीर आहे? एकादे वेळेस याच्या जिवावर सुद्धां बेतेल. हा ते दिवशींचाच प्रकार कसा झाला होता? कठीणच आली होती वेळ, पण ईश्वर कृपेनें निभावली इतकेंच. कसा मला दोहीं कडून पेंच आला आहे? बाहेर जाऊं नको ह्मटलें तर, माझ्या तोंडावर नाहीं जात ह्मणतो, आणि रात्रीं बे

 

साबालानी आईसाबाला खबर लागुन आ ल्याकी धावतचन् काय!!

रा•—मग त्येनी काय क्येल?

ज•—दादा, तुमी लई घाई करताव—आयका त—खर. दादा साबानी लाल इंगलावानी डोळ केल, आन् घेतली छडी हाततन् काय! काय इचारता ती येळ!!

रा०—त—मंग आनकीबी मारच बसला?

ज•—न्हाइजी. तुमीत—लई—!दादासाब माला मारनार इक्त्यांत बगा--हा हा! [ देवा त्येच वर कर ] म्हाराज धावत धावत येऊन बगा दादासाबांच्या हातची छडी वडून घ्येउ लागल. त्येवा त्ये म्हनाल. " शिवबा दम धर, ह्या लेकाला भारी मस्ती आली आहे, त्याला चांगली शिक्षा केली पाहिजे आणि मग हकून दिला पाहिजे. " [असें म्हणून डोळ्याने पाणी काढतो.]

रा•—ऑ ऑ? ह्येर काय? त्येका, काय आता आल्यात का मारायला?

ज•—तुमाल्ही काय ठाव ती येळ?

रा•—बर. म्होर सांगत—खर.

ज०—व्हय. तवा म्हाराज म्हनाल—" जग्यानें कांहीं केलें नाहीं, उलटें मला न लागावं म्हणून त्यानें आपणास मात्र पुष्कळ इजा करून घेतली, म्हणून त्याला कांहीं बोलू देखील नका." तरी दादासाब म्हनाल—" पण त्याची खोड एरव्ही जाणार नाहीं यासाठीं त्याला एक वेळ चांगली शिक्षा केलीच पाहिजे." मंग बगा—[गहिंवरून] म्हाराजानीं—[ बोलवत नाहीं ]

रा•—[अमळशानें] मंग काय केल म्हाराजानी?

ज•—[डोळे व हात वर करून ] ह्ये देवा परमेसरा, त्या म्हाराजाच न्हेमी कल्यान कर!! दादा, तवा म्हाराजानी आपली पाट केली म्होर आन् म्हनाल--देवा देवा!! काय मायाती!!! बगा दादा, त्येच्याकड पाट करून म्हनाल—"हीच जग्याची पाट समजा. " हार हार!! परमेसरा!!! काय त्येच थोरपन दादा?

रा•—[गळादाटून] मा बाप वर बांवा त्यो!! असा परानी कोन व्हनार? बग, त्येच नावासारक करनं! भोळा माबाप सांब खरा!!!

ज•—[हर्षानें] दादा, समद्याल्ही म्होट नवाल वाटल! दादासाबानी हातची छडी दिली फेकुन आन् म्हाराजाला—घट घट पोटाशी धरल!! तवा बगा, त्येच्या डोळ्यातन येक सारक पाणी व्हात व्हत!!!

जया•—(मोठ्यानें) देवा, त्या माज्या न्हानग्या धन्याला उदंड औखवंत कर! आन् माजबी औख द्ये त्येला!!

ज०—दादा, त्या माज्या धन्यासाटी माजा परान गेला तरी सातिकच व्हयील.

रा•—त्ये काय सांगाय हाव? बर आता लई येळ जाला त—जा तू जरा पड जा; मी आनकी च्यार घडीभरन यीन.

ज•—बर हाय. पन दादा या बरका! म्हाराजाच्या आनकीबी काई आसल्याच गोस्टी सांगीन.

रा•—व्हय व्हय. चल तर. ( जातात )

## प्रवेश ६

## स्थळ—एकांत खोली.

( जिजाबाई )

जि०—(आपणाशीं) आतां या शिवबाच्या गाऱ्हाण्यास आणि खोड्यांस काय तरी करूं? रोज रोज नवीं नवीं येतात! दाप दडप तरी किती ह्मणून! आतां येऊन जाऊन कायतें दोन काठ्या ओढायच्या राहिलें, बाकी सगळं झालं. कृष्णाच्या खोड्यांनी

रात्रींच जातो! बरें बरोबर तरी मोठें कोणी? येऊन जाऊन कायतो तान्या! पण तो त री पोरच. माझ्या जिवाला रात्रंदिवस कशी खुरखूर लागली आहे, ती सांगतां येत नाहीं. तिकडे (शाहाजीकडे) लिहावें तरी उपयोग नाहीं. इकडे तर हें असें! आईतो आई जगदंबाच!! असो धीर सोडून कांहीं होत नाहीं. एरव्हीं त्याच्या गुणास मोल नाहीं! कोंवळें झाड आहे, वळण्यास हरकत नाहीं. (कोणी दारवाजाविर्षेसें ऐकून) कोण आहे तें?

लक्षी०—(पुढे येऊन) आईसाब हटकत्यात.

दा०—हं. कांहीं तरी—असो; चल. (जातात)

## प्रवेश ५.

## स्थळ—गल्लींतील एक घर.

(राणोजी, जया, जगू)

रा०—जया, आग जया.

ज०—(बाहेर येऊन) या की दादा आमदी.

रा०—व्हय. येतो पन, ख्येच कस हाय? कलच्या परास काइ कमी?

ज०—काय म्हन्न्यासारक न्हायीं—दादा. (रडूं लागते)

रा०—चि:! जया, तू काळजी नग करूं. बग, आजच गुन पडला हान.

ज०—खर काय व दादा! तुमच्या पायाच्यान् बगा, ख्ये दिसापास्न आन म्हंजी इस (पुन: रडूं लागते)

रा०—गपऱ्हा म्हनतोनी चल आमदी.

(नग नग आत मीच येतों भाईर असें म्हणत जगू येतो)

ज०—(लगडत लंगडत येऊन) दादा——

रा०—कशालार भाइर आलास? वारा न्हायीका लागायचा!

ज०—दादा, आमदी बगा अक्शी चैन न्हाइपडत. कुनी कुनी न्हाइ फिरकत हाकडन् काय! दादा, तुमीं त्येवढ दिसातन ख्याप घालता.

रा०—बर ख्ये आसुदे. पन आज कस वाटतय? जरा बर हाइस वाटतय! नीज लागली व्हती जनू?

ज०—व्हय दादा व्हय. फाट फाट दोन घर्ड. पन बगा लई ठेयजार केल.

रा०—(अंग पाहून) बिऱ्हा, काय थोड लागल हुत? बरत—बर. त्येका, ह्या जईच कुकूवळकटन् काय!

ज०—खर दादा खर. पन दादा, म्हाराज म्हनून काय सांगू!

रा०—ख्ये काय र?

ज०—बगा, म्हान खर, पन काय बुद! माया म्हजी किती! (डोळ्यांतून पाणी काढतो) दा—दा—दा—म्हा—म्हाइ——

रा०—(थांबून) आर, पन आस काय जालं? म्हाराजानी मारल बिरल काय?

ज०—[डोळे पुसून] चि: चि: दादा, बगा म्हाराजा सारका म्हातमा पुरूस इरळा.

रा०—[चकित होऊन] काय कायर, आस काय तरी त्ये?

ज०—बगा, त्येंच्यासाटीं दोन च्यार येळ माला बोलुन घ्येव लागल, इकतच न्हव; पन दादा मारबी घ्येवा लागला.

रा०—मंग यामदी काय त्येका जाल?

ज०—दादा, तस न्हव. आयका आदी. त्येना सावरन्या करता ह्ये माज सगळ आंग उराडल आन् बगा रगात बंबाळ जाल. तरिबी तसच त्येस्नी उचलुन वाड्यांत न्हेल. छि दादा—काय इचारता तवा? समद माझ्या भोती जमलन् काय! माला वाटल का आज माज भरल. इवत्यांत दादा——

जशी यशोदा तशी मी अगदीं त्रासले. कुठवर तरी समजावशी करूं! आजोबा देखील टेकीस आले. आज समजल, उद्यां समजल, पुन्हा करणार नाहीं म्हणावं तर ज्यास्तच! माझं सगळ सुख काय तें हेंच. याच्या जिवावर मी. पण एकाद वेळेस याच्या क्रित्यान—देवा, आई जगदंबे, तूं तरी या माझ्या—(हुंदका येतो तो सांवरून) आई, तुळजापुरचे भवानी कांग अशी रागावलीस! माझ्या शिवा सारखं मुलगं मिळायचं नाहीं; पण खोडकर भारी याच्या खोड्यांचं भय भारी वाटण्याच कारण मिळून एवढंच कीं, त्या मेल्या नोकऱ्यांबरोबर रोज भांडण. आपल्या लोकांना नाहीं हो हात दिखील लावायचा!! ( आठवलेंसें करून ] हो, ते दिशीं तो मेला आमद्या, कसा याच्या आंगावर चवताळून आला होता! तेवां जवळ आवा होता म्हणूनच—हें सगळं आठवलं म्हणजे; नाहीं तर त्याचं गाऱ्हाणं आलं म्हणजे वाटतं कीं एक चांगली तोंडांत द्यावी, नाहीं तर एक काठी ओढावी! पण अग बाई! कसं बरं माझ्यानं तसं करवल? तोंड दिसलं पुरें कां गेला मेला सगळा राग!! [ कोणी आलेंसें वाटल्यावर] कोण आहेतें?

लक्षी०—[ पुढें येऊन ] पुराणिक बावा कवाच येऊन बसल्यात.

जि०—खरंच काय? मला आठवणच राहिली नाहीं! चलतर. [ जातात ]

## प्रवेश ७

## स्थळ—माडीवरील खोली.

"दादोजी, व शिवाजी"

दा०—शिवबा, तुला कोणतीही एकादी गोष्ट सांगितली म्हणजे ती तूं चांगली लक्षांत धरून तसें वागतोस, हें चांगलें. पण एवढें कसें विसरतोस?

शि०—काय बरें तें? माझ्या ध्यानांत नाहीं आलें.

दा०—बाकीचें मात्र लौकर ध्यानांत येतें, आणि हें एवढच कसें येतनाहीं? तुला कितीवेळ बरें सांगितलें, कीं आपल्या घरीं कोणी परकी मोठा, सभ्य माणूस आला तर त्याला अगोदर, रामराम, सलाम वगैरे ज्यास जें योग्य तें करावें. कांकीं हा त्याचा मोठा मान होय. शिष्ट सांप्रदाय असाच आहे.

शि०—आजोबा, आपल्या सांगीप्रमाणें मी तसें करीत असतों असें मला आठवतें. कोठें घसरलों असल्यास—

दा०—तुला सर्व ठाऊक आहे. ऐक; परवां महाराजांचे (शहाजींचे) परम दोस्त रणदुल्लाखान आपल्या एथें आले होते.

शि०—होय, आले होते. आणि त्याचा यथायोग्य सत्कार झाला असें सर्व लोक म्हणतात, इतकेंच नव्हे तर तो देखील "खूष झालों" म्हणाला. त्याच्या सत्कारांत कांहीं कमी पडलें नाहीं.

दा०—अरे, बाकीच्या संबधानें सर्व ठीक झालें.

शि०—मग कमी कोणाच्या?

दा०—तुझ्याच संबधानें कमी पडलें.

शि०—(चकित झालोंसें दाखवून ) आं? काय माझ्या? तें कसें? मजकडे काय होतें? सर्व आपणाकडे आहेच!

दा०—अरे, तसें नव्हे. ते प्रथम आले, त्यांचा सत्कार नीट झाला, हें खरें, पण तं त्यांस येण्याबरोबर सलाम केलास काय?

शि०—हां हां! हें काय? कदाचित विसरलों असेन.

दा०—( हसून ) ठीक! एवढें वरें विसरलास!

शि०—मग त्यावद्दल त्यास काय वाईट वाटलें? वास्तविक तसें वाटण्याचें कारण दिसत नाहीं.

दा०—तुला कोणी मुजरा किंवा जोहार केला नाहीं तर तुला वाईट नाहींकाय वाटणार?

शि०—माझ्यापेक्षां कमी दर्ज्याचे मनुष्यानें नकेल्यास वाटेल.

दा०—सत्कार करणें तो अगोदर कमी दर्ज्याचे मनुष्याकडूनचना?

शि०—हो.

दा०—मग तूं त्यांचेपेक्षां कमी दर्ज्याचा नाहींस काय? महाराज त्यांच्या हाताखालचे आहेत. आणि ते देखील त्यास सलाम करतात. आम्हीं नाहीं काय सर्वांनीं केला?

शि०—ते ( शहाजी ) करतात ह्मणून आपण करतां, आणि आपण करतां ह्मणून आवा वगैरे सगळे करतात. तर्थिरूपांपेक्षां त्याचा दर्जा ज्यास्त असें मला वाटत नाहीं. वादशाहाच्या जातीचे ते खान ह्मणून वरिष्ठ एवढेंच. बाकी कर्तबगारीच्या नांवानें—

दा०—तें असो, पण सलाम करणें तुला योग्य होतें, कीं नाहीं? तूं न केल्यामुळे त्यांचा अपमान केलास असें होतें.

शि०—पूज्यभाव किंवा प्रेमभाव ज्या ठिकाणीं उत्पन्न होतो त्यास तसें न केल्यावद्दल मात्र अपमान केलासें होईल असें मला वाटतें. आणि जर हें खरें आहे तर मी केलें तें अयोग्य नसावें.

दा०—तुझी बुद्धि कोंवळी आहे. तूं ह्मणतोस तें खरें, पण थोर पुरुषाचा सर्व लोकांत तसा स्पष्ट अपमान करणें योग्य नव्हे. शिष्टाचारा प्रमाणें वागणें हेंच योग्य. असा एकाद्यानें तुझा चौघांत अप केला असता तर तुलाच कसें वाटलें अ .तें? तर जसें आपणास वाटतें तसेंच इतरांस वाटत असेल असें कां मानूनये?

शि०—मी सर्वांचा उपमर्द करतों असें वाटतेंकाय?

दा०—मी तसें ह्मणत नाहीं. आणि आजपर्यंत असें पाहाण्यांतही फारसें नाहीं. तरी मागें सिंहगडचे खान आले होते, तेव्हांही असेंच. पण तेवेळीं तूं फारच लहान होतास ह्मणून शोभलें. आतां ठीक दिसत नाहीं.

शि०—( ...नवुजलेसें करून ) ह्या नोडग्यानां सलाम करायचा? अं! झालें तें झालें. आणि पुढच्या पुढें. (आठवलेसें करून ) हो. पुराणिक बोवा आल्याचें मघाशीं गोविंदानें येऊन कळविलें आहेना?

दा०—[ हंसून ] समजलों! पण संभाळ, ध्यानांत धर, चल आतां. ( जातात )

## प्रवेश ८.

## स्थळ— पुराणाची जागा.

( शिवाजी, रावजीपुराणिक, तानाजी )

शि०—(नम्रतेनें) काल आपण सांगितलें होतें कीं, पंचतंत्रांतील कांहीं भाग सांगूं. तर—

रा०—ठीक आहे. सगळा भाग सांगण्यास बरांच वेळ पाहिजे, करितां प्रथमतां पुत्र कसा असावा तें सांगतों. पंडित ह्मणतात.

श्लो० भुजं०

गृहस्थाश्रम्याला सुतावीण नाहीं,
गती बोलती थोर ऐसेंचि पाहीं ॥
पुरा[१]राघवें[२] यज्ञ केला तदर्थ[३]
नकीं नाहला कोण ते[४]णें कर्तार्थ[५]॥१॥

---

१ पूर्वी. २ दशरथानें. ३ तत् अर्थ ( पुत्राप्राप्ती ) ४ यज्ञानें. ५ पूर्णमनोरथ,

द्रौपदीं ह्मणजे क्षणोक्षणीं दुःख होतें. हा अनुभव सर्वांस थोडा बहुत असतोच. तेव्हां वंशाला भूषण होण्याचें राहून जर कलंक लावणारा झाला तर त्यापेक्षां, पंडित ह्मणतात, असें बरें—

श्लो० शार्दू.

गर्भश्राव बरा असंगाहि बरा होऊन
मेला तरी ॥ कन्या होय बरी तशीच
अथवा वंध्याहि भार्या बरी ॥ गर्भी
गर्भ जिरे वसे तरिबरा वांचून लोकीं
जरी विद्या शौर्य व दान्यतादि
सुगुणीं नायुक्तसूनूतरी ॥ ६ ॥

अहाहा! काय सांगावें कीं—गर्भश्राव ह्मणजे गर्भगळून पडला तो बरा किंवा मुळीं स्त्रीशीं संगच केला नाहीं तोहि बरा! बरें कदाचित् गर्भ राहून पतन न पावतां उपजतां क्षणीं अथवा वर्ष सहा महिने वांचून मेला तरी बरा. असेंहि न होतां कन्या झाली तरी बरी; अथवा बायको वांझ राहील तर फारच बरें! गर्भ जिरला किंवा तिर्येच तो चिरकाळ राहिला तरी बरा; परंतु वांचून जो ज्ञानानें, शौर्यानें, दातृत्वानें, किंवा दुसऱ्या अशा कोणत्याही सद्गुणानें जर तो युक्त न होईल, तर वरील सर्व प्रकार चांगले!!

ता०—( शिवाजीची चमत्कारीक आविर्भावयुक्त झालेली वृत्ति पाहून ) शिवराया, पुराण अद्यापि आटोपलें नाहीं, पुढें ते आणखी काय सांगतात तें अर्धी नीट ऐक.

शि०—( भानावर येऊन ) तानाजी, मी काय ऐकत नाहींसें तुला वाटतें? माझें सारें लक्ष ते काय सांगतात तिकडेच आहे. चालूंद्या.

रा०—शिवराज, माझ्या भाषणानें आपलें हृदयांत काय होत आहे तें मी जाणिलें! आपण अल्पवयांतच असे समंजस पाहून कोणास प्रिय होणार नाहींत? असो; ऐका—

गीति.

ज्याच्या नामें कैठिनी, न प्रथमपडे
सुयोधैगणनांत ॥ त्याची माता
सुतिनी, तरि वंध्या कोणती मग
जनांत ॥७॥

कवि ह्मणतात—महावीरांची मोजदाद करतांना ज्याचें नांव प्रथमतांच येत नाहीं, त्याची आई जर पुत्रवंती ह्मणावी तर मग वांझ ती कोणती? ह्मणजे काय कीं ज्याचें नांव सर्व जनांत गाजतें असा पुत्र असावा!

शि०—( सवीर्य ) तानाजी, ऐकिलेंसना? हें नीट ध्यानांत धरहो!

ता०—( आवेशानें ) तर काय मुतांत माशा मारणारे होऊं कीं काय?

शि०—( हर्षानें ) शाबासरे शाबास!! [ पाठ थोपटतो ] आजचा भाग फारच नामी निघाला! नाहींबरें तानाजी?

ता०—मला वाटतें—बरें असो चालूंद्या अर्धी. हा भाग संपला नाहींना पण?

रा०—नाहीं. आणखीं थोडा आहे.

श्लो० इं०वं०

दानीं तपीं कीं प्रैधनीं धनार्जनीं
विद्ये मधें सद्यश वाढलें जनीं ॥
ज्याचें न तो मातृ मळापरी तया
जाणा असें सांगति जाणती नया॥८॥

१ गळणें. २ उदारपणा.

१ करांगुळी. २ महावीरांच्या मोजदादीचे वेळीं. ३ युद्धांत. ४ धन अर्जन=द्रव्य मिळविण्यांत.

अर्थ—स्त्रीसहवर्तमान राहून, अतिथि, अभ्यागत शिष्ट, मित्र, इत्यादिकांप्रत, अन्नादिकेंकरून तृप्त करणारा जो, तो गृहस्थाश्रमी होय. त्याला पुत्र झाला नाहीं तर स्वर्गप्राप्ति होतनाहीं, असें थोर थोर लोक ह्मणतात. आणि हाच आशय समजून पूर्वी दशरथानें पुत्रकामेष्टी नामक यज्ञ केला; तो केल्यावर पुत्र व्हायचाच. आणि मग तेणें करून कोणवरें धन्य होणार नाहीं? वंशाची अभिवृद्धि व्हावी एतदर्थंच पुत्र झाला पाहिजे असें नाहीं. तर—

**गीति.**

देवांचें यज्ञानें, फिटे ऋर्षीचें जलार्पणें
तनुजा॥ उपजवितां पितरांचें, जें असतें
जन्मतांचि ऋण मनुजा ॥ २ ॥

मनुष्य उपजतांच त्याला देवांचें, ऋर्षीचें आणि पितरांचें ऋण असतें, तें फेडलें पाहिजे. आतां तें कशानें फिटतें? तर यज्ञ केले असतां देवांचें; दररोज ब्रह्मयज्ञ ह्मणजे जलार्पण, येणें करून ऋर्षीचें, आणि तनुज म्हणजे मुलगा उत्पन्न झाला असतां पितरांचें ऋण फिटतें.

शिवराज, पंडित पुत्राचीं लक्षणें सांगतात—

**गीति.**

तारुण्यरूपयुक्ता, विशालकुलसंभवा[१]
प्रजापरिजे[२] ॥ विद्याहीना शोभे, नच
गंधरहित[४] सुकिंशुकीं समजे ॥३॥

म्हणजे तारुण्य आणि सुस्वरूप यांणीं करून युक्त, तशीच थोर कुळांत उत्पन्न झालेली अशी जो प्रजा म्हणजे पुत्र तो जर विद्याहीन म्हणजे ज्ञान रहित आहे तर तो शोभत नाहीं म्हणजे त्याला कोणी मान देत नाहींत किंबहुना विचारीत सुद्धां नाहीं. यास दृष्टांत-किंशुक म्हणजे पळस हा फुलून लाल होतं परंतु वास नसल्यामुळें त्याला कोणी त विचारतो काय?

शिवराज, विद्या ह्मणजे ज्ञान. तें कोणतें णाल तर ज्या कुळांत आपण उत्पन्न झा तें कुळ ज्याच्या योगानें उन्नतीस पावेल तें. आणि या ज्ञानानें युक्त होईल तरच तो पुत्र योग्य. ह्मटलें आहे—

**श्लोक अनु०**

वंशावतंस[१] जो झाला जाणा तो
एक जन्मला ॥ परिवर्ति[२] प्रपंचीं या
झाला मेला न कोण तो ॥ ४ ॥

पाहा—आपल्या वंशांत जो अवतंस ह्मणजे श्रेष्ठ झाला, तोच एक मनुष्य जन्माला आला असें समजावें. नाहींतर वारंवार फेरे फिरणारा जो प्रपंच ह्मणजे जन्ममरणप्रवाह यांत कोण उपजला नाहीं व कोण मेला नाहीं?

पुत्रांत प्रकार तीन आहेत—एक न झालेला, दुसरा होऊन मेलेला आणि तिसरा जगून मूर्ख असलेला. यां विषयीं ह्मणतात—

**गीति.**

पहिले दोन बरे बहु, अजात मृत
मूर्ख या तिघांमाजी ॥ कीं एक वेळ
दुःख परि तिजा पदोपदीं भाजी ॥५॥

अजात—न झालेला, मृत—मेलेला, अ जगला परंतु मूर्ख निघाला तर अशा पुत्रांमध्यें पहिले दोन—अजात व मृत—बरे. वा कीं आठवण होईल तेव्हां मात्र त्याच्यामुळें दुःख होतें, पण या तिसऱ्या बोवामुळें?

१ पुत्र. २ उत्पन्न. ३ संतती. ४ वास. ५ पळसाचें झाड.

१ वंश अवतंस=कुळश्रेष्ठ. २ पुनःपुनःयेणारा.

दान करण्यांत, तप करण्यांत, युद्ध करण्यांत, न्यायानें द्रव्य मिळविण्यांत, किंवा विद्या करण्यांत ज्याचें उत्तम यश या लोकांत पसरलें नाहीं तो मातेच्या उदरांतून पुत्र नव्हे तर मळच बाहेर पडला असें न्याय जाणणारे ह्मणतात. तसेंच—

गीति.

शतमूर्खा परिस वहू, बरवा एकचि
गुणी असे जो तो ॥ असती असंख्य
तारा, परितिमिरा दूर चंद्रमा नेतो ॥९॥

एका मनुष्यास शंभर पुत्र आहेत, पण एकसारखे किंवा एकापेक्षां एक मूर्ख, तर त्या सर्वांपेक्षां ज्यास एकच परंतु सद्गुणी आहे तर तो श्रेष्ठ होय. यास दृष्टांत—रात्रीं अगणित तारा उगवतात, पण अंधकाराला नाहींसा करण्याचें सामर्थ्य त्यांत नाहीं; तर तें एका चंद्राचेच अंगीं आहे.

विदुरांनीं धृतराष्ट्राला हेंच सांगितलें, कीं बाबारे या तुझ्या दुष्ट शंभर पुत्रांपेक्षां ते पांच पांडव चांगले. ते महात्मे आहेत यास्तव त्यांनां जवळ घेऊन या कौरवांचा त्याग कर. पुष्कळ पुत्र असल्यानेंच धन्यता मिळत नाहीं. पहा—

गीति.

धन्य कवण वहु तनयीं, आढ-
केसे जे भरोनि रिक्त सदा ॥
वर एक कुलालंबी, देतो
विश्रांति जो पित्यास सदा ॥१०॥

धान्य मोजावयाचीं शेर, पायली इ० मापें असतात, तीं भरलीं तरी लगेच रिकामीं होतात, त्यांत एकही कण राहत नाहीं तर तीं फक्त मोजण्यादीच्या उपयोगी! तसे "पढ पढ पढविके पण पहिले पाढे पढ पंचावन" असले काय कामाचे? एकच मुलगा, पण तो जर आपले कुळास शोभविणारा व मातापित्रादि सर्व लोकांस सौख्य देणारा आहे, तर तोच उत्तम जाणावा. (इतक्यांत पडद्यांत शब्द होतो )

" धांवारे धांवा, सांपळ्यांतून वाघ सुटून फार गडबड करतो आहे तर धांवारे धांवा. "

शि०—( ऐकून) तानाजी, ऊठ चल—आलों रे आलों—पुराणिकबोवा, बाकीचें उद्यां—हां आलों. हां हां हां! भिऊं नका भिऊं नका. ( असें ह्मणत जातात. )

## प्रवेश ९.

## स्थळ—भांग्यामारुती.

( गोविंदभट, दिनकरभट, विष्णुभट )

गो०—ए दिनकरभट, वेड्या तूं काल होतास तरी कुठें? फुकट लेकाच्या रुपाया गमावलासना?

दि०—ऑं? कुठला हो तो? काय तुमच्या घरीं कीं कोणाच्या?

वि०—अं हं:! याला कांहींच माहीत नाहींसें दिसतें. अरे पण तूं काल गांवांत तरी होतास काय अर्धी?

दि०—नव्हतों बाबा. पण कोठला रुपया? आणि असा रुपया देणार कोण?

गो०—पण तूं काल होतास कोठें?

दि०—काल मी हडपसरास श्रीधरभट मटांग्याचे घरीं श्राद्ध होतें तिथें गेलों होतों.

वि०—बरें; मिळालें काय?

दि०—अहो, श्राद्धाची दक्षिणा काय ती तुह्मांस माहीतनाहीं? तीन पैसे!

गो०—हा चांबाळा, हतभागीच तूं!

दि०—तो हो कसा?

१ अंधकाराला. २ शेर पायली इ० मापें. ३ रिकामा ४ वंश धारण करणारा ह्मणजे शोभविणारा.

गो०—काल शंभर ब्राह्मणांस दक्षिणा वाटली त्या यादींत तुझें नांव मी पाहिलें, पण तूं नव्हतास ह्मणून त्यावेळेस एक पांथस्थ आलाहोता त्यास मिळाला.

दि०—सगळें खरें, पण कोणी आणि कां वाटले रुपये?

गो०—अरे, परवांची गोष्ट तुला कांहीं माहीत आहे?

दि०—काय हो बोवा ती?

गो०—हं:! सगळ्या जगाला ठाऊक, पण या गाढवाला नाहीं! अहो विष्णुभट, कशास उगाच कपाळकूट करतां?

वि०—अरे दिन्या, लेका परवाच्या दिवशीं पिंजऱ्यांतला वाघ सुटून त्यानें काय धामधूम केली, ती तूं नाहीं ऐकली! मग पाहणार कसची!

दि०—हां हां, ती ती! त्यावेळेस मी निजलों होतों. संध्याकाळीं उठल्यावर ऐकलीखरी.

गो०—हा वेड्या! हातर कुंभकर्णाचाच भाऊ! सगळा गांव दणाणून गेला तरी तूं निजलाच होतास?

दि०—तें असो, पुढचें सांगा ह्मणजे झालें.

गो०—अरे, परवांचे दिवशीं वाड्यासमोर जें मैदान आहे, त्यांत तो सांपळ्यांतला वाघ सुटून आला. मग जी हाकाहाक आणि धांवाधांव झाली ती काय पुसूं नको! हे आमचे शेदाड शिपाई ( गांवचे बंदोबस्तास असलेले ) इकडे वाघ तर हे तिकडे! लेकांच्या मिशा, कल्ले, ते वांकडे केलेले डोकीचे केस, तो मोठा घेरा, तीं पोकळ डगलीं, आणि खांद्यावरची बंदुक एवढें बघावें मात्र!! उगाच कुत्रें भुंकलें, कीं लागले च्योंवम्योंव करायला. एखादा हत्यारबंद—चोर कां होईना—अंगावर येतोसा दिसला कीं, अवसान असल्यास पळतील, नाहीं तर भुईला साष्टांग दंडवत घातलाच!! शाबास त्या राजबिंड्याची!!!

ती ओरडाओरड ऐकण्याबरोबर जी स्वारी आंतून धांवत आली, ती अगदीं वाघाच्या समोर धांवली! हां हां हां ह्मणतात तों केली लगट!! वा वा वा! ती हातांत तरवार, ती ढाल, तो आवेश, ती चपळाई, आणि तें धाडस पाहून सर्व अगदीं दंग होऊन गेले! बेटा तो त्यांच्या बरोबरचा तानाजी तो देखील तसलाच! त्यानें महाराजांची पाठ सोडिली नाहीं. दोघे वाघाच्या आंगावर धांवण्याबरोबर, त्यानेंही गर्जना करण्याचा, हात पाय आपटण्याचा व शेपटी हालविण्याचा एकसारखा सपाटा चालविला. पण मग काय पुसतोस? हे दोघे पुढें जवळ जवळ आटोक्यांत येण्याबरोबर जी किंकाळी फोडून उडी-मारून त्यानें गर्दी केली तीबरोबर सूं मेरे बाप!!! इतकी गर्दी जमली होती कीं पाऊल सरकण्यास वाट नव्हती, पण तें होतांच पन्नास हात पर्यंत झरदिशीं सर्व मागें हटले, तेव्हांची तर मौज विचारूं नको? मोठ मोठे धारराव देखील हं! नंतर वाघ अमळ उभा राहिला, तों या बहादूरांनीं पुनः त्यावर चाल केली, आणि एकदम दोघांनीं हिकमतीनें वार करण्या बरोबर तो वाघ आणि हे दोघे असे तिघेही पडले!! इतक्यांत सगळे धांवून शिवराज व तानाजी यांस उचलून नेऊन पाहतात तों महाराजांचे ह[illegible]

जा झाली होती, आणि तानाजीच्या दंडास त्याचीं नखें लागलीं होतीं. अशी वा वा तऱ्हा झाली!!! काय हें विलक्षण कर्म सर्वांच्या तोंडांतून मोठ्यानें जो जयघोष

बि०—ग्यानूला ही गेलें पाहिजे-

सो०—हां हां, दादा, आन् आमी हातच न्हाव काय?

म्हा०—आर, तुमाजी बी न्हायच. पन त्येकानी समद गेल्याव—मांग कोनर हाय.!

सौ० हे०—तर मंग आदोगर जावून या तुमी.

चि०—हो. मी तरी तेंच म्हणतो. कांकी—न जाणो—एकादा शिपायी प्यादा—का खरें कीं नाहीं?

म्हा०—व्हय. ततला राजरंग बगून मंग—

बि०—हो हो, तसेंच.

म्हा०—हू, दादा, उटातर— (जातात)

## प्रवेश २

## स्थळ—गल्लींतील एक घर.

( ग्यानू आणि कोंडी )

ग्या०—(चरफडत) ह्ये पोरल्याला धादा म्हटल—आर त्येका, त्येंच्या वाट जाउ नग म्हणून; पन ऱ्योक तिदा तिदा जाया सोडित न्हाई. आतां तोंडान न्हाइ सागायचा—येत-खर माज्या म्होर म्हनाव.

कों०—काय म्हणतायसा, आन् काय करतायसा? त्येन आसा काय आन्याव केलाया? ऑ? " ये म्हन ये म्हन "! काय करनार त्येच? आज पावत उगाच बगल नी दम बी खाल्ला; पन आपल नीत हाइच!

ग्या०—(रागानें) काय काय म्हनत्येस? धांगड मातलीया! हाकडये अशी; लई दिमाक नग माज्या म्होर लावू! का वडू दोन काय्या पाटीव—लई त्वांड सोडूनग बग.

कों०—आव, पन त्येन काय आस केल? आन् म्या तरी आय आस घोड मारलया ऑ? म्हन दिमाक लावूनग. कसलाजी दिमाक लावलाया?

ग्या०—(अंमळ थंड होउन) आग सटवे, हाकडये अशी बगू! बग म्यो पोर आक्शी बिनासला. किती येळ गय करावी? बग धादा म्हटल का त्येका, त्ये कस जालतरी थोर धनी; त्येनी कस केल तरी साजल. पन त्येका, तू तस करश्यालत—पन दोड न्हाइच ऐकत. येकाद पिळसत—काइच्या बाइच व्हाया का येळ हाय?

कों०—हा हा, समाजल. वाड्यामदला परकार! त्ये इर्शी नग इक्त बोलाय. त्ये माला समद ठाव हाय. परतम परतम त्यो आपल्या ध्येतानच म्हारानासंग कुस्ती व्हता करीत. पन त्येनीच सांगल, का नीट तू आपल्या आकाड्यांत बाकीच्यासंग करतोस तशीच. माज्या संगबी कुस्ती करीत जा. त्ये इर्शी तूं काइबी मनामदी आनुनग. त्ये दिसापान त्यो तस कराय लागला. आन् त्येच्याव—का तुमी परत चडफडतायसा? आनकी म्हाराज म्हनाल—बग, गोप्या, माला लागल बिगल कि बिजा व्हयील म्हनून भिऊन कुस्ती नीट करनार न्हाइस तर न्हाइ उपेगी. तवामंग त्येन तरी काय करावं? तरीबी त्यो हाइच ध्येतान.

ग्या०—ऑ ऑ! आस हाय का? मंग न्हइ काळजी. त्येच तस म्हगल्यावर मंग काय! पन आपल्या आपन जपाव. ह्ये न्हानपनातच आस मंग थ्वारपनात कायबा करश्याल कोन जान!

कों०—अजी, वागाच पिलू हायते! काइबी म्हना, पन ह्ये मोट इलक्सन खर! धावत्यात काय, उड्या काय मारत्यात! घोड्याव—बगा उडी मारून ग्यान बसत्यात! आता म्हाल्याव न्हाइ तिक्त, पन त्येंच्या रोड्या त्या धाकल्याव! वाड्यामादि त्येंची येक

निघाला त्यानें आकाश दुमदुमून गेलें!! हो. त्या आनंदोत्सवा करतांच ही काल दक्षिणा वाटली. आणि उद्यां मोठा समारंभ तो व्हायचा आहे. तेव्हां उद्यां तरी कोठें जाऊं नकोहो. नाहीं तर निजून रहा!

दि०—छि:भलतेंच! मी काय सगळा दिवस निजूनच असतों? बरें असो. आणखी काय खबर बात?

वि०—(हंसून) हं:! काय लेक खबरबात विचारतो आहे! गोविंदभट, चल तूं स्नानास उशीर झाला. हा पहा १० घटका दिवस आला. चल ऊठ. (जातात)

# प्रवेश १०

## स्थळ—चौकीचा पुढचा भाग.

( दौलता व बहिरू )

दौ०—का भइरवा, आव इकत्या लगबगिन कुनीकड?

ब०—ल्येका, तू काता! लई येडा हायीस! बग कुनी गावाशिवाला, न्हाइतर लगबगिन कोनत्या कामाला कुनी जात आसल तर त्येला कुट जाता ह्मणून इचारू नये; ध्येनात धर बरका. बग म्हाराजानीं ह्यो लाकोटा दिलाय, त्यो बेगीन जावून द्येया पाहिजे.

दौ०—आव, पन गाव कोनच?

ब०—(कानांत सांगून) समाजल?

दौ०—व्हय. पन येनार कंदी?

ब०—चार दिस तर लागत्यालच.

दौ०—काय राव, थट्टा लावलीया! च्यार कोसावयन येयाला च्यारदीस! व्हय पन सांगाना खर!

ब०—आजच्या आज दीस मावाळता मावाळता याया हाव.

दौ०—ऑ? लई निकाडिचं हाय जनू? चलातर राव. (जातात)

प्रथम अंक समाप्त.

---

# प्रवेश १.

## स्थळ—खेडेगांव-चावडी.

( पाटील वगैरे )

ह्मादु पाटील—ए तुक्या, इस्णूपंत घरामदी न्हाईतका? बलवाय गेला व्हतासना!

तु०—व्हय दादा, गेलो व्हतो. त्येनी ह्मटल का घडीभरन यीन.

ह्मा०—( रागावून ) जा लेकाच्या बेगीन नी हटकून आन. ह्मनाव लय निकडीचे काम हाय. त्येवडा कागोद—मंग पाइज तर जा ह्मनाव. आयिकलस का?

तु०—व्हय जातो. ( जातो )

सोमामगदुम—ह्मादूदा, कुटन आलाया कागोद? गडाक्यलाका?

ह्मा०—न्हाईर! त्यो तुला ठाव न्हाई.

सो०—आव, न्हाइ ह्मनूनच इचारल!

ह्मा०—ह्ये बग (कानांत सांगून) समजलास?

तु०—( येऊन ) ह्ये इस्नूपंत आल.

वि०—कां पाटील, इतकी घाईशी? जेवून नुकताच असा पडलों होतों. सगळीरात्र जागरण ह्मणून जरा पडलों. डोळा लागतो न लागतो तों तुक्यानें हाकांचा सपाटा लावला! अमळशानें येतों ह्मटलें तरी ऐकेना.

म्हा०—तसच काइ निकडीच—म्हणून ह्यो कागद देऊन ह्यो वाचा ह्मजी समद—

वि०—(वाचल्यावर त्याच्या कानांत सांगून) तर मग अवश्य गेलेंच पाहिजे.

ग्यानू व हैबती.—दादा, आनू आमी नग का संगाती?

येक मज्जा बगावी. हातात ती कायशी— धरून जवा गरगर फिरवित्यात, तवात— भारीच गम्मत दिसतीन् काय! बोलन लइग्वाड—जनू साकर!! आई साबा जवळ गोस्टी चालतात तवा बगाव सँच—!येक येळ म्हाराज आइ साबाच्या मांडीव बसाल व्हत, आन् तकण्ण येक हरन पळत पळत त्येच्या जवळन जात व्हता, तवा आई साबा सुदा आमी समदी दचाकलो; पन म्हाराजानी जी धाव घेतली—धरला बगा त्येला खिनात!! आन् जवा आई साबा जवळ आनला तवा त्येंचानीं आमचावी जिव थंड झाला! आन् बगा येक येळ ह्या आमच्या गोप्यासंग कुस्ती करता करता म्हाराज पडायच्या लागात आल, पन तिकत्यात जी गिरकी मारली, तवा आई साबवी म्यात्या! पन जवा गोप्यालाच खाल पाडून टाकल तवात समद्यान्नी म्होट आछिर झाल!!

या०—ठेयस ठेयस! त्ये हातीतच तस! जा आतां न्हयारीला बेगीन आन.

कौ०—आत चलता का हातच आनू ?(जातात)

## प्रवेश ३

## स्थळ—पिछाडीची खोली.

(आबा व नाना)

आ०—नाना, तुह्मी कांहीं म्हणा; घाट कांहीं निराळा दिसतो.

ना०—खरोखर बावा. वय तरी किती? हे दहावें किंवा बारावेंवर्ष! पण घोड्यावरची मांडी हालतीकाय? आम्हाला देखील ज्यावर बसायला भय, त्याघोड्यावर निर्धास्त बसून पिटबितात देखील! दांडपटा, बोथाटी किती तरी नामी खेळतात! मोठ्या पटाईत खेळणाराची—म्हणजे ज्याचें आयुष्यच त्यांत गेलें—त्याची गोष्ट सोडा, पण त्यांच्या मडळींत कोणी टिकतो आहे काय? त्यांची लहानशीच तरवार आहे, पण ती न घेतां साधारण थोर घेऊन देखील कशी बरें फिरवितात!

आ०—कायहो सांगावें! दसऱ्याचे दिवशीं तुम्हीं होतेतना? जेव्हां स्वारी ती आप[illegible] तरवार घेऊन गरगर गरगर फिरवित मंडळावर चालली, तेव्हां सर्व मंडळीला किती सानंदाश्चर्य वाटलें!! ओहो! मला तर बोवा वाटलें कीं हा आपला दुसरा अभिमन्यूच!! कां खरें कीं खोटें?

ना०—कायहो विचारतां? खोटें कोण म्हणेल? कमीतें काय आहे? आजानुबाहु तर आहेतच. दादा साहेबांना त्यांची कृती नीटशी आवडत नाहीं असें दिसतें नाहीं बरें.

आ०—त्याना वाटतें कीं, या त्यांच्या उत्सखळपणामुळें व व्रात्यपणामुळें भलतें सलतें एकादे वेळेस झाल्यास शहाजी महाराजांची आपणावर गैरमर्जी होण्यास वेळ नाहीं. महाराज म्हणजे दादा साहेबांचे ऐकत नाहींत असें नाहीं, पण असावा त्यापेक्षा हूडपणा ज्यास्त खरा. बरें नाना, तुमच्या ऐकण्यांत आलें आहे काय कांहीं?

ना०—नाहीं बोवा. काय बरें तें?

आ०—थोडकेंच तुम्हांस सांगतों. पुरंदरच्या पलीकडे एक खेडें आहे,त्याचें नांव काय तें राहूंद्या नाहीं आठवत—तेथला एक मुसलमानाचा पोर, श्रीधरपंत भोपळे[illegible] गड्याबरोबर भांडला, आणि त्या गड्यास त्यानें बराच ठोक ही दिला. मग तो गडी व श्रीधरपंत पुरंदरावर नीळकंठरावजी हणमंते यांकडे दाद लागण्यास गेले, पण तो मुसलमानाचा पोर—मोठ्या देखील

नव्हे मध्यमशा कुळांतला होता—तरी त्यां-च्यानें कांहीं करवलें नाहीं. राज्य मुसलमानी ह्मणून भ्याले! पण गम्मत पहा! तें प्रकरण आलें एथें, तेव्हां दादा साहेब देखील श्रीधरपतास ह्मणाले—जाऊंद्या, संध्या या कामांत हात घालून उपयोग नाहीं.

ना०—आबा, दादा साहेब कांरे असें ह्मणाले? त्याना देखील भय वाटलें?

आ०—त्याचें कारण इतकेंच कीं, त्या पोराचा मामा तो या सिंहगडच्या खानाचा दुय्यम आहे, आणि तो शहाजी महाराजांचे जरा मर्जीतला आहे, हें बेंड कायतें! पण पुढें काय झालें तें कोठें ऐकलेंत?

ना०—काय बरें तें?

आ०—महाराज शिकारीला ह्मणून पुरंदराकडे गेले, आणि तेथले चार पांचजण व तो गडी यांसह स्वारी रात्रीं त्या खेडयांत जाऊन त्या पोराची चांगली कणीक मऊ करून बिनबोभाट आली! हें दादा साहेबाला, निळोपंताला कीं कोणाला कळलेंच नाहीं. मला तरी सहजासृच्या कळलें.

ना०—तें हो कसें?

आ०—ते आपल्या सोबत्या जवळ बोलत होते तेव्हां—

ना०—काय हो आबा, तानाजीचें भारी रहस्य दिसतें नाहीं बरें? तो पोरतरी तसाच आहे. जोडीच जमली ह्मणावयाची!

आ०—खरोखर भीम अर्जुन ह्मणाना! बेटा तो देखील तसलाच; धीट, चलाख, धाडसी [illegible] हरही! हो. पण सांगण्याचें तें मुख्य राहिलेंच.

ना०—तुम्ही तर बोवा—बरें काय तें?

आ०—पहा नाना, उगाच त्यांच्याकडे दृष्टि बांधी. बोलूं नकाहो कोणाजवळ. एकदां त्यांचें बोलणें चाललें होतें, तें मीं आड राहून हळूच ऐकिलें—पण शपथ आहे हो तुह्माला कोणाजवळ बोलाल तर—कीं त्यांचा कटाक्ष (हळूच) मुसलमानांवर फार आहे. कां खरेंना? अहो, ती मागली आठवण आहेना? त्या रणदुल्ल्याला सलाम देखील केला नाहीं! एथपर्यंत—होयना? (पाहून) कोणहो तो येत आहे? हां! अहो तो सुभाना. कां बरें येत आहे?

सु०—(येऊन व मुजरा करून) दादा साब हाटकत्यात.

आ०—कोणालारे? मला कीं याना?

सु०—आपनालाच.

आ०—कांरे? दादा साहेब काय करताहेत?

सु०—ये काय समाजल न्हाई. खोली मदी हायेत.

आ०—आणखी कोण आहे तेथें?

सु०—म्हाराज मातर.

आ०—नाना, गेलें पाहिजे. तर तुह्मी दुपारीं जेवतांक्षणींच या ह्मणजे तुमचें—झट—

ना०—बरें कां होईना. चलातर. (जातात)

## प्रवेश ४

## स्थळ—मधला दिवाणखाना.

( जिजाबाई, शिवाजी,व तानाजी )

जि०(चुंबन घेऊन) लाडक्या, तुला कितीवेळ बरं सांगितलं, कीं अशा आवाडाबी करूं नयेत; उनाडपणा हट्ट करूं नये; कोणी भला येतो बुरायेतो त्याशीं तशा रितिनं वागावं. एकनाद लागला ह्मणजे तोच. घोड्यावरनं कितिवेळ बरं पडलास? त्या मेल्या तरवारिनं तर—

शि०—आई, तूं बग अगदीं कांहीं तें मनांत आणूं नको. ह्या दोन तीन वर्षांत मी

घोड्यावरनं पडलों तरी? तरवारीनें ह्मणशील तर ती नीटशी मला धरतां येत नव्हती तेव्हां. आलीकडे तर नाहींना? आणि तेव्हां तरी काय! तानाजी आणि मी अगदीं जवळ ह्मणजे त्याच्यांत व माझ्यांत कायतें वितीचें अंतर! आणि त्याचें धोतर मधेंच सुटल्यामुळें जरा झटका का गला. असो ह्मणा एवढ्यानें भ्यालें तर पुढें काय—?

जि०—आजोबाचं काय आणि माझं काय—सांगणं ह्मणून इतकंच, कीं तूं आपल्या गुणांनीं—पेक्षां ज्यास्तही, पण भलतें सलतें करून काळोखी—

शि०—छि: आई मी बाबापेक्षां हजार वाट्यानें अधिक करीन तर होय म्हण!

जि०—( आनंदानें चुंबन घेऊन ) बाळा, या तुझ्या बोलण्यानंच मला काय वाटतं तें सांगतां येत नाहीं. पण— •

शि०—अं: तो "पण मरो" पैज म्हण! आई, तुला सांगून ठेवितो कीं—(इतक्यांत तानाजी येतो ) या राव.

ता०—(हंसत हंसत) आपलें काय चाललें होतें सें चालूंद्या. आई ऐकणार तुह्मी सांगणार मग काय?

जि०—कायरे तानाजी, तूं तरी आपला वेळ पडल तसा बोलणारा आहेस!

शि०—त्याना वाटतें रावपणा कायतो आमच्यांत.

ता०—(हंसून) भल भल शिवबा! अर्धी आई पाशीं काय चाललें होतें तेंच चालूंद्या. ऐकूं तर खरें!

शि०—गड्या, तूं तरी मोठा सोंगाडी आहेस!

जि०—तानाजी, हा आपला पोरपणानं कांहीं तरी बोलतो नाहींरे?

शि०—(हेलनेनें) खरें खरें; आणि हे तानबाराव मात्र मोठे दोड्डाचार्य ऑ!

जि०—(पोटशी धरून व अमळ हंसून) बाळा तसं न्हवं! तर मग उगीच लांबलांब बात कशाला बरं बोलाव्या?

ता०—आई, काय काय, हे राव म्हणतात तरी काय!

जि०—शिवराया, सांगू काय!

शि०—( तिरस्कारानें ) सांगसना. मी काय खोटें म्हणतों? हे दाढीवाले तरी त्यांवर काय म्हणतात तें ऐकूं!

ता०—आम्हासही दाढी कुठें आहे? तुम्हांला आणि आम्हाला एकदांच यायची—वर्ष सहा महिने अगोदर—इतकेंचना?

शि०—अरे, तसें नव्हे. ह्मणजे तुम्ही मजपेक्षां फार शहाणे, हुश्शार, पोक्त, बुद्रुक असें आमच्या आई साहेबांस वाटतें!! समजलां राव?

ता०—(मोठयानें हंसून) बरें असो, राव गरम झाले! आई, काय म्हणत होता हा?

जि०—जाऊंदे त्यांत काय आहे! आपलं गोड बोलतो तेवढं ऐकावं. त्यांतच सुख आणि मौज?

ता०—पण काय तें ?

जि०—ऐकतर. हा काल म्हणत होता—मी असं करीन, मी तसं करीन; शिपायी मिळवीन, स्वार ठेवीन—मार धामधूम करीन!!

ता०—(उचंबळून ) होयरे शिवराया? (घट्ट मिठी मारून ) शाबासरे शाबास!? तरमग काय तूं एकटाच—?

शि०—भलतेंच! तुझ्याशिवाय मी पाऊल तरी पुढें टाकीन? तुला तरी तसें वाटतें काय?

ता०—खरोखर सांगतो. आई, शिवराया नें म्हणतो तें अक्षरशः खरें! लोक जमवून,

धामधूम करून गम्मत करून सोडूं !!

जि०—(विस्मयानें ) कसली धामधूम करणार! दरवडे घालणार कीं काय!

शि०—छिः! आई, दरवडे नव्हे; दरवडेखोर जे फार माजले आहेत त्यांची—मुंडकी —तर होय म्हण.

ता०—हो हो! तसें करून मग तुला हत्तीवरच्या अंबारींत बसवून—च्या दरवाज्यांतून वाजत गाजत नेऊं समजलीस?

जि०—(अत्यानंदानें) बाळांनो, देवी जगदंबा तुम्हांला दीर्घायुषी आणि यशस्वी करो!! पण उगीच असें दुसऱ्या कोणाजवळमात्र बोलू नकाहो!

शि०—(आवेशानें) बोलूं कशाला! करून दाखवूं ! खोड खोड मोडीन तर होय म्हण—

जि०—ऑं! कोणाची खोड मोडणार?

ता०—कोणाची म्हणजे?

शि०—तानाजी, कायरे आमच्या आईला अजून हें समजेना! अग, आमचे बाबा कोणाच्या आंत आहेत?

जि०—हें काय! आहेत पाच्छायाच्या. मग, तुझी काय त्याची खोड मोडणार?

शि०—(उठून व दंड थोपटून) हो हो. त्याची त्याची!!! तेच दरोडेखोर समजलीस!

ता०—( त्यास उचलून घेऊन नाचल्यावर ) शाबासरे शाबास!! आई, लिंबू नारळ—नाहीं तर दागिना आण—टाकूंदे ओंवाळून!

जि०—( तसें करून ) बाळांनो! काय बोलू मी. (गहिंवर येऊन कंठ दाटतो ) तानाजी, शिवबा, चला आधीं जेवायला.

दो०—कसचें जेवण नी खाण. ( नंतर दोघें हातांनीं दोघांस धरून घेऊन जाते)

## प्रवेश ५

## स्थळ—पार्गेतील बंगला-

( गोविंदपंत व विष्णुपंत )

गो०—विष्णुपंत, कालच्या प्रसंगीं कशी काय बहार उडाली!

वि०—एकूण पाहण्यालायक खरी! दांडपटा काय, मलखांब तर फारच नामी झाला बो बा! महाराजांची किती तरी चपळाईहो! कोंवळी वेल जशी!!!

गो०—पण कुस्तीचे डावपेच नाहींका पाहिलेत?

वि०—छे हो! ते पुरते पहायाला सांपडले नाहींत. प्रथम बरेंच सांपडत होतें, पण गंगाजी म्हसवडकराचा आखाडा आला,तेव्हा ते एका पेक्षा एक धटिंगण मस्ती करून पुढें जाऊं लागले ते वेळेस जी काय गर्दी झाली तेव्हां काय विचारतां? पागोटें एकीकडे, जोडा एकीकडे,' आणि अस्माकं भलतीकडे!!

गो०—(हंसून)तर मग तुमचीच मोठी मौज!

वि०—तें कांहीं विचारूं नका. बेटा तानाजी देखील किती हुशारि! उलट्या सुलट्या उड्या काय मारतो! तरवार तर फारच नामी फिरवितो!! कां कसें?

गो०—खरी गोष्ट. महाराजांपेक्षां कांकणभर ज्यास्त! पण घोड्यावर बसून भाला, बोथाटी फिरविणें हें महाराजांचें हातखंडा काम! कां लिंबू पळतां पळतां भाल्यानें कसें घेतलें शितार्फीनें बरें?

वि०—तें त्यांचें कसब सगळ्यांपेक्षां ज्यास्त! (आठवलेंसें करून) हो हो, काय हो गोविंदपंत, तो एक तिसरा त्यांच्या बरोबर कोण होता तो?

गो०—तिथे कां सात आठ असामी होते तुम्हीं नाहीं पाहिले?

वि०—अहो, ते पाहिले. पण जोडयाकरून झाल्यावर लेजीम खेळण्याचे वेळेस महाराजांचे समोरचे अंगास पिंवळी चड्डी घातलेला तो कोण? निमगोरा असून जरा किडकिडीतसा होता तोहो?

गो०—हां हां समजलों. बुवा, तो अलीकडेच पाहण्यांत येतो. नांव माहीत नाहीं, पण फसलकर फसलकर ह्मणतात.

वि०—आणि आटपून जातेवेळीं केसरी रंगाचें पागोटें घातलेला तानाजीचे डावे बाजूस होता तो?

गो०—हां. अहो, तो तुह्मांस ठाऊक असावा. एसजीकंक तो!

वि०—असें काय? बरें पण; काय हो गोविंदपंत, आलिकडे हा लहान संवगड्याचा थवा बराच जमला आहे नाहीं बरें?

गो०—हो. एकंदर दहा पंधरा असामी आहेत. या स्वाऱ्या सजून एकदम बाहेर पडतात, तेंव्हां फार मोठी मौज दिसते नाहीं हो?

वि०—मौज ह्मणजे काय अशी तशी! उमरावासह जशी काय राजाची स्वारी!!

गो०—आणि तसें तरी कशावरून होणार नाहीं?

वि०—नाहीं कोण ह्मणतें? व्हायचेंच तसें! चिन्हें तशींच दिसतात बोवा.

गो०—विष्णुपंत, बराच वेळ झाला चलाआतां.

वि०—हो. मलाही दुकानांत जावयाचें आहे, चलातर. (जातात)

## प्रवेश ६

## स्थळ—जिजाबाईची खोली.

" जीजाबाई, व शिवाजी "

जि०—शिवबा, ते दिशीं तुला मी जरा रागानं बोललें, पण ती खोड तूं अजून टाकली नाहींस. आणि पहिल्या सारका येत ही नाहींस.

शि०—आई, असें कांबरें ह्मणतेस? ते दिवशीं एकवेळ आणि काल एकवेळ एवढेंचना?

जि०—काल कुठं गेला होतास? आजोबास दिखील भेटला नाहींस?

शि०—खरेंच सांगतों पण—

जि०—तें आपलें तुझें न्हेमीचें आहेच.

शि०—आई, तसें नव्हे ऐक. तानाजी म्हणाला, शेजारच्या गांवीं एक चांगला हरदास आला आहे.

जि०—(चाकित होऊन) हां हां! तर एकूण तूं रात्रीं गांवाला गेला होतास?

शि०—[घट्ट मिठी मारून] आई, रागवूं नको; बग—

जि०—रागावत नाहीं. पण बाळा, असें एकटें रात्रीं, परगांवीं आणि तेंही कुणाला नवीचारतां जाणं—

शि०—तूं किंवा आजोबा जाम्हणणार नाहीं ह्मणून—पण—

जि०—[राग आलासें करून] बरंचतर — एव्हां पासनच असा वागणार?

शि०—आई—[हुंदका येतो]

जि०—[चुंबन घेऊन व डोळे पुसून] बाळा शिवराया, [पुनःपदरानें डोळे पुसते]

शि०—आतां तुला विचारल्या शिवाय—

जि०—मी तरी तेंच म्हणतें—विचारून कुठं तें जावं.

शि०—आई, पण तूं धाडशीलना खरं

जि०—तसं धाडण्यासारखं असलं तर नाहींतरी हीं का धाडणार? पण —[इतक्यांत २ घंटा वाजतात] अरे, चल पुराणाची वेळ झाली.

## प्रवेश ७
## स्थळ — पुराणाची जागा.

(शिवाजी, रावजी पुराणीक, तानाजी वगैरे)

शि०—परवां थोडासा भाग सांगितला, आज पुढचा कांहीं—

रा०—ठीक आहे. कोणतेही कृत्य उद्योगा वांचून होत नाहीं, हा भाग निघाला होता नाहीं बरें? आपण नुसतें कांहीं एक काम करावयाचें मनांत आणिलें तर त्यास प्रयत्नच केला पाहिजे, कां कीं ह्मटलें आहे—

श्लोक १०४०

होतात निःसशय उद्यमानें[1]
कार्यें तशीं तीं न मनोरथानें॥
सुप्ता हरीच्या[2] वदनांत जेवीं
आपाप जाती मृग नाच[3] तेवी ॥१॥

तेव्हां उद्योगा वांचून मनांत जप करीत बसल्यानें चिंतीत कार्ये कधीं ही व्हायचीं नाहींत. आतां कोणी कोणी ह्मणतात, कीं दैव अनुकूल झाल्या शिवाय उद्योग करून व्यर्थ. होय, पण पहा—

गीति.

एकया चक्रें चाले,
नच रथ चालेल काय तेंहि वदा॥
उद्योगाविण बुध हो,
सिद्धिद होइल न तेवि दैव कदा ॥२॥

बरें दैव दैव ह्मणजे काय आहे? तर दैव ह्मणून कांहीं निराळें आहे असें नाहीं. ह्मणतात—

गीति.

दैव तरी काय असे,
तर ह्मणती पूर्व जन्म कृत कर्म॥
यास्तव पौरुष्यानें[4],
यत्न करावा धरा मनीं वर्म ॥ ३ ॥

१ उद्योगानें. २ निजलेल्या. ३ नाहींच. ४ पराक्रमानें.

कित्येक ह्मणतात —दैव अनुकूळ नसेल तर उद्योगानें तरी काय होतें? कांकीं प्रत्यक्ष बृहस्पति ज्याचा उपदेशक व अनुग्रहक तो; अत्यंत कठिण जें वज्र तें ज्याचें आयुध; सर्व देव ही ज्याची सेना; चतुर्दंत ऐरावती—जो समुद्रांतून निघालेला— तो ज्याचें वाहन; स्वर्गा सारखा मोठा बळकट ज्याचा किल्ला; अपरिमित ज्याची संपत्ति असा जो इंद्र त्याचें स्थान बळीनें हरण केलें नाहीं काय? तर प्राक्तन हेंच खरें. होय, ही गोष्ट जरी खरी आहे तरीं अगदीं उद्योगच केला नाहीं तर कसें होईल? तांदूळ, सर्पण, पाणी अग्नि सर्व कांहीं साहित्य आहे, पण, सर्व जोडून शिजविल्या वांचून भात मिळतो काय? उद्योग करून ही कधीं व्यर्थ होतो, ह्मणून अगदींच न केला तर कसें चालेल? फुकट गेला तरी लोकापवाद तर नाहींना आपणावर येणार? पंडित ह्मणतात—

श्लोक शार्दू.

उद्योग्या नर नायका प्रति वरी लक्ष्मी स्वयें देइजे, दैवानें कुनरें अनुद्यमकरें ऐसेंच हें बोलिजे॥ दैवा टाकुनि आत्म शक्ति करणें उद्योग सुज्ञें नरें, केला व्यर्थचि जाय यत्न तरि ही नाहीं तया दोषरे ॥ ४ ॥

महासाधु मुक्तेश्वर देखील हेंच ह्मणतात— "उद्योग्याचे घरीं, रिद्धिसिद्धि पाणी भरी" केवळ दैवावर भरवंसा ठेवून स्वस्थ बसणें हें आळशाचें काम होय. जर दैवानेंच सर्व गोष्टी प्राप्त होत्या तर उद्योग या जगांत मुळीं करावयासच नको होता. ज्या ज्या चमत्कारिक व अपूर्व वस्तू मानवी कृतीच्या आपण पाहातों त्या झाल्या असत्या काय? घरदार, वस्त्रपात्र धान्य वगैरे कांहीं तरी मिळालें असतें काय? निःसंशय कांहीं मिळायचें नाहीं अतएव यत्न

केलाच पाहिजे. आतां तो कसा केला पाहिजे तर—

**गीति.**

टाकावे दोष जनें, ऐश्वर्याची स्पृहा
जया आहे॥ निद्रा तंद्रा क्रोधहि, भय
आळस दीर्घसूत्रता सहि ॥ ५ ॥

शि०—आपण सांगितलें हें ठीकच आहे. आ. णखी कांहीं साधनें आहेत काय?

दा०—होय. आणखी हें ही ध्यानांत ठेविलें पाहिजे, कीं ज्याच्या त्याच्या योग्यते प्रमाणें, शक्ती प्रमाणें, बुद्धि प्रमाणें व साहाय्या प्रमाणें कोणीं ही उद्योग केला असतां सिद्धीस जातो.

ता०—आतां सांगितलें हें खरें आहे. मुंगीनें डोंगर उचलूं ह्मटलें तर होईल?

दा०—तें जरी होणार नाहीं तरी अल्पवस्तु कां असेना! पण त्यांचा समुदाय जमला ह्मणजे त्याचे हातून महत्कार्य होतें. कांकीं—

**गीति**

अल्प वस्तूंचाही, समूह साधी तसेंच
कार्यातें॥ झालीं गुणयुतें बांधिति,
काय तृणें ही न हस्ति वेंधांतें; ॥६॥

आणखी असें आहे कीं—

पुरुषा हितकर होते, संहीत
अल्प स्वकीय कुलजांची॥
पट तंतु तंतु युत परि, सांई
बलाढ्याही भेदितां नाची ॥७॥

शि०—यावरून कार्यकरणाऱ्या पुरुषाला चांगल्यांचेंच साह्य पाहिजे असें होतें-नाहीं बरें!

दा०—सत्य आहे. कार्योत्सुक पुरुषास साह्यकारी मित्र असा पाहिजे —

१ इच्छा. २ सुस्ती. ३ आज करूं उद्यां करूं असें म्हणून काळ दवडणें. ४ साह्य (निद्रादि) ५ दोरी. ६ मोठ्या हत्तीला. ७ समाज. ८ घट्ट.

**श्लोक. शार्दू.**

उत्साही व्यसनीं नृपाल सदनीं
राहे स्मशानीं उभा, दुर्भिक्षीं
अति संकटीं नच गणी मित्रार्थ
कार्या शुभा॥ किंवा जो अशुभा
सुमित्रचि खरा ऐसा सर्वे लाभतें,
ज्या संभाषण संस्थेति प्रति दि-
नीं तो धन्य विद्वन्मतें ॥८॥

सन्मित्राचें आणखी लक्षण सांगतात—

पापा पासुनि राखितो हित कृती जो सांगतो ठेवितो, चित्तीं गुह्य गुणाजनीं प्रकटितो मित्रा न जो सोडितो ॥ आपत्तींत कदा धना परिजना प्राणांसही खर्चितो, ऐसा जो ह्मणती कवींद्र अवघे सन्मित्र जाणाचि तो ॥ ९ ॥

दांभिक मित्रच पुष्कळ असतात. त्याविशीं कवि ह्मणतात —

**श्लोक उ० जा०**

प्रत्यक्ष बोले प्रिय दावि माया, परी करी
विघ्न परोक्षें कार्या, वर्जी असा मित्र अ
मित्र मान, पयोमुखक्ष्वेड घटा समान॥१०

जोंपर्यंत खाया प्यायला, ल्याया बसायला यथास्थित मिळत आहे तोंपर्यंत आम्ही तुमचे जिवलग मित्र म्हणणारे भोजन भाऊ शेंकडों असतात. पण वर सांगितल्या प्रकारचा खरा मित्र अत्यंत विरळा सांपडतो, हें सर्वानुभवसिद्ध आहे. हां साब होय साब ह्मणणारे, पुढें पुढें सरून तत्परता दाखविणारे, परंतु धन्याची पाठ फिरली कीं सर्वांवर पाणी ओतणारे असले परिचारक बहुत असतात, पण निर्वाण असा क्वचितच असतो. या जगांत खोट्याचा, दांभिकाचा, मानभावीपणाचा,

१ दुष्काळांत. २ राहणें. ३ पाठीमागें. ४ आनंविष असून तोंडीं दूध असा घट (पयः दूध, क्ष्वेड विष.)

त्यांचाच भरणा फार पासाठीं कार्य कर्त्या पुरुषानें फारच सावध राहिलें पाहिजे.

[इतक्यांत १० घंटा वाजतात]

शि०—मागच्या पेक्षांही आजचा भाग चांगला झाला! आतां वेळ झाली तेव्हां पुढचा भाग उद्यीक—

रा०—बरें आहे. चलातर. (जातात)

**द्वितीय अंक समाप्त.**

---

## प्रवेश १

## स्थळ—एकांत खोली.

(शिवाजी व त्याचे सोबती)

शि०—गड्यांनो उद्योगा वांचून मनुष्यास कांहींच प्राप्ति व्हावयाची नाहीं, ही गोष्ट तुम्हांस खरी वाटत असेल तर कोणता उद्योग करावयाचा बोला.

तान्हा०—आम्हांस काय हातांत नांगर धरायचा आहे, कीं पाल्यां मांडून जिन्नस विकीत बसायचें आहे, कीं लिखणीनें गिरवीत बसायचें आहे! आमचें काम जें असेल तेंच केलें पाहिजे.

यानी—हो, बरोबर तसेंच. माझें मत दुसरें नाहीं. आतां या मुसलमानांच्या अमलांत ग्रहदशा आली; पण आमचे पूर्वज-काय आमचे सारखे नांगर हाकीत होते? तूर्त नशिबीं आलें तें भोगिलें पाहिजे ही गोष्ट निराळी. पण आमच्या पणज्याचे वेळचे कांहीं कागद आहेत; त्यांत तेशिक्यांचे पदरीं मोठे नामांकित सरदार होते. आजोबाचे उमेद्वारींत तें जाऊन येतां येतां ही दशा आमचे कपाळीं आली. मुद्दलाच्याच ठिकाण नाहींसा झाला, तेथें आमचा काय पाड? हरहर! आम्ही आमच्या क्या वंशांतले म्हणण्यास देखील लाज वाटते! काय त्यांची योग्यता, केवढा त्यांचा दरारा, काय त्यांची संपत्ति आणि हे आम्ही फुटक्या कपाळाचे शिवशिव!! (दुःखाचा सुसकारा टाकतो)

एसजी.— शिवराज, याजी प्रमाणेच माझी दशा. काय सांगावें! आमचे चार गांव वतनी असून आज आम्ही अन्नांस देखील महाग झालों!! आज काय अमुक कर द्या, उद्यां काय नकात वाढवा, परवां काय मनुष्यावर कर द्या अशा एक दोन तीन दहा की पंधरा किती म्हणून वाणीं? रोज कांहींना कांहीं आहेच. अशा करांनीं त्रस्त झालों; बरें एवढ्यानें झालें नाहीं तर आजकाय अमुक अधिकारी आले द्या नजराणे, करा मेजवान्या, लावा दिवे; उद्यां काय नबेखान येणार त्यां साठीं अमुक अमुककेलेंच पाहिजे, नाहीं तर तुम्हीं राजद्रोही समजून वतनभ्रष्ट करूं; परवां काय वजीर साहेबांची स्वारी येणार त्यांची तर्तूद नीट ठेवा नाहीं तर पाहून घेऊं; तेरवां काय शाहाजादे अमूक ठिकाणीं येणार आहेत तर त्यांस सामोरे सर्वांनीं अमुक अमुक तऱ्हेचा पेहेराव करून व योग्य नजराणा घेऊन अमुक वाजतां हजर राहिलें पाहिजे; आजारी असा, भिकारी असा कीं कसेही असा! नाहीं म्हणावें तर वतनाला मुकून देखिल सुटणूक नाहीं, तर कारागृहीं दूर कोठें तरी गेलेंच पाहिजे. अशा अनेक अडचणींमुळें वतनभ्रष्ट होऊन असे झालों. या नोडग्यांनीं सर्वस्व हरण केलें!! दादनाफिर्याद!! आंधळें राज्य, काय करतोस बाबा! मागल्या कुळक:

या आठवल्या ह्मणजे आंगाचा तिळपापड होतो, पण उपयोग काय? चुरमुरं खात बसणें भाग झालें. "ज्याचा गांव त्याला वसाय नाहीं ठाव" ह्मणतात तें अक्षरशः खरें असून त्याचा अनुभव हे आपण सगळेजण घेतच आहों.

शि०—( कळवळून ) मित्रानों, तुमचें ह्मणणें अगदीं रास्त आहे. आतां तुमच्या उलट माझी स्थिती आहे — ह्मणजे आमचे पूर्वज बाबजी हे एका गांवचे पाटील होते; पुढें आमचे आजोबा—मालोजी— पराक्रमी होऊन बराच लौकिक मिळविला. उत्तरोत्तर चढतां चढतां हे सांप्रतची स्थिति मला आहे. पण तुमची स्थिति मनांत आल्यानें माझें सर्व सुख नष्ट होतें. माझ्या मित्रानों, तुह्मांला सुखी पहावें असा माझा पूर्ण हेतु आहे, पण मी काय बादशाह आहें? असतों तर तुह्मांला तुमच्या योग्यते प्रमाणें जाहागिरी सरंजाम देऊन सुखी होतों. आतां इतकेंच कीं अनवाणी चालणारा पेक्षां जोडा घालून चालणारा जरा सुखी. बरें माझ्या जाहागिरींतून कांहीं द्यावें—ह्मणजे एक एक गांव द्यावा—तर ही वडिलोपार्जित मिळकत, तेव्हां काय उपयोग बरें? बरें माझें ह्मणणें तरी कोण मानणार? कदाचित् तुह्मा तिघांत मिळून एकगांव मिळाला तरी काय होणार? स्वकष्टार्जित असलें तरच व्यय करतां येतो. बाबानों, दुसऱ्यास उचलून देण्यास मुखत्यारी असली पाहिजे, तसें तरी कांहीं माझें आहे? मी तरी आपला एक तुमच्या सारखाच? घातल्या अन्नाचा आणि दिल्या वस्त्राचा होय कीं नाहीं? ही गोष्ट तुह्मांला जरी बरोबर वाटणार नाहीं तरी विचार करा ह्मणजे समजेल. एखाद्यास पागोटें, आंगरखा किंवा असाच एखादा जिन्नस अथवा पांचपंचविस रुपये देईन असें मनांत आणलें तर तें तरी होतें आहे? तें सारें आजोबाचे हातीं. माझें मागणें त्यांचे मनास आलें तर ठीक—मिळेल; नाहींतर द्या किंवा देतों म्हटलें तर चालणार आहे? तेव्हां आपल्या स्वतांच्या कमाईचें व मालकीचें असलें पाहिजे; कां खरें कीं खोटें? वडिलार्जित मिळकतीवर जरी आपली मालकी असते तरी ती वडील असत पर्यंत नाहींचना? बरें वाडिलांचे मागें सर्व सत्ता आपल्याकडे तरी येते काय? एकटाच असेल तर मात्र येईल, आणि दुसरे भाऊ असले ह्मणजे हिस्सेरशीचना? मिळून काय झालें? असो; तर मग आतां विचार ह्मणून एवढाच कीं आपण सर्वांनीं मिळून यत्न करावा, आणि संपादन करून सुख भोगावें हेंच खरें. वडिलार्जितावर निर्वाह करणें तरी भिक्षेपणाच कीं नाहीं? त्यानीं बोलत असावें, रागें भरावें, खाण्याला काळ आणि भुईला भार ह्मणत असावें आणि आपण कोडगेपणानें तें सगळें सहन करावें कशाकरितां? शेरा तरी पोटापुरतें? जळोरे तें खाणें! काय बां... ड्या भरल्या आहेत? आज नाहीं उद्यां तरी वडील हीं वरलीं वाक्यें प्रत्यक्ष नाहीं तरी परोक्ष तरी ह्मणणारच, अथवा अन्यो

क्षीनें तरी येणारच मग पूर्वीच सावध कां होऊं नये? शोभा करून घ्यावी आणि मग काळें तोंड करावें यांत काय हंशील?

ता०—बस बस. तुझें ह्मणणें अगदीं रास्त आहे. तसेंच करूं तर—

बा०—उद्योग तरी काय करावयाचा?

शि०—अरे बाजी, ज्याकुलांत आपण उत्पन्न झालों, व आपले पूर्वज जो करीत आले तोच उद्योग करावयाचा.

ता०—ह्मणजे—अरे बाजी, याच्या वडिलांनीं जशी कीर्ति मिळविली तशीच यालाही मिळविली पाहिजे. मालोजी राजांपेक्षां शहाजी राजांनीं ज्यास्त; मग त्यांच्या पेक्षां ज्यास्त मिळविणें याजकडे सहजच आलें. समजलास? उद्योग काय म्हणून तो तसला करावयाचा.

शि०—आतां उद्देश काय तो तर सर्वांस समजला, पण हें काम काय तोंडानें व्हावयाचें आहे? कीं एक दोन, दहावीस किंवा पन्नास पाऊणशेंच्या हातून व्हायचें आहे? तर याला जमात मोठी पाहिजे, मग ती अल्पवळी कां असेना? हो; ते दिवशीं पुराणीक बोवांनीं तरी हेंच सांगितलें कीं नाहीं, कीं " अल्पावस्तूचाही इ० " आणि काल तर तुह्मी सर्व होतांच.

ता०—बाजी, अरे एसाजी, ऐक. हे आह्मी चवघे तर एक दिलाचे आहोंना?

बा०—अं: ! तो ना कशास हवा रे ! तानाजी विचारतोस काय? अरे एक दिलाचे ह्मणजे—जरी हें ह्मणणें नीटसें नाहीं तरी उदाहरणार्थ सांगतों कीं—हे आपण चवघे " राम लक्ष्मण भरत शत्रुघ्न " ह्मणसना ! ह्मणजे त्यांचा जसा एक दिल; व लक्ष्मण भरत शत्रुघ्न हे जसे रामाचे एकनिष्ठ सेवक तसे आपण या रामाचे (शिवाजीचे) होऊंया; किंवा वीरभद्र वगैरे जसे शिवाचे तसे आपण या शिवाचे!!!

ता०—(मिठी मारून) काय लाख रुपायांची गोष्ट सांगीतलीस! शाबास!!

बा०—आतां आणखी कोण बरें पाहिजे?

ये०—आतां मारुति आणि सुग्रीव हुडकले ह्मणजे वानर सेनेस हुडकावयाला नकोच!!

शि०—(अति हर्षानें) सख्यानों, काय हे तुमचे विचार!! या तुमच्या एक एक अक्षराची किम्मतरे होणार नाहीं!!!

ता०—कोणतेंही काम करणें झालें तरी मोठ्या धिमेपणानें, सावधगिरीनेंच केलें पाहिजे., "उतावळा नवरा आणि गुडघ्याला बाशिंग असें मात्र उपयोगी नाहीं.

शि०—हो. साधारण यःकश्चित् काम असलें तरी त्याचा पूर्वीं बराच विचार करावा लागतो. मग हें तर फारच अवघड व धोक्याचें काम; तेव्हां याचा पूर्ण विचार केला पाहिजे. कां कीं या कामांत पाऊल टाकण्यास आरंभ केला कीं पावलोंपावलीं विघ्नें उभीं राहणार — ह्मणजे घरच्यां पासून तों अंगणच्या पर्यंत—त्या सर्वांचें निरसन करून इच्छित कार्य तडीस नेलें पाहिजे.

बा०—खरी गोष्ट. विचार अवश्य पाहिजे; पण वानरा सारखा मात्र उपयोगी नाहीं. रात्रीं थंडी, वारा, पाऊस लागूं लागला ह्मणजे वानर ह्मणतो छेरेबा आतां उद्यां अवश्य घर बांधलेंच पाहिजे; पण उजाडलें कीं चालला या झाडावरून त्या झाडावर. रात्रींची आठवण कोणास? असें सर्वदा चालावयाचें!

शि०—अरे, त्याला झाडें तरी पुष्कळ असतात

उड्या मारण्यास! बरें असो.

ता०—तर मग बोलण्यांत रिकामा वेळ कां दवडतां?

शि०—काय करावयाचें बोल?

ता०—आतां लोक जमविण्याचा यत्न करावयाचा. उद्यांच निघावयाचें. प्रथम बाजीचे गांवीं जाऊं.

बा०—आमचे गांवचे लोक आहेतच असें समजा यां करतां मुद्दाम जाणें नको.

शि०—तरमग कोठें जाऊं येतां? कीं जेथें गेल्यानें नाट न लागतां गोळी लागू होईलच-

ये०—मला वाटतें (कानांत सांगून) त्या गांवांत गेलें असतां खचीत आपलें काम होईल.

ता०—हो हो. ते माझ्या ओळखीचे आहेत. एवढावेळ माझ्या ध्यानांतच आलें नाहीं. नंतर त्याच्या शेजारच्या गांवींही जाऊं. शिवराया, शिकारीची तयारी करण्याला आजच ताकीद दे. मनाचा उल्हास हाच सुमुहूर्त समजलास!

शि०—मी काय नाहीं ह्मणतों आहे?

ता०—पण शिवराया, आईला किंवा आजोबाला कळवून— बरें का नाहीं तर मागल्या सारखें—

शि०—छिः आतां तसें नाहीं व्हायचें.

ता०—आपलें काय गेलें? पडत्या फळाची आज्ञा घ्यायास? अमक्या ठिकाणीं जातों हें मात्र कळवावयाचें नाहीं. उत्तरेस सांगून पूर्वेस जायचें. संक्रांतच ही त्या जोडग्यांवर! (उजवा डोळा लवलासे जाणून) अरे हें पहा हा माझा उजवा डोळा लवतो आहे! हं बाजी, येसाजी, चला उठा. शुभस्य शीघ्रं! (जातात)

## प्रवेश २

### स्थळ—खेडेगांव पाटलाचें घर.

(बाजी पाटील व उग्या)

बा०—उग्या, कालसांच योक बामन देवळांत व्हता, त्यो हाय का बग.

उ०—त्यो फाटफटच ह्मन ग्येला. व्हय जाग्या ह्मनत व्हता.

बा०—थू त्येका! तर मंग ब्योत इस्काटला न काय!

उ०—योजी कसला ब्योत! तुमचत—कायीबी कळायच न्हाई!

बा०—(दूर पाहून) उग्या, कोणरे त्ये लईजन येत्यात? बग बग दर. झोर जा झोर.

उ०—(पाहून येऊन) माज्या वळकीच समद न्हाईत, पन तानाजीराव हायीतस वाटत.

बा०—ठ्येस ठ्येस! त्येका, जा जा बिगीन; आनजा बसाय हातरी घोंगडी काइबी. जा, जा ह्मनतोनी!

उ०—जी, आनतोपन. (आणून हातरल्यावर) ह्ये आल. उटा उटा.

(शिवाजी, तानाजी वगैरे येतात)

बा०—(सर्वांस मुजरा करून बसविल्यावर) आजचा दिस ह्योच्या भाग्याचा! कीं हे थोर मानूस आमच्या—

शि०—(मध्येच) हां हां; पाटील, जरा जपून बोला. जसा तानाजी तसाच मी!

बा०—ह्ये काय भलतेंच!

ता०—अरे बाजी, तें कांहीं तूं मनांत अं… नको. आतां पुढें कळून येईल.

बा०—बर असो. आज या सवाऱ्या हा… कुनीकड? शिकारिला वाटत!

ता०—होय. शिकारच साधावयाची.

शि०—तुमच्या सारख्याच्या भेटी घ्याव्या ह्मणून—आणि ती साधली ह्मणजे तीच मां…

ठी शिकार!

ता०—बाजीविशीं तें मनांत [illegible]णावयासच नको. त्याचें काय! तो [illegible]पला एकांड्या माणूस! चंल ह्मटलें कीं चालला. कां बाजी असेंचना?

बा०—तानाजीराव, [illegible]मी तर लईच उडीवली [illegible]ना! आसो, पन येन्याच कारन काय?

शि०—ही चावडीची जागा नव्हे, तरी पण एव्हां उपयोगी नाहीं, तर जरा एकीकडे.

बा०—वर हाय. चला माडीवर. (जातात)

## प्रवेश ३

## स्थळ—रस्ता

(विठोबा व सदाशिव)

वि०—सदाशिव, ते काल बाजी पाटलाच्या घरीं कोण आले आहेत रे?

स०—अरे तुला नाहीं काय ठाऊक? पुण्यास शिवराज म्हणून जाहागीरदार आहेत ते!

वि०—हां हां समजलों. आमच्या विजापूरच्या बादशाहाच्या पदरीं जे शहाजीराजे भोसले मोठे सरदार आहेत, त्यांचे चिरंजीव काय? ठीक ठीक! बरें पण ते इकडे कोणीकडे? त्यांच्या ताब्यांतला हा गांव नाहीं.

स०—काल आले आणि त्यांचें व आमच्या बाजी पाटलाचें रात्रीं कांहीं खलबत झालें, मग काय तें कळत नाहीं. पण आज चावडींत [illegible] येण्याची ताकीद झाली आहे, तेव्हां [illegible]ज काय आहे तें बाहेर पडेल.

वि०—असें काय? तर चल. (पाहून) अरे ही पहा! चावडी तमाम भरून गेली आहे! बाहेर देखील कित्येक उभे आहेत! एकूण स[illegible]ला गांव जमला आहे बोवा. चल आंत जाऊं.



(सर्व मंडळी बसते)

बा०—आयकाहो सर्व मंडळी, हे आमचे तानाजीराव काय ह्मणत्यात ते.

ता०—गड्यानों, मी तुमच्याकडे कांहीं मागण्याकरितां आलों आहें, आणि तें तुह्मी मला द्याल असें मी खास समजतों. माझें मागणें हेंच कीं मी व हे (शिवराजा) जें काय बोलतों त्याकडे नीट लक्ष द्या.

सर्व—ठ्येस ठ्येस!

ता०—तरमग प्रथमतां मी असें विचारतों, कीं प्रत्येक माणसाला आपल्या निर्वाहाची सोय जशी अवश्य करावयाला पाहिजे—ह्मणजे अन्नवस्त्र, तसेंच घरदार यांची तजवीज केली पाहिजे—तशीच वाघ अस्वलें इत्यादि दुष्ट जनावरां पासून जें नेहमीं आपणांस भय होतें, तें नाहींसें करण्याची तजवीज अवश्य करायाला हवी कीं नको? आतां प्रत्येकानें ही तजवीज करावी, असें ह्मटलें तर कसें होईल? पहा, घर एकटाच बांधीन ह्मणेल तर त्याला किती बरें अडचणी आहेत? घराला मातीच्या किंवा दगडाच्या भिंती, व साधें लांकडी काम कां होईना पण सुतार, लोहार तसेच गवंडी, पाथरवट, मजूर वगैरे जे पुष्कळ लोक लागणार त्या सर्वांचीं एकटाच कामें करणारा कोण बरें आहे? निरनिराळ्या लोकांनीं निरनिराळे धंदे उचलले तर ते चांगले साधून सर्वांचें काम होतें. असो, तर भया पासून रक्षण करणारे ही निराळे असलेच पाहिजेत. घातक जनावरें ह्मणा, दरोडेखोर ह्मणा असल्यांपासून आपलें रक्षण झालें पाहिजे कीं नको? या तुमच्या गांवच्या आसपासच्या जंगलांत आणि घाटा जवळच्या जंगलांत किती तरी वाघ, अस्वलें, डुकरें,

कोल्हे असलीं जनावरें असतीलच. मग त्यांच्या पासून तुम्हांस काय त्रास होतच नसेल?

बा०—ह्यो काई पुसू नगा. बगा, ह्यरवाच्याच दिशी, वागान त्या आमच्या धोंडी कदमाच्या मुलगी व—ती परसाकड बसल व्हती—नी झडप घातली. आमी दोन च्यार जन पल्याडच्या खळ्या मादि शेकत व्हतो बसल्यालो. ती वरडण्या बराबर लगाच आमी सगळ्यानी धामधूम केली म्हनून बगा ती निभावली! लागलाबिगल न्हवत. शेळ्या, मेंढ्या, गुर हीं न्हेमी चार दोन दिसानीं चाल्लीच हायेत.

शि०—असें काय! आणि तुमच्या गांवांत रक्षण करणारे सरकारी लोक नाहींत काय? किंवा ते नसतील तर तुमचा तुम्ही बंदोबस्त कां ठेवीत नाहीं?

बा०—या आमच्या सारक्या गावाला कुटलजी सरकारी लोक? त्ये म्होठ्या म्होठ्या गावात न आसत्यात. आमचा आमी ह्यवतो, पन त्यो काय न्हातो? दिसा ढवळ्या दिकील जनावर हिंडनार, मंग कुटवर त्येच्या माग आपल कामधाम सोडून लागायच? आन् ह्ये तरी कस सादत? हात्यार ना पात्यार! काटघा कुटयान व्हनार काय?

शि०—तुमच्या गावांत हत्यारें नाहींत?

बा०—कुटलीजी? काइ थोडी भूत व्हती ती बी दोन हैन झाल आसत्याल योक कारकुन आन् तीन शिपायी गडावयन येउन समदी झाडून न्हेली याक याक ह्येवल न्हाइ!

शि०—कां बरें? नेण्याचें कारण?

बा०—कुनाला ठाव? पन तरक आसा दिसतो का हात्यार रयत जवळ नसल्यावतो काय करनार? "काळ्या शेंडीच मानूस कोनत्या विळस काय करील येचा न्योम न्हाई" आस त्यो बोगडचा गेलेला खान न्हेयमी म्हनत व्हता, आन् त्येच्यामुळंच आस झाल नसल म्हनून कशा वरनं!

शि०—मग तुम्हाला मोठा त्रास होत असेल!

बा०—तरास म्हंजे काय इचाराव? लई—लानू लाया!

शि०—मग तुम्ही गडावर जाऊन किल्लेदाराशी कां कळवीत नाहीं?

बा०—धाईस येळ ग्येलो. बगा राव, कोन तरी दाद म्हनून न्हाईच! ह्यो कोन त्यो क नवा आलाया त्येनच आस केल.

शि०—हें मोठें नवल आहे. असो; पण अशानें मनुष्य सुद्धां एकादेवेळेस जायबंद व्हायचें! हें अरिष्ट टळण्यास थोडें आहे.

बा०—त्ये काय बर?

शि०—तुमच्या गांवांत तरवारीचा चांगला उपयोग करणारे किंवा नेम मारणारे लोक आहेत कीं नाहींत?

बा०—हाईत. निदान ईस पचीस तरी सापडत्याल. पन ह्येच कामकरन्यास कोन लागतो!

शि०—मी म्हणतों कीं याकामास फार नकोत, चारपांच असामी पुरेत. त्यानीं दुसरें कांहीं काम न करितां फक्त गांवची रखवाली करावी. आतां त्यांचू, त्या तुम्ही लोकांच्या मदतीची गरज लागेल त्या कोणी कोच्यानीं करावी.

बा०—आन् त्येच्या पोटापान्यास!

शि०—त्यांच्या पोटापाण्यास जो खर्च लागेल तो सर्व गांवकऱ्यानीं मिळून करावा. कां कीं सर्वांच्या हिता करितां ते लोक आहेत. तुमच्या गांवांत एकंदर किती कुळें

आहेत!

बा०—हाईत—दोन भदी—शे.

शि०—बरें. पांच असामींच्या खर्चास काय लागेल?

बा०—कसबी केलतरी आनपानी, लताकपडा मिळूनइयेनी धा रुपय तरी म्हैना हावतच.

शि०—तरमग तुम्ही पहा कीं, प्रत्येक कुळानें तीनें किंवा चार पैसे महिन्यास दिले म्हणजे सर्वांचें काम होतें; आणि प्रत्येकास तेवढे देण्यास फारशी अडचण नाहीं.

बा०—पन समंद लोक सारकच कुट हाईत? घेन बाल म्हटल म्हंजे बगा, लइ लई निगालत—पनास एक—व्हय इक्तच! तवा [illegible] खरच काय से देनार हायीत? [illegible] जे ठळाक ठळाक हायीत त्येच्याव—[illegible] बसावल; पन न्हयमी तसच चालत. [illegible] काय न्योम! आमच लोक लई गरीब; येक येक दिस काडपाल्याव—न्हाइत तसाच बी काडत्यात; म्यालमंजुरी करावी तर जागातरी कुटहाय? भल्ल धट्ट कद [illegible]त—नुकसान न्हाईत—पन—बार, क[illegible] कुनाकड गेलत—इयेर मापट लई [illegible] तर मिळनार! पैसच कोन घेतय? अन् दिल तरी पन कापाड आन् आसच घर मिनसाला नग काय? तवा ह्ये होन बगा लई कठिन!

शि०—बरें. सर्वांनीं म्हणजे पैसेच दिले पाहिजेत असें नाहीं. ज्यांना पैसे देण्याचें सामर्थ्य आहे त्यांनीं पैसे द्यावे, नाहीं त्यांनीं धान्य द्यावें. त्यांच्या तरी पोटाला धान्य हावेंचना? साळ्यांनीं वस्त्रें द्यावीं. आतां तुम्ही आपल्या गांवची गरीबी सांगितली ती कांहीं खोटी नसेल. पैसेनाहींत, पण धान्य ही देणें व्हायचें नाहीं असें म्हटलें तर बोलावयासच नको. बरें पण ही युक्ति तरी तुह्मांस आवडते काय?

बा०—हो हो! पन —

शि०—समजलों. पांचचार हत्यार बंद जर तुमच्या गांवच्या रखवालीस राहिले तर पुरतील कीं नाहीं?

बा०—आमच्या गावात हात्यारबंद लोक बी हायीत.

शि०—आहेत खरे. पण अगदीं त्याच कामासाठीं ह्मणून निराळे कोठें आहेत! बरें, तसले निराळे हत्यारबंद ठेवण्यास ज्या अडचणी आहेत त्या दूर केल्यातर!

बा०—त्ये कस काय?

शि०—तुमच्यापैकीं चांगले नेम मारणारे व तरवार वापरणारे पांच असामी निवडून काढा.

बा०—पाच न्हाइ धा घेतो!

शि०—मी असें ह्मणतों कीं, तुमच्या गांवच्या रक्षणाला लागणारा सगळा खर्च कोणी करण्यास तयार झाला तर त्याचे मोबदला त्याला तुह्मांपासून काय मिळेल? तसेंच चोर दरोडेखोर वगैरे यांपासून हो तुमचा बचाव केला, अथवा तुमच्या गांवाला दुसरी एखादी जडजोखीम कदाचित् लागली तर तीही थोडी बहुत दूर केल्यास कसें?

ता०—हो. कोणी झालातरी कांहीं फायद्यासाठीं उद्योग करतो कीं नाहीं? तशांत असल्या बिकट अडचणी दूर करणें ह्मणजे फारमोठी काळजी व जबाबदारीच होय; तेव्हां त्याच्या योग्य मोबदला मिळेल तरच कोणी आपले शिरावर घेईल. पहा, आपणाजवळ पैसा असला तरी कांहीं

एक फायदा नसल्यास सावकार कोणत्या तरी कुळास देईल काय? मग ही तर संरक्षणाची गोष्ट तेव्हां तसेंच त्याला मिळालें पाहिजे.

सर्व०— ( हर्षानें ) तस जाल तर सगळा गाव त्येचा बंदा हाय!

बा०— व्हय. ज्यो पालनारा त्यो मायबापच आन् धनी बी त्योच!

ता०— बाजी, समजा कीं या शिवरायानें जें वर ह्मटलें त्याप्रमाणें जर सर्व प्रकारें तुम चें रक्षण केलें तर त्यास तुह्मी आपला धनी मानाल काय?

सर्व०— ( मोठ्यानें ) व्हय व्हय. मानू ह्मजी काय? त्येच्यासाटी परानबी देऊ नी काय!!

बा०—आमास काय—कोनं का धनी आसना!

ता०— बाजी, हें बोलणें कठीण आहे. तुमचा हा गांव बादशाहाचे ताब्यांतला तेव्हां यास धनी—

बा०—पन आमचा सांबाळ त्या किल्लेदाराच्या हातन—न्हव—तकडुनबी नीट व्हत न्हाइत मंग काय कराव? बगा, आल्याड आल्याड ज्यो तरास, आन दुक नी काय काय ज्ये व्हतय त्ये—

ता०—असो, पण कदाचित् तसें झालेंच तर हें तुमचें ह्मणणें खरेंना?

बा०—तानबाराव, ह्यो पाय— ( शिवाजीचे पायास हात लावून ) समरून सांगतो का दगडावयची ऱ्याग!! पन—

शि०—ठीक आहे. आज फारवेळ झाला. आणखी दोन दिवसानीं तुह्मी आणि सांगितलेले तसे लोक घेऊन पुण्यास या, मग काय तें पुढचें बोलूं.

बा०—बर हाय ( मुजरा केल्यावर सर्व जातात )

## प्रवेश ४

## स्थळ—माडीवरची खोली.

दादोजी०— ( आपणाशीं ) आतां हा शिवबाचा खर्च आणखी किती वाढणार कळत नाहीं. अगदीं थोडा थोडा ह्मणतां खाणें पिणें, लताकपडा खेरीज करून दरमहा ३०० रुपये वाढला. आणि हा सारा बाहेरच्या लोकांकरितां! शिवाय या वर्षांत ९० घोडे नवे घेतले. आज ह्यास ठेवून घ्या, उद्यां त्यास ठेवा; होऊंदे खर्च, झाला तरी पण एवढ्यास घ्याच ठेवून असें त्याचें आलिकडे रोज चाललें आहे. पहा बरें! आलिकडे ह्मणजे या चार सहा महिन्यांतच किती मंडळी जमली आहे ती? लहान ह्मणून बोलतां येत नाहीं मला वाटतें असाच क्रम चालल्यास पुढचेच वर्षीं शिलकेस हात लावावा लागेल. बरें शहाजी महाराजांस तरी काय कळवावें? ते तरी मजकडेसच लोटणार, किंवा कांहीं तरी विलक्षण प्रकार ही कदाचित् होईल. कांकीं जिजाबाईवर त्यांचा राग आहेच. मिळून कुचंबणा माझी! मोठा होत जातो तसा लहानपणचा छंद कमी व्हावा, तो नहोतां उलटा वाढताच आहे. या मावळ्या पोरांनीं त्याला अगदींच वेडावून टाकिलें. सोडवावीं तर सुटत नाहींत; घालवुन द्यावीत तर हा रडत बसणार, तो बसला ह्मणजे आई का? आईच ती! तिचा सगळा जीव याबरच; आणि तेंहि खरेंच. तिला तरी दुसरें सुख कसचें आहे? शिवबाच्या अशा कृति आठवल्या ह्मणजे मोठा राग येतो, पण त्याचें तोंड दिसलें कीं तात्काळ तो नाहींसा

होतो! बोलणें किती गोड! नम्रता किती बरें!! उलट एक तरी अक्षर? मागणें सवरणें झालें तर किती अदबीनें आणि खुबीनें! नाहीं ह्मटलें तर तें वेळसे कांहीं न बोलतां संधि साधून मागायचें! कोण बरें अशी मर्यादा राखणार? मी खचित सांगतों कीं माझीं मुलें देखील याच्या शतांशानें माझी मर्यादा राखीत नाहींत! वास्तविक पाहतां तो धनी व मी चाकर. मग त्यानें माझें कां ऐकावें? थोरांचीं मुलें किती द्वाड, उद्धट, व मूर्ख असतात तें काय मी ऐकत व पाहत नाहीं? पण ही तऱ्हा कोठेंच यायची नाहीं. इतर मुलां प्रमाणें त्यानें माझें न ऐकावें, पण नाहीं. तो मला ज्या नावानें हाक मारतो त्याच नात्या प्रमाणें तो मशीं वागतो. बरें मागें तरी मला वाईट ह्मणतो? छिः नाहीं! त्याचे किती तरी गुण चांगले!! पण हा नाद भारी! कोणी आला—मला चाकरीस ठेवा ह्मणून—ह्मणजे आली वरात! आतां हें खरें कीं जें माणूस तो ठेवण्यास सांगतो, तें कांहींना कांहीं तरी गुणी असतेंच. आधीं सशक्त, मेहनती आणि विश्वासू. अशीं माणसें बाळगून हा करणार तरी काय? त्याच्या मस्तकांत काय शिरलें आहे कोण जाणें! आपल्या निवडक संवगड्या बरोबर त्याचें कांहीं रहस्य चालतें, पण बेटा एक तरी मारायला काढला तरी कबूल!! हे मावळे डोंगरी लोक हे! त्यांच्या संगतीनें हा देखील डोंगऱ्या बनेल. शिकारीचा तर भारीच नाद लागला आहे!! शिवबाची नेम धरण्याची व मारण्याची शैली बरी आहे. हो; आठ दिवसांपूर्वीं एक मोठा ढाण्या वाघना यानें मारला! मोठा धीट! बेटे ते तान्या बाजी वगैरे देखील तसलेच! हें सर्व बरें आहे पण हो; हे मावळे चोरटे हीआहेत—ह्मणजे हीं मुलें चोरटीं नव्हत!—पण एकंदर लोकच ह्मणाना. तेव्हां तसलें एकदां वेड याच्या मनांत भरलें ह्मणजे मग मात्र बघायस नको. हें खरें कीं, आमचा शिवबा तें रामोश्याचें काम करणार नाहीं. कांकीं त्याला कथा पुराणें ऐकण्याचा नाद भारी असून त्यांतल्या गोष्टी तो नीट लक्षांत ठेवतो. तो मोठा सदय व निंद्य कर्मास भिणारा आहे; तरी संगत काय नाहीं करणार? कोणाच्या संगतीनें काय परिणाम होतात हें त्याला चांगलें कळतें आहे; जिजाबाईचा व माझाहि त्याला बराच सहवास व बोध आहे, तेव्हां तो तसल्या फंदांत बहुशां पडणार नाहीं. तथापि अलिकडच्या त्याच्या जरा स्वेच्छ वर्तनावरून व मावळ्यांची फारच लगट व त्यांचा जमाव यांवरून जीव भितो. ईश्वर त्याला सुबुद्धि देवो झालें. हो बरी आठवण झाली— जिजाबाईनें याची त्या नव्या आलेल्या जोशीबुवा कडून पत्रिका करवा ह्मणून सांगितलें आहे, व त्यास बलावूं ही मी पाठविलें आहे, तेव्हां कदाचित् ते इतक्यांतच येतील.

(सटवाजी येतो)

स०—(मुजरा करून) ये जोशीबुवा आल्याती

दा०—हां बरें, त्याना माडीवर घेऊन चल मी येतों (जातात)

## प्रवेश ५

## स्थळ—मधल्या दिवाणखान्याची खोली.

(शिवाजी व तानाजी)

शि०—गड्या तानाजी, कालच्या कथेंतली ती अन्नापन्नाच्या राजाची गोष्ट ऐकल्या पासून मला चैन पडत नाहीं. माझ्या जिव्हाळीं जाऊन बसली आहे ती! काय करावें? तसला प्रसंग आपल्या कपाळीं कोठलारे गड्या! मित्रा, काय त्या राजाचें वर्णन करावें! मला वाटतें या लोकांत त्याच्या योग्यतेचा दुसरा कोणी नाहीं.

ता०—काय बादशाहाहून त्याची योग्यता ज्यास्त?

शि०—छिः! माझ्या बोलण्याचा हेतु तुला अजून कळला नाहीं. अरे, ज्यानें एवढ्या मोठ्या सार्वभौम बादशाहाला जें उत्तर पाठविलें तें फारच बाहदुरीचें!! आणि खरोखरच जर त्याची प्रजा आणि तो तसे असतील तर तो राजा बादशाहाहून ज्यास्त योग्यतेचा ठरतो.

ता०—खरें खरें, आतां माझ्या ध्यानांत आलें. बस बस, तो राजा खरा!! मग शिवराया, कायरे तुला तसें करतां येणार नाहीं? काय त्याची बिशाद! गड्या, खरेंच म्हणशील तर मला मोठा हुरूप आला आहे! लोक जमवूं काय?

शि०—दमधर. सख्या, अशी घाई करूं नको. कोणतें एखादें काम करावयाचें म्हणजे तुम्ही भारी गडबड! "सहसा विदधीत न क्रिया" हें ध्यानांत आहेना? कांहीं प्रसंगीं तीं उपयोगी पडत नाहीं. तोंडानें बडबड करून काय कामाची? बरें त्या राजा सारखें आपणा जवळ कायरे साधन आहे?

ता०—साधन नाहीं काय? तुला किती लोक हावेत!

शि०—नुसत्या सड्या सोटांस घेऊन काय करावयाचें? हत्यारें, पैसा, लत्ताकपडा, धान्यसंचय, दारूगोळा वगैरे कांहीं नको काय? यांतलें कायरे आहे? असो, पण थांब, कोणी बाहेर आलेसें वाटतें. (दार उघडून) अरे ही तर आईच!!

जि०—(शिवाजीस उजवीकडे व तानाजीस डावीकडे घेऊन) कां काय चाललं होतं? आज कुणीकडे तरी जायचा बेत आहे वाटतं.

ता०—आज कुणीकडे जायाचा तर नाहींच—पण—

जि०—तर काय वेगळाच आहे? कसलारे तो!

ता०—कसला बेत न कसचें काय! या तुमच्या शिवबाचें माथीं रोज फिरतें! आज काय अमूक, उद्यां काय तमूक. त्याला घोडा ना बुडखा!! आपला बडबडतो कांहीं तरी — उचलतो जीभ लावतो टाळ्याला!

जि०—(किंचित् हंसून) होयरे शिवबा?

शि०—भले राव तानबा! आपण असले लुटपे हें मला माहीत नाहीं. कोणरे एवढा वेळ बडबड करीत होता? दुतोंड्या!! तूं एक आपला थट्टेखोर — नव्हे लबाड माणूस आहेस.

ता०—अं:! इतकेंचना! आई, तो कांहीं का म्हणेना? पण हे आतांच्या—सांगूं?

शि०—[किंचित् रोषानें] जा—सांग. आज पासून—

ता०—[हंसून] हां हां! आलां काय बेतावर? अर्धी ऐक तरी—

जि०—शिवबा, असें काय आहे तें, तूंच सांगसना?

ता०—[थट्टेनें] ते काय सांगतात? अजून ओठाचें दूध—

शि०—[त्रासानें] हां हां! हे मात्र थोरले मिशाळ! नव्हे—दाढीवाले—बोकड—!

जि०—थांबरे. शिवबा; असें काय ह्मणतोस! सांग तर खरें.

ता०—तो नाहीं सांगेना मी सांगतों. याचें मन काल्च्या कथेनें बिघडलें!

जि०[ चकित होऊन ] काय! कथा आयिकली ह्मणजे मन बिघडतं! हें तर तू नवलच सांगतोस! आणि यानं काय आजवर थोड्या कथा आयिकल्या!

ता०—मग कथा पुराणांचाच हा परिणाम; नव्हे तर काय! याच साठीं मीं फारसा जात नाहीं. या असल्या कोवळ्या मुलांच्या मनावर एकदां का तसला ग्रह बसला ह्मणजे तो जातो कशाला! कथा पुराणें ऐकूं नयेत असें जरी मी ह्मणत नाहीं तरी असले वेडे पीर मात्र त्या ठिकाणीं जातां कामा नये. आई, तूं आतां काय पाहिजे तें कर, पण याच्या राशीस जो हा ग्रह आला आहे, तो शेवट पर्यंत जायाचा नाहीं हें माझें माकीत तू खरें समज. मला असें झालें आहे कीं मी को ठून याची संगत केली. ह्मण आहेना —"आधीं गुंतूं नये आणि गुंतल्यावर कुंथूं नये" तेव्हां आतां काय होईल तें होवो, शेवट पर्यंत याला सोडायचें नाहीं. पण आई, या दुनियेंत कथेनें किंवा पुराणानें बिघडलेलें माणूस मिळून एवढेंच! आणि एकादें दुसरें असलेंच तर तें याचेंच भावंड किंवा सोबती!! घटकाभर मीच ह्मणसना!!! बरें असो; ऐक. हो, काल्च्या कथेंत हरदास बुवानीं सांगितली एक गोष्ट जनांत, आणि ती शिरली — नव्हे भरली—याच्या मनांत!

जि०—बा! एकूण तुझ्या नाहींना!

शि०—होय ह्मणून कोणत्या तोंडानें सांगेल! आंत निराळा बाहेर निराळा!

ता०—कां होईना!

जि०—काय बरं ती गोष्ट! ऐकूं तर खरी!

ता०—ऐक. काय बरें ते—हो. मन्नापन्ना ह्मणून ह्मणे एक तिकडे कोठेंसें संस्थान कीं राज्य आहे. त्यांत हिऱ्याच्या खाणी फार चांगल्या आहेत. मोठे मोठे उंची हिरे त्यांत सांपडतात. तेव्हां त्या खाणी आपल्या हातीं असाव्या असा दिल्लीच्या पादशाहाला सुटला लोभ आणि तशा रीतीचा लिहिला हुकुम! त्यावर त्यानें ही कायसा नन्ना सारखाच दिला जबाब. मग काय! गेली बादशाहांची तबेत! झाली खप्पा मर्जी न काय!! लोकांचो जातच अर्जुन! पडले अकलेचे खंदक! आले बेतावर पण कोणी शाहाण्यानें सल्ला सांगितली, कीं अगोदर ह्मणे त्यास असें असें लिहून पाठवा, त्याचें उत्तर येईल तसें मग करावें.

जि०—काय पाठविलं होतं लिहून!

ता०—कायसें त्या बुवानें ह्मटलें होतें त्या नोकऱ्याच्या भाषेंत—कोणाला आठवण आमच्या या रावजींच्या ध्यानांत असेल तर—हे राव— लिहिण्या वाचण्याच्या नांवानें भोपळ्या एवढें— किंवा समुद्रांतले ( शंख ) पण तोंडचे भले—!! काय हो, आहे का ध्यानांत! एक पाठी आहां तुह्मी! आह्मी आपले खंदकच!!

शि०—( हसून ) हं:! बेल्याच्या जिभेला हाड नाहीं ह्मणूनच बरें! तान्या, तूं तर नारद बनलास बुवा!

ता०—आह्मी आपले नारद! तुह्मी तर शंभु महादेवना! बैलेश्वर!

शि०—( मनांत हसुन पण बाहेर राग आलासे

दाखवून) बरें बरें! तान्या, जरा जीभ आखूड करायला हवी!

ता०–( घट्ट मिठी मारून ) शिवराया, तुझ्याच गळ्याची शपत—मी आपला सहज बोललों. सख्या, तूं जर रागावलास तर मला या जगांत कोणरे आहे?

शि०–(मोठ्यानें हंसून) आई, बघितलेंस! हा पक्का सोदा आहे! दाढी धरून पाय तुडवायचा! भलारे भोळा!!

ता०– बरें असो, पण खरोखरच सांगतो, कीं मला तर तसली आठवणच राहत नाहीं. तसल्या कामांत तुझीं—बरीच चालते.

शि०–बरें बरें! ऐक — बादशाहानें लिहून पाठविलें तें—

### दोहरा.

कोसहाय कइमत दइ,
कतक सिपाही साथ ॥
लढन चहत हो साहसे,
कतक खजाना हात ॥ १ ॥

जि०–जळं मेलं! काय हें हिडिस्स! यांत काय समजावं बाई?

शि०–आई, याचा अर्थ असा—हे राजा, या तुझ्या लिहिण्यावरून तूं लढण्यची इच्छा दर्शावितोस तर तुला असा साह्यकारी कोण आहे? तुला हा उपदेश कोणीं केला? माझ्या सारख्या संपन्न सार्वभौमाबरोबर लढण्यास तूं किती दिवस टिकशील? ह्मणजे तुझ्या जवळ शिपायी व खजिना किती आहे?

ता०–ओ हो! बरा बाबा, तूं अर्थ देखील ध्यानांत धरलास! अरे, मला कांहींच आठवेना!

जि०–बरं मग त्यावर त्या राजानं काय लिहिलं?

शि०–त्यानें उत्तर पाठविलें तें असें

### दोहरा.

हर सहाय जइ मत दइ,
मुलुख खजाना हात ॥
लोभत जे लोहा गये,
बहुत सिपाही साथ ॥ २ ॥

अहाहा! किती योग्य उत्तर!! आई, याचा अर्थ—ह्मणजे त्यानें असें सुचविलें कीं, मला शिवशंकर साह्यकारी आहे, आणि त्यानेंच मला मत दिलें; माझा सगळा मुलूख हाच माझा खजिना होय; व या खजिन्याचे अभिमानी व त्याच्या रक्षणासाठीं शस्त्र धरून प्राण देण्यास तयार जी माझी प्रजा हेच माझे शिपाई!!

ता०–( हर्षानें ) बस बस! क्या बात है!!!

शि०–आँ? तुला मुसलमानी येतें काय?

ता०–छिः! अरे एकादा ऐकलेला शब्द! आई, या उत्तरांत काय खुमारी आहे ती ज्याची त्यालाच ठाऊक! आमचे हे राव तर तें ऐकल्या पासूनच असे अगदीं गर्क होऊन गेले आहेत. दुसरें तिसरें कांहीं सुचत नाहीं; तसें आपण व्हावें हेंच त्याच्या मनांत घोळत आहे.

जि०–( हर्षून ) अरे पण तानाजी, त्या राजानं तरी एवढ्या मोठ्या पाछायाला काय अगोदर लिहिलं होतं? अगदीं नाहीं देत का ह्मटलं होतं?

ता०–हें असलें तें याला विचार. आमचें काम नव्हे तें!

शि०–छिछि! बेटयाचें नांव ठेवणारा कोण चतुर होता कोणास ठाऊक! असो; बादशाहाचा हुकूम आला, कीं खाणी आमच्या स्वाधीन कराव्या. आई, आतां तूंच पहा

बरें, कीं त्या खाणी ह्मणजे त्या राजाचें सर्व उत्पन्न किंवा प्राण ह्मटलें तरी चिंता नाहीं, मग त्या कशा बरें देववतील? तेव्हां नाहीं असें तर निक्षून ह्मणतां येईना, ह्मणून खुबीचें उत्तर पाठविलें तें असें—वेतनाला वांचवावें हा क्षत्रियांचा मुख्य धर्म, या साठीं शस्त्र प्राण व खाणी हजर आहेत.

ता०—अहाहा!! काय यांत खुबी कीं लढाई करून आमचे प्राण गेल्यावर खाणी मिळतील! शाबास! धन्य तो राजा!! त्याचें वर्णन करावें तितकें थोडेंच! शिवबा, मग करें काय?

शि०—तोच विचार कायम.

जि०—कायरे बाबानों, कसला विचार?

शि०—आई, तुला विचारल्यावांचून पाणी सुध्दां पीत नाहींना? हेंही कळवीन पण एव्हां नाहीं. कांकीं गर्भांत जें आहे तें अमुकच होईल हें कळत नसतें ह्मणून बोलूनये.

जि०—बरं. पण भलता सलता विचार करून फुकट—

शि०—तसें कांहीं नाहीं. सगळें तुला कळेलच. तानाजी चल. (जातात)

तृतीय अंक समाप्त.

## प्रवेश १

## स्थळ—रस्ता.

(हरीपंत व रामराव)

ह०—रामराव, अहो रामराव, इतक्या लगबगीनें कोणीकडे?

रा०—हरीपंत, तुह्मांस नाहीं का ठाऊक? आज वाड्यांत कीर्तन आहे, तेव्हां सर्व तयारी करण्यास मला खुद्द महाराजांनीं सांगितलें आहे.



ह०—बुवा कुठले आहेत?

रा०—कायसे पन्हाळकर ह्मणतात. नांवाबिंव माहीत नाहीं.

ह०—हां हां! ते दत्ताचे देवळांत उतरले आहेत, ते का बुवा! आणि त्याचें कीर्तन वाड्यांत होणार? नशीब!

रा०—कां हो? नशिबावरसे गेलेत?

ह०—अहो, तो बुवा आहे अर्धा एकटा, दुसरा कोणीही बरोबर गडीमाणूस सुद्धां नाहीं; विणा टाळ देखील बरोबर नाहीं, ही सामानादिकांची तयारी! दिसण्यांत मेषपात्र!वेष भिकाऱ्याचा! तेव्हां हे वेडेंविद्रें ध्यान उभें राहणार काय आणि कथा करणार काय? हं:! या असल्याचें जेव्हां वाड्यांत बोट शिरकलें, आणि खुद्द महाराजांनीं तयारी करण्यास सांगितलें ह्मणतां, तेव्हां नशीब नव्हे तर काय? गांवांत तर याला विचारणारसुद्धां कोणी नाहीं. अहो, एकटा कां असेना, पण दिसण्यांत फक्कड! पागोट्याची अक्कड! तें कांहींच नाहीं; आहे मावळभट!! बरें बोलण्यांत तरी—एकेक शब्द निघण्यास एकेक घटका! महाराज आपले दयावंत एवढेंच काय तें. कोणी कसाही येवो—कथेकरी—मग तो टाळकुट्या किंवा ताकपिठ्या कां असेना—पुराणीक तसाच—तमासगीर येवो—बहुरूपी आला तरी सपच!! अहो, काल संध्याकाळीं देवदर्शनास गेलों, जवळ जाऊन बसलों, तेव्हां सहज बोलतां बोलतां मी त्याची परीक्षा केली.

रा०—असो, आपणांस काय! हुकमाचे चाकर—तयारी केली पाहिजे—

ह०—करा तुह्मी. पण खास सांगतों, कीं याची हुर्यो हुर्यो होऊन शेणमार दे-खील— अहो, जेथें मोठमोठे विद्वान् व रसिक सात सात आठ आठ मं-डळी ज्यांच्या बरोबर अशांची डाळ शिजायची तेथें हें पिशाच उभें रा-हणार! असो गम्मत तर बघूं!

रा०—केवळ बाह्य शोभेवर किंवा शुष्क डौलावर काय आहे? कोणाचें ज्ञान किंवा गुण कसे आहेत हें काय एक-दम कळतें?

ह०—अहो, तसें असतें तर—-बरें एक माणूस तरी—-तेव्हां काय—-उघडच—-

रा०—कसेंही असो, मला लौकर गेलें पाहिजे.

ह०—बरें चला. आह्मीही एक घटकेनें येतों. (जातात)

## प्रवेश २

## स्थळ — दरवाज्या पुढील जागा.

(रामराव व जनोबा)

रा०—(आंतून येत होता त्यास) जनोबा, तयारी कुठवर आली?

ज०—आंत येऊन पहा ह्मणजे सर्व क-ळेल.

रा०—आंतच येऊन पाहावयास पाहिजे असें नाहीं

ज०—नाहीं. पण एकदां पहा तर खरें.

रा०—(आंत जाऊन व पाहून) शाबास ज-नोबा! मोठाच थाट केलास! बाबा, तुला बिलकूल सांगावयास लागत ना-हीं. या कामांत तूं मोठा पटाईत झा-ला आहेस बोवा!

ज०—ही इकडे खाशी बैठक पहा.

रा०—(पाहून) आतां ह्मणून शिकस्त झा-ली! आजचा रंग कांहीं निराळा दि-सतो बाबा!

ज०—तो काय?

रा०—पहा, इतके दिवस वाड्यांत कीर्तनें झालीं, पण स्वतां महाराजांनीं तयारी करण्यास कधींही सांगितलें नव्हतें; आज मंडळीही बरीच जमणार अ-शी वदंता आहे; तूं तर नेहमीं पेक्षां ज्यास्त तयारी केली आहेस; आणि हरदासबुवा एकटे!!

ज०—(हळूच) काय हो, गांवांत तर व-दंता उठली आहे, कीं तो हरदासबुवा नसून कोणी भ्रमिष्ट आहे.

रा०—कोणाला ठाऊक. तो अर्धा काल दुपारीं या गांवांत आला बरें तो आजूबाजूच्या कोणत्या गांवांत कथा करीत होता असेंही ऐकिवांत नाहीं. मग लोकांनीं त्यास भ्रमिष्ट कसा ठ-रविला असेल तो असो. सूर्य जयद्रथ किंवा घोडामैदान जवळच आहेना! पण इतकें खचित कीं कांहीं तरी गुण असल्या वांचून महाराज सांगतेना.

ज०—तेंही संभवतें. (समोर पाहून) ही पहा मंडळी यावयास लागली.

रा०—ठीक आहे. तूं येतील त्यांस नीट बेतानें जेथल्या तेथें बसव, आणि बुवांना माणूस पाठव. मी महाराज व दादा साहेब वगैरे मंडळीस वर्दी देतों.

ज०—हा मी निघालों. (जातात)

# प्रवेश ३

## स्थळ—कीर्तन मंडप

( दादोजी, शिवाजी, तानाजी वगैरे मंडळी एकीकडे व वैदिक शास्त्री पंडित वगैरे दुसरीकडे, आणि बायका चिकाच्या पडद्या आड असा सर्व समाज आपआपल्या जाग्यावर बसतो )

हरदास.—महाराज, सर्व सज्जन हो, माझी थोडी प्रार्थना आहे तिकडे सर्वांनीं लक्ष द्यावें. मी एकटा आहें; कीर्तन करून त्यावर उपजीवन करणें हा माझा व्यवसाय नसल्यामुळें बरोबर दुसरें कोणी नाहीं. देशोदेश फिरावें, लोकस्थिति पहावी, कोणी ह्मटल्यास कीर्तन करावें, व्याख्यान देण्यास सांगितलें तर तसें करावें, पुराण ह्मटल्यास तेंही. तथापि कीर्तन, पुराण हीं आलीकडे जशीं करण्याचा किंवा सांगण्याचा प्रघात आहे — ह्मणजे कोणतें तरी पुराण किंवा भारत, भागवत अथवा रामायण यांत लिहिलें असेल तें वाचून त्याचा अर्थ सांगणें किंवा याच विषयास लक्षून कीर्तन करणें, हेंच मात्र मी करीत नाहीं; तर सांप्रतच्या कालदेशवर्तमानास अनुलक्षून तशा प्रकारचें वर्णन करणें हें होय. या कारितां ही नवी पद्धति असल्यामुळें आरंभ करण्यापूर्वीं सूचना केली. मी वित्पन्न नाहीं, मला संस्कृत येत नाहीं, मला गातां वाजवितां मुळींच येत नाहीं, त्याला ताळतंत्र अशा या माझ्या कृतीस कथा हें नांव शोभत नाहीं. कांकीं बाकीच्या कथेकऱ्यांपाशीं जसें संगीत असतें तसें मजपाशीं नाहीं. बरें नकला, नाना तऱ्हेच्या गप्पा गोष्टी सांगून रंजन करणारे कित्येक आहेत, तसा ही माझा प्रकार नाहीं. तरमग आहे तरी काय? असें ह्मणाल तर कीर्तन शब्दाचा वास्तव अर्थ जो—ईश्वराचे वतद्भक्तांचे गुण वर्णन करणें — तें करावयाचें, व तेणेंकरून स्वकीय देशबांधवांस सद्यःस्थितींत काय करावें एतद्विषयीं सूचनापर दोन शब्द सांगणें आहे. आणि या साठींच कथा करणार लोकां प्रमाणें सरंजामाची मला आवश्यकता नाहीं. अशा तऱ्हेचा प्रसंग ऐकण्याचा आपणांपैकीं कोणासही नाहीं ह्मणून ही माझी आरंभी सविनय प्रार्थना आहे. सद्गृहस्थहो, आपणांस जरी हें रुचणार नाहीं तरी आपण व मी यांचें नातें पितापुत्रवत् आहे, तस्मात् कसले ही वेडे वाकडे शब्द माझ्या तोंडांतून निघाले तरी आपण श्रवण करून त्यांत कांहीं घेण्यासारखें सार असल्यास घ्यावें. कांकीं ह्मटलें आहे — "सुपसे त्यजुनी दोष, गुणा घेतात सज्जन." तेव्हां याहून ज्यास्त सांगण्यास नकोच, असो. या माझ्या कृतीस व्याख्यान हें नांव शोभणारें आहे, तथापि ज्यापक्षीं कथा आहे असा लोकापवाद आहे, त्याअर्थीं एथें सर्व सरंजाम तयार असायचाच तर तो आणवावा, पण त्यांचें काम त्यांनीं बजवावें. ( असें ह्मटल्यावर तयारी झाली, नंतर आरंभ होतो. ) ( आठवलेंसें करून ) महाराज, थोडें सांगायचें चुकलें तें हेंच कीं, मी पूर्वींच सांगितलें आहे कीं मला संस्कृताची माहिती नाहीं त्यामुळें संस्कृत नसल्यानें पंडित शास्त्री इत्यादिकांना वाईट वाटेल व ते नाक मुरडतील

तर त्यांनीं क्षमा करावी. कारण असें आहे कोणी कवी ह्मणतो कीं देवांस सर्वोत्कृष्ट अमृत प्राशनास असतांही ते देवांगनांच्या वदनांतील मदिरेला इच्छितात; ह्मणून माझी जरी एथून तेथवर प्राकृत वाणी आहे, तरी सार ग्रहण करणें सुज्ञांचें काम आहे. तसेंच नकला वगैरे नसल्यानें तदिच्छुजनांनीं ही क्षमा करावी. हें पाणी मिश्रित दूध नाहीं, निवळ पाणी आहे, तरी ज्याचे अंगांत पाणी आहे तो हें प्राशन केल्यावांचून राहणार नाहीं, असो. आतां आरंभ करतो.

नमन.

श्लोक० मालिनी. प्रथम नमन माझें भालचंद्रा गणेशा, सकल भजक विघ्नां पाववी जो विनाशा ॥ अभि[1]मत फलदाता वंद्य जो देव वृंदो[2], स्मरहर[3]सुत देवो ज्ञान या बुद्धिमंदा ॥ १ ॥ श्लो० शार्दू० जी कंठीं धरि शुभ्र[4]कुंदसुमनोमाळा सदा नूतन, जी वीणा करिं घेउनी विधिसभेमाजी करी नर्तन ॥ जी ब्रह्माच्युतशंकरादिकसुरां वंद्या अशी माउली, धीनें[5]ड्या हरूनी करो विधिसुता ती सत्कृपासाउली ॥ २ ॥ श्लो० अनु० गुरुब्रह्मा गुरुविष्णु, गुरुदेव महेश्वर ॥ गुरु साक्षात परब्रह्म, त्या श्रीगुरुला नमू ॥ ३ ॥ श्लो० इ० व० जिं-कोनसे मू[6]क ब्रहस्पतीतें, लंघीनसे पंगु महा गिरीनें ॥ ज्याच्या कृपेनें नमितो तयाला, श्रीशंभुदामोदर या दयाला ॥ ४ ॥ श्लो० वसं० अज्ञान जें हृदयिंचें हरितें जनाच्या, जें कामना पुरविलें अवश्या मनाच्या ॥ जें छेदितें त्वरित सं[1]सृतिबंध जाला, ध्यावें तया सतत शंभुपदांबु जाला ॥ ५ ॥

( असें नमन केल्यावर साष्टांग नमस्कार घालतो व मागील मंडळी ह्मणते, नंतर उठून ) पुंडलीक० पार्वतीपते० सीताकांत० श्रीगुरुदेवदत्त. ( परब्रह्मराजीवलोचन नमो या चालीवर ) प्रबंध. परब्रह्म शंभो सदाशिव नमो ॥ ध्रु० ॥ गिरिजेश सुरमणीय गुणधाम पशुपते ॥ १ ॥ भक्तकामपूर्णकर त्रिपुरदैत्यांतक प्रभो परमेश्वर महेश वि[2]बुध वंद्य जगत्पते ॥ २ ॥ सकल माया हरूनि दे [3]यां विमल कीर्ति, खलनायक मथन हेंच देइ, मज न आवडे भलतें, अतिकृपा हो तव भरत [4]र्षावरतो, पार्वतीश चरण नमुनि मागें, तुजच नाम तें शिव हें शोभतें, पर०॥ ३ ॥ पुंड० पार्व० सीता० ( नंतर पुढें होऊन ) श्लो० भुजं० उरे कीर्ति मागें क्रिया ते करावी, नरें ना तरी कांसया हे धरावी ॥ तनु श्वानवृत्ती धरी जीवनार्थ, अभागी तयाचें जिणें होय व्यर्थ ॥ ६ ॥ ( भजन ) शिवहरशंकर स्मरारे, भव सागर हा तरारे. ( मूळ श्लोक ) उरे कीर्ति इ०

( उपोद्घात ) आदौ —— कीर्तनारंभाचे ठायीं महाभगवद्भक्त अ[5]परोक्षसाक्षात्कारानुभवी समर्थ महाराज, अनंत क्लेशांनीं व्याप्त अशा जीव मात्रास अवलोकन करून सद्गदांत:करण होत्सातें ह्मणतात —— बाप हो, हे संपूर्ण जीव जे आहेत त्यांचे मागें हा प्रपंच लागला आहे. महाराज, काय चम-

१ इच्छित २ समुदाय ३ मदनांतक (शिव) ४ पांढऱ्या कुंदपुष्पांच्या माळा ५ बुद्धीच्या मंदपणा ६ मुका.

१ संसार. २ देव. ३ जिवरायाला—यांत मला. ४ भरतखंड वर (हिंदुस्थानावर) ५ डोळ्यांसाठीं. ६ प्रत्यक्ष देवांचा अनुभव ज्यांस असे.

त्कार सांगावा! हा प्रपंच कसा आहे तर कवि वर्णन करितात —श्लो० शिख० कुठें ज्ञानी चर्चा करिति कलहा मद्यप कुठें!, कुठें वीणा वाजे सदसि पथिं शङ्खध्वनि कुठें! ॥ कुठें न्यायें घेती नृप कर लुटालूट करिती!, सुधेनें कीं द्वेडें युत मज कळे संसृति न ती! ॥ ७ ॥ असा जो हा संसार तो मोठा अपार दुस्तर समुद्रच होय; यांतून तरून पार जाण्यास परमेश्वराचीच कृपा झाली पाहिजे. हा प्रपंचरूप समुद्र कांहीं सामान्य नव्हे तर क्षिरक्षारादि जे सप्त महा समुद्र या पृथ्वीचे सभोंवतीं आहेत, त्यांच्याहूनही अति विस्तृत आहे. मासे सुसर वगैरे या समुद्रांत कोठें आहेत म्हणाल तर कवि म्हणतात—श्लो० वसं० क्लेशादिपंचक तरंग समूह वाहे, दारात्मजादि झष संघ जयांत राहे ॥ कंदर्पजाल वडवाग्निहि कोप पाहे, संसार सागर असेचि असा नृपा हे ॥ ८ ॥ तेव्हां अशा प्रकारचा जो हा अद्भुत सागर यांतून भगवत्कृपेविना पार पडणें होणेच नाहीं. योगींद्र सांगतात—हे राजा जनमेजया, हा संसार हें एक मोठें गहन अरण्य आहे पहा — अभंग. नव्हे हा संसार दुर्गम कानन, व्याघ्र सिंह जाण क्रोध काम ॥ १ ॥ इच्छा तृष्णादिक घातक डाकिणी, माया हे स्वामिणी मुख्य त्यांची ॥ २ ॥ आप्तवर्ग सारीं ग्रासितातीं भुतें, सोडविना मातें कोणी एक ॥ ३ ॥ म्हणोनिया दत्ता मारिनों मी हाका, मजभोंतीं वकीं चक्र ठेवी ॥ ४ ॥ ॥ ९ ॥ असो; तर भवसमुद्रांतून किंवा भवारण्यांतून पार पडण्यास भगवत्कृपाच पाहिजे. ती ज्यांनीं संपादिली त्यांचीच कीर्ति मागें राहते. म्हणून म्हणतात—उंर०

आचार्य म्हणतात — बापा, हा नरदेह परम दुर्लभ! तो तुला प्राप्त झाला असतां व्यर्थ घालवूं नको, कारण हा वारंवार मिळणारा नव्हे. पहा —गीति.— नरपशु विहंग कीटक, कृमि ऐशा योनि लक्ष चौंऱ्यांशी ॥ कर्म निबद्ध क्लेशां, भोगी तो एक एक फेऱ्याशीं ॥ १० ॥ तेव्हां असा चवऱ्याऐंशी लक्ष योनी फिरल्यानंतर प्राप्त होणारा जो नरदेह त्याचें सार्थक न करणाऱ्या नरास काय म्हणावें? पंडितांची उक्ति — श्लो० शार्दू० जी विद्या कवितेविना क्षितितळीं जें भाग्य दाना विना राया धर्म कृपेविना नरपती जो राज नीती विना ॥ जो सूनू विनयाविना कुलवधू जी स्वामि भक्तीविना, मिथ्या भोग ही जो विना सुरमणी जें जन्म कीर्ती विना ॥ ११ ॥ आणखी पहा—श्लोक उप० शरीर सारें हि जनावराचें, कामास येतें नच कीं नराचें, ॥ करील मोठी करणी आहे तो मनुष्य नारायणरूप होतो ॥ १२ ॥ तस्मात्, मनुष्यजन्म ज्याला प्राप्त झालें आहे, त्यानें आपलें नांव आपल्यामागें चिरकाळ जेणें करून राहील तीच क्रिया केली पाहिजे. नाहींतर श्वानसूकरादिक काय थोडे प्राणी आहेत? आचार्य म्हणतात — गीति. — भ्रमतां भ्रमतां चरमीं, नरदेहीं अग्रजन्म वश जमी ॥ स्वकुलाचारविचार—श्रुत्यध्ययना न वर्ततो करुनी ॥ १३ ॥ तेव्हां या कर्मभूमीचे ठायीं मनुष्यजन्म फारच

१ वेदशास्त्र संबंधी वाद. २ दारू पिणारे. ३ सभेंत. ४ विचारें. ५ मरेंडला ६ आ । ७ दारात्मज=स्त्रीपुत्र. ८ मासे. ९ मदन १० पहारा

१ पक्षी. २ उत्तम स्त्री ३ शेवटीं. ४ ब्राह्मण. ५ जन्म,

दुर्लभ, त्यांत श्रेष्ठ कुळांत ह्मणजे ब्राह्मणादिकुळांत झालें असून व सर्व इंद्रियें यथास्थित असतां व ज्ञान प्राप्त झालें असतां हो परमेश्वराच्या या अपूर्व देणगीस जो व्यर्थ दवडितो तो समर्थ ह्मणतात —— श्लो० शालि० —आला आला प्राणि जन्मास आला, गेला गेला बापुडा व्यर्थ गेला ॥ जेणें मागें ठेविली कीर्ति नाहीं, देशाधर्मासाठिं केलें न कांहीं ॥ १४ ॥ जो स्वदेश व स्वधर्म यांच्या रक्षणासाठीं कांहींच उद्योग करीत नाहीं तो या पृथ्वीला भार भूतच होय.

आतां कीर्ति संपादक पुरुषास अनंत कष्ट भोगिले पाहिजेत, समयीं प्राणही धोक्यांत घातले पाहिजेत; तेव्हां एवढा खटाटोप कोण करतो? मागें कीर्ति नाहीं राहिली ह्मणून काय झालें? शरीराला इतकी मेहनत कां द्यावी? शरीर रक्षण करणें हाच धर्म; "आत्मानं सततं रक्षेत् दारैरपिधनैरपि" इ० वाक्यें प्रसिद्धच आहेत. तेव्हां शरीर रक्षून मिळाली तर कीर्ति मिळवावी; आपण मेलें जग बुडालें. अशा तऱ्हेचे ह्मणणारे ते मूर्ख. कांकीं हरएक प्रकारें शरीर रक्षण केलें तरी तें नाश पावणार नाहीं काय? तें असेंच चिरकाळ राहील काय? आजपर्यंत कोणाचें राहिलें आहे काय? छि छि! कधींही राहणार नाहीं. देह कसा आहे ह्मणाल तर कवि ह्मणतात —— पद. —— देह जायाचा जायाचा, कांहीं नाहीं राह्याचा ॥ ध्रु ॥ आकाशादिभूतें[1] पांच, देह घडला सांही साच ॥१॥ पांच भूतें पांचा ठायीं, मिळोनिया जाती पाहीं ॥२॥ पुढें काय उरलें बारे, झालें देहाचें मातेरें ॥ ३ ॥ सांहि नाणा अशाश्वत[1], परि एकचि शाश्वत ॥४॥ त्याच्या नामें विश्वंतर, दुर्गा दत्त शाश्वतर ॥५॥ दास ह्मणे सार्थक करा, यशें त्रिभुवन भरा ॥ ६ ॥ ॥ १५ ॥

कोट्यावधि पुरुष या क्षितितळावर होऊन गेले, रामकृष्णासारखे अवतारी झाले तरी त्यांचे देह उरले आहेत काय? नाहींत. तर कीर्ति मात्र शेष आहे, या साठीं मानवी जन्म कीर्तिवांचून व्यर्थ. पहा —— गीति. नरतनू लाधुनि ज्येणें, लोकीं सत्कीर्ति नुरविली[2] मागें ॥ तज्जन्म निरर्थकची, अजागल स्तन न समान कवी सांगे ॥१६॥ मुक्तेश्वरासारखे सज्जनही असेंच ह्मणतात —— ओंव्या — जरी देह नाशिवंत, ऐसेंचि बोलती सर्व संत ॥ तरि साधोनिया पुरुषार्थ[3], कीर्तिरूपें उरवावा ॥१७॥ देह त्वङ्मांसास्थिमय[4], यद्यपी अपवित्र होय ॥ तरी साधोनीया महत्कार्य, कीर्तिरूपें उरवावा ॥१८॥ तस्मात् या नरदेहानें कांहीं तरी महत्कार्य साधल्यावांचून प्रतिष्ठा होणें नाहीं, आणि प्रतिष्ठेविणें जन्म व्यर्थ ह्मणून ह्मणतात —— उरे कीर्ति मागें इ० पुंड० पार्व० सीता० (ध्रुपद) शंभुमहादेव गंगाधर शिवशंकर चरणस्मरण तूं करि ॥ ध्रु ॥ जया प्रती अमरहि मुनिजनादि वंदिति भावें संसृति पार तरायास ॥ १ ॥ पुं० पार्व० सीता०

(तुका वगैरे लावतात)

पुनः कवि ह्मणतात —— गीति. —— सुरतेपेक्षां[5] कीर्ती, मोठी पंखाविणें उडुनि

१ आकाश, वायु, तेज, उदक, पृथ्वी.

१ चिरकाळ न रहाणारें. २ उरविली नाहीं. ३ धर्म, अर्थ, काम, मोक्ष ४ त्वक् मांस अस्थिमय=कातडें मांस हाडें यांनीं युक्त. ५ स्वर्ग.

नातें ॥ पण नाश सुरतही, परतु क्षणतीच कीर्ति न जाते ॥ १९ ॥

असो, तर कीर्ती विषयीं उत्सुक मनुष्यानें ती ज्या कृतीनें मिळेल तीच केली पाहिजे कीर्ती दोन प्रकारची आहे—सत्कीर्ति आणि दुष्कीर्ति. जिच्या योगानें सर्व लोक मोठ्या प्रेमभावानें व पूज्य बुद्धीनें त्या मनुष्यास वारंवार आठवितात व त्याचा दाखला देतात ती सत्कीर्ति; आणि जिच्या योगानें त्याचें नांव निघण्या बरोबर सर्व लोकांच्या कपाळास आठ्या पडून तिरस्कार बुद्धि उत्पन्न होत, ती दुष्कीर्ति तेव्हां यांतून ज्याला जी पाहिजे असेल ती त्यानें स्वीकारावी. आपणास लोकांनीं चांगलें ह्मणावें व आपली चांगली कीर्ति आपल्या मागें चिरकाळ रहावी ही इच्छा आबाल वृद्धांस असतें, परंतु तत्प्राप्तिची कृती मात्र कोणी करीत नाहींत. तर सत्कीर्त्युत्सुक पुरुषानें सत्संग व सन्मित्र साह्य हीं संपादन करावीं त्यांवाचून कोणास ही ती मिळावयाची नाहीं. आणि ज्या वेळेस तो या द्वयाचा आश्रय करील त्याचवेळेसच तो भाग्यास चढेल. पद्य—पंडित ह्मणतात—गीति. कांचनसंसर्गानें, मारकती द्युति धरीच काचमणी ॥ सत्संगें साधु खलैप, सुधीरसंगें सुधीर भीरुगमी ॥२०॥ अणखी असें आहे कीं—श्लोक उ० जा० भ्रंश मती हीन समागमानें, समासवें येसमता क्रमानें ॥ थोरासवें थोरचि होय तो कीं, हीं सज्जनाचीं वचनें त्रिलोकीं ॥२१॥ आतां कोणी असें ह्मणतील कीं आई, बाप, गुरु, सुहृद इत्यादिकांचें नऐकतां जो आपल्याच इच्छेनुरूप वर्तन करितो तो आपत्तीप्रत पावतो. ह्मटलें आहे — श्लोक० स्वाग० नायके वचन जो सुहृदाचें, इच्छितां सतत जे हित त्याचें ॥ त्या नरें सुविपदेस भजावें, शत्रुनंदन तया समजावें ॥२२॥ ही गोष्ट सत्य आहे परंतु थोर कुळांत जे उत्पन्न होतात ते थोरच व्हायचे! महाराज, रत्नाच्या खाणींत कुठें काचमणी उत्पन्न होईल काय! कधींही नाहीं होणार. जे पुरुष पराक्रमी निपजतात त्यांचीं कर्मे लहानपणापासूनच कांहीं चमत्कारिक पण स्तुत्य असतात; तीं लक्षपूर्वक मात्र पाहिलीं पाहिजेत. त्याच्या लहानपणच्या स्वभावसिद्ध कृत्यांवरूनच तो पुढें अमुक तऱ्हेचा निपजेल असें थोर लोक पूर्वींच अनुमान करितात. असमंजस जे आहेत ते मात्र नाक मुरडतात, कांकीं तद्विषयींचें ज्ञान त्यांस नसतें. असंख्य पदार्थ पुढें असतां ज्यावर मुलाची विशेष प्रीति बसेल व ज्या पदार्थावर त्याचें लक्ष विशेष वेधलें जाईल तदनुरूपच तो पुढें होणार. आणि परिचित किंवा अपरिचित जनाची परिक्षा यावरूनच होते. यास दृष्टांत — लाक्षागृहांतून पांडव वांचल्यावर ते जातां जातां ब्राह्मणवेषानें द्रुपदपुरास लग्नोत्सवार्थ गेले; आणि मत्स्य यंत्राचा भेद कोणासही होईना ह्मणून राजपुरोहित, निर्वीर पृथ्वीतल झालें असें ह्मणाला तेव्हां त्याअश्राव्य शब्दांनीं विद्धांतःकरण होत्साते भीम व अर्जुन भटमंडळींतून उठून मोठ्या आवेशानें व उल्हासानें त्या यंत्राजवळ गेले. चित्रसेनगंधर्वानें ती विद्या अर्जुनास दिली असल्यामुळें त्यानें तात्काळ यंत्र भेद केला. मग

१ सोन्याचे योगानें २ माणिकाची. ३ कांति. ४ दुष्टांचा राजा. ५ अतिशय भित्रा.

रीतीप्रमाणें द्रौपदीने त्याचे गळ्यांत माळ घातली. एथपर्यंत ठीकच झालें, पण द्रुपदास वाटलें कीं आपली क्षत्रियाची मुलगी ब्राह्मणानें नेली, यामुळे दुःखीत झाला. तथापि मनांत संशय आल्यावरून तत्परीक्षणार्थ भोजनोत्तर त्यांस सर्वपदार्थसंग्रहालयांत नेलें, आणि आपण एकीकडे ते काय करतात तें पाहण्याकरितां उगाच उभा राहिला. महाराज, कसे झाले तरी ते क्षत्रियकुळ शिरोमणी! त्यांचें लक्ष इतर कोणत्याही पदार्थांकडे न जातां शस्त्रांकडे गेलें व तीं पाहून त्यांनीं कांहींकांकडे उल्हासपूर्वक व कांहींकांकडे तिरस्कारपूर्वक पाहिलें. त्यावरून राजाची खात्री झाली कीं हे खास ब्राह्मण नसून क्षत्रिय आहेत. पुढें तीच गोष्ट प्रत्ययास आली. तस्मात् जे जात्या थोर कुळांतले आहेत, त्यांचे तेज ह्मणजे पराक्रम कदापी लोपावयाचें नाहीं. आणि तें तेज वयावर असत नाहीं. पहा — श्लो० रथो० शैशवींहि करिगंडभेदन, काय तो करि मृगेंद्र पोत न ॥ पूतना गिरिसमा वधी हरी, काय तेज असेत वयावरी ॥२३॥ तेव्हां लहान किंवा मोठा हें तेजावरूनच मानलें पाहिजे. असो आतां एकवार मंडळीनें भजन करावें, मग शिष्टसंप्रदायामुळें कांहीं थोडें आख्यान लावूं. (भजन) शिवहरशंकर गौरीशा, खलमर्दन अविनाशा ॥ (तें झाल्यावर) पुंड० पार्वती० सीता०

ध्रुपद. — भजे चंद्रभाल लोकनायका काळकलना तुज बाधक नी नचेरे ॥ ध्रु० नाहीं त्रिलोकांत ध्येय मूर्ति शंभुविण सख्या तीच एक जाणरे ॥ १ ॥ पुंड० पार्व०

कवि ह्मणतात — गीति. नृपति पुसे काय असे, गेयें ह्मणे शुकमुनींद्र शिवमहिमा ॥ प्रौढोक्ति अशी कीं तो, पावे लाभोनि सत्य शिवें महि मा ॥ २४ ॥ असो, अशा प्रकारचा शिवमाहिमा गाणारे जे त्यांपैकींच महा भगवद्भक्त, क्षत्रियवंशावतंस आणि श्रीकृष्ण परमात्माचे प्रियसख जे पांडव ते अरण्यवास करीत असतां, कोणएकेकाळीं अर्जुन पाशुपतास्त्र प्राप्तीस्तव हिमाचळावर तप करूं लागला. गीति. त्या पार्थ तपस्तेजा, भ्याले तापस समस्त याहून ॥ दुःसह वन्हीचें कीं, सूर्याचेंही न तेज याहून ॥२५॥ पार्थ नाम धनंजय, लोकां तें सत्य करुनि दाखविलें ॥ इतर जनांसि भिवविलें, जरि तरि परमेश्वरासि तोषविलें ॥२६॥ याप्रकारें अर्जुन तेजानें संतप्त होत्साते ते मुनि गीति. — भीतस्तात शिवाला, येउनि कथिती नमूनि पदकमळा ॥ आधीं कीं तपतो तो, त्यागुनि अर्जुन सराज्यपदकमळा ॥२७॥ महाराज, त्या भयग्रस्त तापसांची ती वाणी ऐकून श्रीशंकर किंचित् हास्य करिते झाले! अहाहा! ती शिवमुर्ती कशी आहे तर— श्लो० मालि. रजतगिरिसमाना कांति चंद्रार्द्ध मौली, अजगवधनु हस्तीं शोभतें भस्म भाळीं ॥ गिरिवर तनया श्रीअंबिका वामअंकीं, अवसनें परि कोणातें न विश्वेश शंकी ॥२८॥ शंकरानीं हास्य केलेलें अवलोकन करून — ओवी. झाले विस्मित मुनिजन, कां हांसले पंचानन ॥ मग विनयें कर जोडुन, कारण पुसती तयाप्रती

१ रुग्णपणा २ हत्तीचा गंडस्थळाचा भेद. ३ सिंह. ४ बालक नामक पराक्षसी.

१ जनमेजयपिता परीक्षिती. २ गायन करण्याच्यायोगें ३ थोरांचें भाषण. ४ कल्याण. ५ पृथ्वी. ६ लक्ष्मी ७ दर्शविलें. ८ अंतःकरण. ९ लक्ष्मी १० स्त्री. ११ मस्तकावर. १२ नामशिशिर. १३ हिमाळय १४ डाव्यामांडीवर १५ नग्न.

चें ॥२९॥ तें मुनिवाक्य श्रवण करून शिव ह्मणतात —

तो कां तप करतो आहे तें मी जाणतों, त्याच्या पासून तुह्मांस किंचितूही भय नाहीं. अशा प्रकारें त्यांचें सांत्वन करून स्वारि सपरिवार किरातवेष धारणकरून अर्जुन होता त्या ठिकाणीं आली, आणि कोणी एक दैत्य सूकररूपें जात होता त्यास बाण मारून पाडिती झाली. तिकडून अर्जुनानेंही त्याचवेळीं त्यास बाण मारिला. तेव्हां दोघांचे शर एककालींच लागल्यामुळें कलह वाढला. नंतर एकमेकांस शस्त्रास्त्रादिकांनीं विद्ध करिते झाले!! धन्य तो अर्जुन वीर! कीं जो सर्व शक्तिमान् परमेश्वराबरोबर युद्ध करतांना हटला नाहीं. कवि ह्मणतात — श्लो० स्रग्ध० पांचालेशा[1] सलीलें[2] गुरुवरवचनें[3] जिंकिता होय बाणीं, टोंची जो श्रीमहेशा त्रिपुरदमनका जिंकिला जो न कोणीं ॥ संग्रामीं क्षत्रियांहीं सुरवरवन[4] दे सर्व अग्नीस खायाऐसा जो पांडुसूनू हरिसख समरीं एक तो योधराया ॥ ३० ॥ असो त्या परम भक्तास श्रीशंकरानीं पाशुपतास्त्र देऊन विजयीभव ह्मणून वर दिला, आणि सपरिवार कैलासीं गमन केलें. तर अर्जुनाची एवढी कीर्ति होण्यास श्रीभगवंताची कृपा होय. अशी कीर्ति करून ज्यांचा स्थूल देह नष्ट झाला तरी ते कीर्तिरूपानें चिरकाळ आहेतच. त्या पुण्यप्रताप पुरुषानीं जशी अमर कीर्ति संपादिली तशीच संप्रतीच्या मनुष्यांनीं यत्न केला पाहिजे. आतां तो यत्न ह्मणजे क्रिया कोणती ह्मणाल तर—

१ पांचाल देशचा राजा द्रुपद त्यास, २ सहज. ३ [...]णाच्या आज्ञेनें. ४ इंद्राचें खांडवनामक वन.

श्लो० भुजं० क्रिया कोणती हो तरी आज कीजे[1], स्वदेशार्थ धर्मार्थ देहास दीजे[2] ॥ परी[3] म्लेच्छ लोकीं जया बूडवीलें, तया पाहिजे सज्जनें उद्धरीलें ॥ ३१ ॥

हरहर! काय सांगावें! महाराज, आमचा हा हिंदुस्थानदेश कीं ज्याला पृथ्वीवरील सर्व लोक सुवर्णभूमि ह्मणत होते, ज्या देशाचा धाक समुद्रवलयांकित पृथ्वीवर चालत होता, ज्या देशाची संपत्ति पाहून संपूर्ण देश लाळ घोटित होते, ज्या देशाकडे वांकडे दृष्टीनें ढुंकून पाहण्याची सुद्धां कोणत्याही देशास छाती होत नसे, जो देश विद्या कला कुशलता इत्यादिकांचें केवळ माहेर घर, ज्या देशाचा वारा तरी आपणांस लागेल काय असें इतर मानि[...] होते, ज्या देशाला संपूर्ण देश करभार देत होते, जो देश अनेक विद्यादिकेंकरून व आचारादिकेंकरून अत्यंत सुधारलेला, जो देश नीतीचें विलास मंदिर होय, जो देश अनंत सौख्याची खाण, ज्या देशाची जमीन, हवा, पाणी, सर्वोत्कृष्ट, जो देश संपूर्ण वृक्षवनस्पतीनीं परिपूर्ण, ज्या देशाची बरोबरी कोणत्याही देशाच्यानें करवत नाहीं, ज्या देशाला आर्य ह्मणजे श्रेष्ठ देश ह्मणतात, ज्या देशांत वसिष्ठ, विश्वामित्र, अत्रि, कश्यप, यां सारखे न्यायकर्ते, विद्वान् व तपोनिधि होऊन गेले, ज्या देशांत पाणिनि, पतंजलीसारखे वैय्याकरणी झाले, कपिलासारखे सांख्यशास्त्रकार झाले, वाल्मीकि, व्यास, कालिदास, भवभूती, यां सारखे कवी होऊन गेले, ज्या देशांत बळी, नळ, कर्ण, यां सारखे दाते होऊन गेले, ज्या देशांत हरिश्चंद्र, श्रियाळ, शिबी

१ केला पाहिजे. २ दिलें पाहिजे. ३ शत्रूंनीं.

या सारखे सत्वधीर पुरुष झाले, रामकृष्णादिक अवतारी पुरुष झाले, भीष्म द्रोण, पांडव यां सारखे महा पराक्रमी झाले, हे प्राचीन लोक सोडले तरी विक्रमासारखे पराक्रमी, भोजासारखे दाते, शालिवाहनासारखे चतुरही पुरुष काय थोडे झाले? सारांश ज्या देशाला स्वर्गाचीच उपमा, अशा या आमच्या — की जो आमचा ह्मणण्याला सुद्धां अतिशयच लज्जा वाटते — देशाला; तसेंच जो अनादिकाळा पासून चालत आलेला, जो सर्व जगासमान्यअसून आद्य जो परमेश्वराला प्रिय जो आचार, विचार, ज्ञान, इत्यादिकांनीं पूरित, जो शांतिसौख्यदायक, जो अत्यंत दुर्लभ अशा मुक्तीसही देणारा, ज्याची योग्यता अनिर्वाच्य, जो सनातन अशा या आमच्या आर्य धर्माला जें हीनत्व आलें आहे तें अवर्णनीय आहे! बापहो, आपल्या पूर्वजांची स्थिति आणि रुध्यांची आपली स्थिति या ताडून पाहतां जमीनअस्मानाचे अंतर दिसेल! कोठें इंद्राचें ऐश्वर्य आणि कोठें सुदाम्याचें वीस विस्वे दारिद्य!! हर हर! सज्जनहो, ज्यांनीं संपूर्ण पृथ्वी पादाक्रांत केली, ज्यांनीं मोठमोठे दिग्विजय करून राजसूयासारखे, अश्वमेधासारखे यज्ञ केले, ज्यांनीं आपल्या सामर्थ्यानें इंद्र यमादिकांसही लाजविले ते आपले पूर्वज कोणीकडे, आणि त्यांच्या वंशांत हे आपण कुळकरटे निर्माण झालों!! ते आपणांस काय ह्मणत असतील? हा आमचा मूर्खपणा, हें आमचें आपआपसांतील वैमनस्य, हें आमचें भित्रेपण, हें आमचें दारिद्य आणि ही आमची अत्यंत शोचनीयस्थिति, त्य हें आमचें पारतंत्र्यावलंबन अवलोकन करून आमचे पूर्वज आह्मास धन्य ह्मणत असतील नाहीं बरें! स्वातंत्र्य रक्षार्थ, धर्म व देश यांच्या अवनार्थ ज्यांनीं आपले अमोलिक देह रणांगणादिकांचे ठायीं खर्ची घातले ते आमच्या नपुंसत्वतेस हंसत नसतील काय? कोणत्या तरी कृतीनें आह्मी त्यांच्या वंशास शोभतों काय? त्यांच्या सारखा देशाचा धर्माचा वगैरे कसला तरी अभिमान आहे काय? कांहींच नाहीं. आमचे प्रत्येक पूर्वजाची ही रीतच होती, कीं आपले पूर्वजांनीं मिळविलेल्या कीर्तीपेक्षां अधिक मिळवून दाखविण्यांत त्यास भूषण वाटे. स्वज्ञातीशीं वैर धरणें हें अत्यंत लाजिरवाणें असून मोठें पाप मानीत. परज्ञातीचा अभिमाध धरून स्वज्ञातीशीं विरोध करणें ह्मणजे काय हें त्यांस मुळींच माहीत नव्हतें ह्मटलें तरी चालेल. नाहीं तर ही आमची स्थिती! अहाहा! आज काय पारशी आले, उद्यां काय ग्रीक आले, परवां काय हपशी आले. येऊंद्यात आह्मीं आपली त्यांच्या निंद्य असल्या तरी आज्ञा मानण्यास व हां साब ह्मणण्यास मान खालीं घातलीच आहे. हे मुसलमान तर आमचे हाडास खिळलेच आहेत. शिवशिव! परमेश्वरा, कायरे ही आमची संतति असें ह्मणून आमचे पूर्वज ढळढळ रडत नसतील काय? आपला वंश उन्नतीस कसा येईल, आपला लौकिक कसा वाढेल, आपला देश संपन्न कसा होईल या विचारांत आमचे पूर्वज रात्रंदिवस मग्न असत. आणि आह्मी त्यांच्या उलट वागतों. हरहर! हे परकीय म्लेच्छ लोक, की ज्यांस आपण केवळ पशुतुल्य समजत होतों व ज्यांस आपण गुलामासारखे ले

खित होतों, तेंच आतां आमच्या वेडेप णामुळें उलटें झालेंना? काय हा काळच क्राचा सपाटा! अं? महाराज, ही सांप्रतची अत्यंत नीचावस्था आली आहे ही फक्त आह्मी आपल्या पूर्वजांच्या रीती विरुद्ध वागतों यामुळें बरें! आपहो, काय सांगावें. पोटांतून असें भडभडून येतें पण काय उपयोग? अहो जे आह्मी सर्व लोकांस अन्नाच्छादन पुरवीत होतों त्या आह्मांस आतां परकीय लोकांच्या तोंडाकडे पाहावें लागतेंना? पहा बरें; ते देतील त्या जागेवर आणि ते देतील तेवढ्या अन्नावर कुत्र्या- सारखें शेंपूट हालवीत त्यांच्या दाराशीं राहावें लागतेंना? हें सर्व आमचें असून त्यास आह्मी सर्वस्वी मुकलोंना? धिक्कार असो आह्मांला!!! हा आमचा देश आणि प्रियधर्म यांची ही अशी अतिशय लाजिर वाणी स्थिति प्रत्यक्ष पाहून कीं—जो देश व जो धर्म परकीय दुष्ट नीच केवळ लाथे खालीं तुडवीताहेत त्यांकडे पाहूनही ज्या कोणास त्याविषयीं कांहींच वाटत नाहीं तो जगण्यापेक्षां —— असो, तर महाराज, पूर्वजकृतीचें अवलंबन करून यांच्या मोचनार्थ यत्न केला पाहिजे. आणि परंपराही अशीच आहे. पहा — श्लो० शार्दू० पूर्वी भस्मगजादिका[1] सुरवरीं किंवा दितीच्या सुतीं[2],सत्यीं[3] गोद्विजदेवधर्म छळनी संत्रासिली हे क्षिती[4] ॥त्रेतीं रावण कुंभकर्ण मुखरीं[5] कंसादिकीं द्वापरीं, तैशी संप्रति सत्य दुष्ट यवनीं पाहा तुह्मी अतरीं ॥३२॥ हा राया महिभार आसुर जसे श्रीशंकरें मारिले, रामें राक्षस अर्जुनें खलपती क्षोणीश संहा- रिले ॥ या तत्सादृश कर्मकार यवना दंडील ऐसा नर, आहे कोण शिवाविणें इतर हो शूराग्रणी भूवर ॥३३॥ ( असें ह्मणतांच शिवाजी परम क्रोध संतप्त होत्साता डोळे लालकरून व तरवार उपसून उभा राहतां, त्यावेळचें त्याचें स्वरूप व आविर्भाव पाहून हा खरोखरच शिव अवतरला असा सर्वांस भास झाला, आणि सर्व सभा गजबजून चकित झाली. दादोजी व तानाजी त्यास धरून बसवितात, तेव्हां हरदास ह्मणतो ) महाराज —— गीति. मृगपतिकृति ऐशी कीं, दृष्टिस पडल्याविना स्वभक्ष्य उडी ॥ टाकी नच तों वरी तो, स्वस्थानिं बसतो धरून नाकपुडी ॥३४॥ भगवंतानीं गीतेंत सांगितलें आहे —— ओवी — सज्जनांतें तारावया, दुष्टांप्रती मारावया ॥ अवतर तों मी सखया, युगीं युगीं जाणिजे ॥३५॥ तेव्हां सर्वांस हें ठाऊकच आहे कीं —— ओ० —अवतार कथा सर्वां ठाव्या, पुराण्दा त्या नव्हेत नव्या ॥ सविस्तारें काय कथा व्या, तज्ज्ञांप्रति या मूढें ॥ ३६ ॥ आतां जो कोणी स्वीय देश धर्मावनासाठीं उत्सुक असेल त्याचे अंगीं युक्तिचातुर्यादि गुण जे आवश्यक आहेत, त्या सर्वांत शौर्य हा मुख्य गुण होय. तें सामान्य प्रतीचें नव्हे, तर असें असलें पाहिजे —— श्लो० स्त्रग्ध० ज्याच्या नामें थरारे रिपुहृदय रणा यावया[1] धैर्य कैंचें, आले राजे सरोषें मिळानि जरी तरी पाहतां वक्त्रें[2] ज्याचें ॥ हारे[3] दीप्ति प्रभावें लढाति न टिकती सर्प पैक्षीश्वराशीं[4], गेला होऊन पूर्वी वैर[5] नृपाति असा रुद्र हें नाम ज्याशीं ॥३७॥ ठीकच आहे कीं नामासारखी करणी असली तरच तें नाम

१ भस्मासुर गजासुर इत्यादिकांनीं. २ हिरण्याक्ष हिरण्यकशिपु यांनीं. ३ सत्य=कृतयुग. ४ पृथ्वी. ५ मुखर =श्रेष्ठ, पुढारी.

१ मुख २ जाते. नाहींशीहोते. ३ पराक्रमानें. ४ गरुडाबरोबर ५ श्रेष्ठ.

शोभतें. पहा — ओंव्या. नाम ठेविलें धनपाळ, भिक्षा मागे सर्वकाळ ॥ अमरसिंग परी बाळ—पणींच गेला यमलोका ॥३८॥ नाम जियेचें सुंदरी, नासिकेची असे दरी॥ अष्टावक्र स्वयें परी, मदन नाम तयाचें॥३९॥ नाम ठेविलें शूरसेन, भिऊन पळे देखनां श्वान ॥ कवडी चुंबका अभिधान, कर्ण काय शोभतें ॥४० ॥ शिवनाम तसें नाहीं, नामातुल्य करणी पाहीं ॥यशें ज्याच्या दिशा दाही, भरोनिया जातील॥४१ असो, आतां वेळ बराच झाला आहे तथापि प्रसंगानुसार आलीकडील जना विषयीं एक दोन पद्यें ह्मणून आटपूं. तर एक वेळ नाम गजर होऊंद्या. पुंड० इत्यादि. ( मोठ्यानें ) श्री गुरु देव दत्त!! आहाहा! संतोष झाला!नाम गजर झाला ह्मणजे निद्रा वगैरे सर्व जातें. पहा— गीति. निद्रा घटकर्णाची, स्त्रीतद्वेषेंच कीर्तनीं येते ॥ परि राम नाम गजरें, भिऊन सहसा पळोनिया जाते ॥ ४२ ॥ सांप्रत स्वदेश व स्वधर्म यांच्या रक्षणा साठीं मनुष्यानीं उद्योग केला पाहिजे. ज्या मनुष्यांस देशाचा अभिमान असतो त्यांच्याच हातून असलें कृत्य घडावयाचें. अशा त.र्हेचा अभिमान रजपूत लोकांत फार आहे. ऐका— दास ह्मणतात— अभंग. धन्यतोची जगीं कीर्तिवंत झाला, वंश उद्धरीला जेणें निज ॥ १ ॥ कीर्तिन करीतां गेलाहो जो प्राणी, श्वानादिकांहुनी काय ज्यास्त ॥ २ ॥ ज्याची कीर्ति मागें राहे निष्कलंक, जन्माचें सार्थक केलें त्यानें ॥ ३ ॥ दुर्गादत्त दास ह्मणे तोची नर, ज्याचें पृथ्वी भर नाम गाजे ॥ ४ ॥ देशा धर्मासाठीं जेणें झिजवीला, देहही आपला तोचीधन्य ॥ १ ॥ ज्याला त्यांचा नाहीं अभिमान कांहीं, तो पुरुष पाहीं प्रेतासम ॥ २ ॥ तदवनासाठीं प्राणही त्यागिती, तिन्ही लोक गाती कीर्ति त्याची ॥ ३ ॥ दुर्गादत्तदास ह्मणे ऐशा सुता, पाहुनि तृप्तता पावे भूमी ॥ ४ ॥ रजपूतलोक ऐसेचि आहे ती, देशातें रक्षीती सर्व काळ ॥१॥ किती किती दुःखें भोगिलीं हो त्यांनीं, स्वस्त्री पुत्र हानी केली कीं हो ॥२॥ अल्लाउद्दीनाच्या वेळच्या त्या गोष्टी, वदावया ओष्टीं येती नच ॥ ३ ॥ दुर्गादत्तदास ह्मणे रणशूर, ते कीं जे उदार देहावरी ॥४॥ ॥४५॥ रजपूत लोक हे मुळचे क्षत्रिय असल्यामुळें, त्यांच्या अंगीं वीरश्री फार! यवनलोकांना जर्जरकरून सोडलें त्यानींच! फार काय सांगावें. महाराज, चितूरनामक मेवाडची राजधानी होती ती यवनानीं घेतली, ती परत घेण्याकरितां रजपुतांचा पराक्रमीराजा जो संग त्यानें पुष्कळ श्रम केले, पण ते सर्व व्यर्थ झाले. पुढें त्याचा मुलगा उदेसिंग यास सामर्थ्य नसल्यामुळें त्यानें नवीच राजधानी करून उदेपूर नांव ठेविलें. त्याचा मुलगा प्रतापसिंग त्याविषयींच्या पुष्कळ गोष्टी आपल्या ऐकण्यांत असतीलच. धन्य तो वीर खरा! दिल्लीच्या बादशाहांशीं त्यानेंच टक्कर मारली. शाबास त्याची! पहा — श्लोक शार्दु० दिल्लीवल्लभ[1] जिंकण्यास दवडी जीं जीं प्रेता[2]पा बळें, तीं तीं सर्वहि जिंकुनी रणपटू टाकी प्रतापें बळें ॥ सेनेला[3] रिपुच्या ठरोहि[4]

१ नांव.

१ अकबर बादशाहा. २ प्रतापसिंगाला. ३ सैन्य. ४ कुशल.

नच दे संग्राम भूमीवरी, मोठा योध खरा अकटार जरी थाके तरी अंतरीं ॥ ४६ ॥ राजपुतान्यांतील इतर सर्व राजे अकबराकडेच होते. फारकाय पण त्याचा प्रत्यक्ष भाऊ देखील तिकडेच होता तरी प्रतापसिंग डगमगला नाहीं! अहाहा! ओव्या. कोणी नसतां साह्यकारी, एकलाची युद्ध करी ॥ यवनीं वेढिली तन्नगरी, केली वस्ती अरण्यांत ॥४७॥ तेथें भोगिली जी विपत्ति, वर्णावया नाहीं मती ॥ तथापि तो शूर मूर्ति, धैर्यातें सोडिना ॥४८॥ यथावसरीं युद्ध मांडी, यवनांचीं नरडीं तोडी ॥ जे जे गेले देशो[१]धडी, माघारले ऐशानें ॥४९॥ पंचवीस वर्षे युद्ध करून, प्रतापें केलें देशा[२]वन॥ या लोकीं कीर्ति ठेवुन, प्रतापसिंग गेला कीं ॥ ५० ॥ केलें सार्थक नामाचें, तेणें तसेंचि व्हायाचें ॥ मूर्तिमंत याशिवाचें, सत्य सत्य त्रिवार ॥ ५१ ॥ असो; सज्जनहो, तात्पर्य काय कीं जे जे आजपर्यंत नामांकित पुरुष होऊन गेले, त्यांना जरी हजारों शेंकडों वर्षे होऊन गेलीं तरी, आणि यापुढेंही प्रळय काळ पर्यंत त्यांची कीर्ति अशीच राहणार. तर ज्या कृतीनें अशी शाश्वत कीर्ति राहिल ती क्रिया करावी ह्मणून समर्थ ह्मणतात —उरेकीर्ति० बापहो, एकवेळ भजन करून मग आरती करूं. ( भजन ) दत्त दिगंबरा येरे, सत्वर दर्शन देरे. पुंड० पार्व० सीता० श्री गुरु देव दत्त.

आरती— जय देव जय देव जय जय शंकरा, आरती ओवाळूं तुजसी करूणा करा ॥ ध्रु० ॥ त्रिशूळ धऱ्या शंभो हातीं घेवोनी, गोद्विज पीडक दुष्टां टाकिसि मारोनी ॥ समुद्र मथन करितां निपजे तेथोनी प्राशिसि हालाहल जग रक्षावें ह्मणुनी ॥ जय० ॥ १ ॥ गजभस्मादिक असुर उन्मत्तचि झाले, लीलेनें त्यां युद्धीं त्रिपुरा निवटीलें ॥ श्रियाळ राया छळुनी बहु अंतीं नेलें, स्वस्थाना जन नयना कौतुक दाविलें ॥ जय० ॥ २ ॥ ब्रह्माच्युत सुरमुनिनर वंदिती आर्यातें, त्रिकाळ दर्शन घेतां करिसी कार्यातें ॥ संकट समयीं पावसि तात्काळ व्हायातें, दुर्गा दत्त दास नमितो पायांतें ॥ ३ ॥ श्लो० भुजं० शरीरें जिभेनें मनें मी मतीनें, स्वभावें तसें इंद्रियीं संगतीनें ॥ करीं कर्म जें जें प्रभो अर्पितो तें, अगा दत्तराया शिवा त्वत्पदातें ॥ ५२ ॥ पुंड० पार्व० सीताकांत० श्री गुरु देव दत्त.

( या प्रकारें कीर्तन झाल्यावर खिरापत वगैरे होऊन सर्व लोक निघून जातात. )

**चतुर्थ अंक समाप्त.**

---

# प्रवेश १

## स्थळ—एकांत खोली.

( शिवाजी व त्याचे सोबती )

शि०— गड्यानो, कालचें कीर्तन तर फारच उत्कृष्ट झालें !! तुह्मांस कसें वाटतें?

ता०— कायसांगूं? काल शेवट शेवट ज्या गोष्टी ऐकल्या, त्यां प्रमाणें करण्याचा तुझ्या प्रमाणेंच माझ्या मनाचा धडा झाला आहे.

शि०— इतके दिवसांच्या कथा निराळ्या आणि कालची निराळी. मला तर फारच आवडली. नव्हे तर त्या बुवांचा हा उपदेशच झाला.

---

१ करी - चाकरी. २ देशांतराला.

ता०— खरेंच रे गड्या. पुराण्यागोष्टी कांहीं वाईट नाहींत. यांहूनही फारच चांगल्या व उपदेश घेण्यासारख्या आहेत; पण अलीकडचीं उदाहरणें दृष्टीसमोर ढळढळीत असल्यानें तीं मनावर फारच चांगलीं वठतात नाहीं बरें?

बा०— तें खोटें नव्हे. कालच या आमच्या रावाची ( शिवाजीची ) कथेंतच कशी स्थिति झाली तीसर्वांनीं पाहिलीचना! "देह स्वभाव राहीना" असें जें ह्मणतात तें काय खोटें?

शि०— अं: तें असो. पण इतकें खरें कीं स्वदेश संबंधी स्थिती पासून पुढचा सर्वच भाग सर्वोत्कृष्ट खरा ! त्यांतही रजपुतां विषयींचे अभंग तर—

ता०— अरे व्हायचेंच तसें. बाजी ह्मणतो "देहस्वभाव राहीना" तेंच खरें. कांकीं घराणें कोणाचें? मूळ उदेपूरचेंना? या काळच्या कथेनेंच ह्मटलें तरी चिंता नाहीं आमच्या हेतूला व उद्योगाला व निश्चयाला विशेष बळकटी आली.

ये०— बाबानों, आपणांस आतां चैन पडत नाहीं. हा तुमचा चेंगट स्वभाव मला आवडत नाहीं. माझ्या जिवाला मोठी हुरहूर लागली आहे, तर चला एकदां गुजरांच्या गांवीं जाऊं.

शि०— ठीक आहे, उठा. ( जातात )

## प्रवेश २

## स्थळ – दिवाणखाना.

( जिजाबाई व दादोजी )

जि०—शिवबाला जाऊन आजचा सावा दिवस; येणार तरी कधीं? दुसरे दिवशीं खास येतों ह्मणाला होता.

दा०— त्याचें बहुतकरून असेंच. दोन ह्मटलें तर सहज आठ लागायचे. हे मावळे आडदांडू पोर! त्यांचे सोबतीस लागल्यापासून शिवबा भारीच बिघडला. लोकांनीं खेळखेळ चालविले आहेत.

जि०— पहिल्यासारखा शिवबा आतांशा मार्गांनं येतां बरेच दिवस बाहेर राहूं लागला ह्मणून मोठें भय वाटतें.

दा०— भय ह्मणजे? विचारावें काय! इतके दिवस आपल्याच मुलखांत गोंधळ घालीत होता, पण आतां अलीकडे तर तो बादशाहाच्या खुद्द मुलखांत देखील फिरतो, पण अशानें एकादवेळ तरी फार मोठा— हो. परवांच माझ्या कानीं आलें, कीं, तो मागल्या खेपेस चाकणास जातों ह्मणून गेला, परंतु तेथें मुळींच न जातां जुनरास गेला होता, आणि उगाच तरी —— नाहीं. तेथच्या अधिकाऱ्यानें कांहीं बोलल्यामुळें कीं पुढें जाण्यास अटकाव केल्यामुळें कोण जाणे——त्याला बेलाशक अपशब्द बोलला. आतां तो मुसलमान खरा पण जाणत होता कीं हा अमक्याचा अमुक. पण एवढ्याच कारणानें सर्व ठिकाणीं निभेल काय? तो फारच भला समजलें पाहिजे. मुसलमानभाई ह्मटले ह्मणजे बिथरल्यावर बापाला बाप ह्मणणारे नव्हत. पहा त्यानेंच जर त्यास अडकवून ठेवले असतें किंवा दोन तोंडांत लगावल्या असत्या तर काय करावयाचें होतें? त्या लोकांशीं दांडगाई किंवा हुंवतुंवे करू काय उपयोग? त्या पन्हाळकर बोवाच्या कीर्तनापासून तर काम फारच चेकाळलें. "आधींच उल्हास त्यांत आला फाल्गुन मास"! आणि तशांत तो तर त्यांनीं गुरुच मानला आहे. तो नानातऱ्हेच्या गोष्टी

सांगतो तेणेंकरून शिवबा काय आणि त्याचे सोबती काय सारेच अल्लड! तेव्हां हीं माझ्या जिवाला फार मोठी काळजी लागली आहे. किती समजून सांगा, धाक घालून सांगा, कीं कसेंही सांगा——तोंडावर सर्व होय ह्मणतो, पण मनांत असतें तेंच करतो. तानाजी, बाजी, येसाजी हे तर त्याला या हातावरन त्या हातावर झेलताहेत, आणि तो बुवा त्यांच्या कृत्यांला जास्तच चेतवितो! किती नवल हें! सगळेच पोर, त्यांत बुवा कांहीं वयानें पोर नाहीं पण त्याला हे चाळे आवडत असल्यामुळें तो त्यांच्या गटींतलाच बनला! काय बोलावें? उनाडपणा दांडगाई करावी हेंच सारा दिवस! बरें खेळ तरी काय —— धरा निशाण——सोडा गोळ्या एकदम; उचला तरवार——करा वार एकदम; घाला वेढा—लुटा गांव; धरा मुसलमान ठेवा बंदींत — नाहीं तर फोडा डोकें असें एकसारखें बोलणें चाललें असतें. हें सर्व चांगलें खरें पण —— परिणाम फार कठीण —— पोक्त बुद्धीचा एक तरी त्यांत? (श्रमी होऊन) काय करावें?

जि०— शिवबाचा हा नाद सुटण्याचं कांहीं तरी —— तो तर मोठमोठ्या गोष्टी सांगतो. त्या कांहीं वाईट नाहींत; आह्मांला आपल्या सगळ्या गोड वाटतात, पण दुसऱ्यानें ऐकल्या आणि एकाकडनं दुसऱ्याकड —— दुसऱ्याकडण तिसऱ्याकड — जातांजातां पाठीयाच्या कानावर —— मग कसं? (सुस्कारा टाकते)

दा०— मग मी तरी भितों आहे त्यासच. यांचा उद्योगही कांहीं चमत्कारिक दिसूं लागला आहे. लहानपणापासून घोडे घ्या, लोक ठेवा, शस्त्रें चांगलीं आणा वगैरे जें त्याचें ह्मणणें असे तें सर्व याच धोरणाचें होतें असें आतां माझ्या लक्षांत येते. एकूण शिवबा मोठा धूर्त व दूरदर्शी व मनाचा खोल खरा! बायूची मोट बांधावयाची किंवा आकाश कंवटाळायाचें तसेंच हें नव्हे तर काय! पहावें— यजमानांची खूपचलती होती, फौजफांटा जय्यत होता, दुसरे साह्यकारी होते, मोठे मोठे शूर सरदार हाताखालीं होते, पैसा विपुल, कोणत्याही गोष्टीची कमतरता नव्हती, स्वतां महा पराक्रमी असें असतां ही अहंमदनगरचें राज्य राखवलें नाहीं, तेव्हां त्यांस (शहाजीस) जें दुष्कर कर्म त्याच्या सर्व प्रकारें विरूद्ध असतां याची अति उत्सुकता! हें केवढें बरें आश्चर्य!! त्या बोवाच्या व पोरांच्या संगतीस लागून भलभलते विचार व खेळ करतो यास काय ह्मणावें? लहान पोरी भातुकलीच्या खेळांत जसें यथेच्छ बोलतात व खेलतात, तसेंच त्यांस वाटतें. हें त्यांच्या पोरबुद्धीस बरें दिसतें पण— असो; आतां आला ह्मणजे एकवेळ चांगलीच कानउघाडणी केली पाहिजे.

जि०— कळल तसं करावं. पण इतकंच कीं—

दा०— हें काय मला सांगितलें पाहिजे? चला आतां. (जातात)

## प्रवेश ३

### स्थळ-खेडेगांव

### विश्वास रावाचें घर.

(विश्वासराव, शिवाजी वगैरे)

वि०— (सर्वमंडळी नीट बसल्यावर) ऐका हो सर्वमंडळी, हे आमचे शिवराज पुण्या-

हून मुद्दाम आपणा सर्वांस भेटण्या करितां आले आहेत. हे कोण आहेत, हें आपणा सर्वांस ऐकून माहीत आहेच. हे फार सज्जन माणूस आहेत. आमचें मोठें भाग्य ह्मणूनच ते एथें आले. हे आमचे जात भाई—थोर—कुलीन व बादशाही सरदार आहेत. यांचा आदर सत्कार व पाहुणचार सर्वांनीं त्यांचे योग्य केला पाहिजे. या खेडेगांवांत असले लोक यायचेच नव्हत, पण आले हाच मोठा लाभ समजला पाहिजे. थोराच्या आगमनानें गांवकऱ्यांस कांहींतरी लाभ झाल्याखेरीज राहायाचा नाहीं. यांचा आमचा परिचय नाहीं, तरी यांचा लौकिक आह्मांस थोडासा कळला आहे. यांच्या बरोबर येसाजी कंक आहेत, हे तुह्मा सर्वांस ठाऊक आहेतच. यानींच या थोर सद्गृहस्थांस एथें आणिले. या पूर्वी यांस पाहिले सुद्धां नव्हतें, मग बोलणें चालणें कोठचें! काल रात्रीं या स्वाऱ्या आल्या, त्या फार श्रांत झाल्यामुळें लौकरच विश्रांतीस गेल्या. आतां यांच्या सन्मानाकारितां व यांच्या इच्छेस्तव तुह्मा सर्वांस बलाविलें आहे, सर तुमचे कडूनही यांचा मनःपूर्वक व प्रेमपूर्वक सत्कार होईल असेंमी मानितों.

शि०— भले लोकहो, यांचा (विश्वासरावाचा) लौकिक मीं कर्णोपकर्णी ऐकलाहोता, त्यावरून एकवेळ समक्ष गांठ घ्यावी अशी उत्कट इच्छा झाली. ती इतके दिवस कांहीं अन्य कारणांनीं तशीच राहिली. यथापि तिचाजोर ज्यास्त झाल्यामुळें, अपरिचयास्तव येणें झालें नाहीं, तरी येसाजीच्यायोगें तो सुदिन प्राप्त झाला! मीआल्यापासून जो त्यानीं पाहुणचार व सत्कार केला, त्यास त्यांचा थोरपणा हेंच कारण होय. माझा व्हावा त्याहून मान मरातब फार झाल्यामुळें यांचा मी फार फार आभारी आहें. कांहीं एक लगाबांधा किंवा आगा नसतां थोर हृदया वांचून अशी उस्तवारी करणारे दुर्लभ. माझ्या येण्यानें ते संतोष प्रदर्शीत करतात हाच मला अलभ्य लाभ झाला असें मी समजतों. असो, माझ्या मनांत चार शब्द तुह्मा सर्वांस ऐकवावे असा हेतु आहे.

सर्व—ब्येस हाय, ब्येस हाय!! ऐकन्यास तयार हाऊच!

शि०— सज्जन हो, जरी मी तुह्मांला परका वाटतों, तरी मी तसें समजत नाहीं, व तुह्मी ही समजूं नका. मी तुह्मा सर्वांस किंबहुना जेवढे ह्मणून मावळे लोक आहेत त्या सर्वांसच मी आपले लोक असेंच समजतों. कांकीं तुमची व माझी जात एक, धर्म एक, देश एक—सर्व कांहीं एक आहे; त्याअर्थीं तुमचें व माझें मनही एकसारखेंच असलें पाहिजे, तेंजर भिन्न असेल तर माझें बोलणें व्यर्थ. तुह्मां सर्वांच्या, यांच्या, व हेसर्व आह्मी यांच्या वास्तविक अंतःकरणवृत्तीचें चीज होणें हें तुमचे कतीवर आहे. तुह्मांला तुमच्या गांवचा जसा अभिमान आहे, तसाच मला माझ्या गांवचा आहे, आणि या प्रमाणेंच प्रत्येक मनुष्यास असतोच. अगदीं एखादा अडाणी असला तरी त्यास किंवा अतिशय गरीब दुबळा असला तरी त्यास नाहीं असा एक तरी तुह्मांला आढळला आहे काय? नाहीं खचीत नाहीं. आपल्या घराचा—वस्तूचा जसा तसाच गांवचा—देशाचा ही पण असतोच. आणि तसा अभिमान असणें हेंच मनुष्यास योग्य आ

हे. कोणत्याही गोष्टीविषीं अभिमान नसेल तर तो पुरुष कवडीच्या मोलाचा. कां खरें कीं खोटें? पण असा मिळणारच नाहीं. जसा घरादाराचा, वस्त्रापात्राचा, शेजारी लोकांचा तसाच गांवचा अभिमान प्रत्येक पुरुषास असतो, पण ती त्याची जन्मभूमि मात्र पाहिजे; तसा देशाचा अभिमान असणें ही स्वाभाविकच गोष्ट आहे. अभिमान ह्मणजे थोरपणाची बुद्धि किंवा पूज्य बुद्धि, होय कीं नाहीं? तुमच्या गांवाला कोणीं नांव ठेविलें तर तुह्मांस राग नाहीं येणार काय? समजा, एक फिरंगी येऊन तुमच्या समक्ष तुमच्या गांवची निंदा, करूं लागला, किंवा धर्माची निंदा करूं लागला, तर तुह्मीं निमूटपणें ऐकाल काय? कधीं नाहीं. त्यास चांगलें बक्षीसच द्याल! बरें आपली वस्तु आपणास न कळतां कोणीं नेली तर कितीबरें वाईट वाटतें?मग आपल्या समक्ष किंवा आपल्या हातून हिसकावून घेतल्यास किती बरें वाईट वाटेल? अतिशय वाईट वाटेल यांत संशय नाहीं. गडे हो, आपली वस्त दुसऱ्यानें नेली किंवा घेतली, तर ती पुनः आणण्या करीतां आपण यत्न करावा कीं नाहीं? अलबत केलाच पाहिजे. पण समजा; हा मनुष्य मजपेक्षां बळकट आहे, आणि याणें हें माझें धोतर हिसकावून घेतलें, तर मला दोहोंतून एक केलें पाहिजे ह्मणजे त्या धोतराची आशाच सोडली पाहिजे, नाहींतर त्याचे तोंडांत मारून आपलें धोतर आणून देईल असा त्याजपेक्षां बळकट असेल त्यास बलाविलें पाहिजे खरें कीं नाहीं? होय. तथापि ही ही एक गोष्ट फार लक्षांत ठेवली पाहिजे, कीं एकाच्या नाशाकरितां ज्या दुसऱ्यास आपण बलावतों तो मात्र निरपेक्ष असला पाहिजे. तोच जर आपल्यास साह्य केल्याबद्दल तें धोतर किंवा दुसरें कांहीं बक्षीस मागेल तर त्यांत फायदा काय? "आगींतून निघाला आणि फोपाट्यांत पडला" असेंच कीं नाहीं? धोतराची एक गोष्ट उदाहरणार्थ सांगितली, पण यावरूनच सर्व कांहीं जाणावयाचें आहे. आणखी असें आहे कीं एका मताचे जितके लोक अधिक तितकें तें मत ज्यास्त फैलावतें कीं नाहीं? होय, खरेंच आहे तें. मला एका गोष्टीचा नाद आहे, आणि तसाच दुसऱ्यास असेल तर त्याचें व माझें जमेल. ह्मणतातना ——ज्यांचे स्वभाव सारखे किंवा व्यसन ह्मणजे नाद सारखे त्यांचें मेथकूट जमण्यास वेळ लागतो काय? खचित नाहीं लागणार. दोघांस ही शिकारीचा, खेळण्याचा, पोहण्याचा, चोरीचा, तंबाकू ओढण्याचा—ह्मणाना. नाद असला तर तेवढ्या कामास कां होईना? पण ते एक होतीलच. समजा; मला शिकारीचा नाद आहे आणि तुह्मांस ही आहे, आतां दोघे ही रानांत शिकार करण्यास निघालों, तर जरी मूळची ओळख नाहीं तरी होईल. कदाचित् खाण्याचे पदार्थ एकाजवळ नसले तर दुसरा देईल. भय वाटलें तर रक्षण करील; आणि असें एक आठ पंधरा दिवस होत गेलें तर दोघे खरे मित्र होतील. पण शेजारीं अगदीं असून ही ओळखदेख नसते! किंवा भांडण कज्जे होऊन वांकडें सुद्धां पडतें. तेव्हां दोघांचें मन जमलें पाहिजे, आणि तें तरी दोघांचा उद्देश एक असल्याशि-

वाय होत नाहीं. आतां एकमेकांची ओळखदेख पडून बोलणें चालणें चांगलें होऊन चांगलीच मैत्री जमण्यास बराच काळ जावा लागतो. कांहीं साधारण ओळखीच्या मनुष्याजवळ कोणी एकदम आपल्या हितगुजाच्या गोष्टी बोलत नाहीं. त्यांचीं अंतरंगें अगदीं अभिन्न झाली पाहिजेत, ह्मणजे मिळालीं पाहिजेत. असें होण्यास त्यांचा बरेच दिवस एकत्र वास होऊन एकमेकांचा एकमेकांवर पूर्ण विश्वास बसला पाहिजे. कोणी ही चांगला नांवाजलेला किंवा थोर कुळांतला किंवा एकादा मोठा कामगार अथवा जाहागीरदार कां असेना, तथापि कांहीं दिवस तरी सहवास घडल्याविना वास्तविक मनें कळणार नाहींत. जरी असें आहे तरी थोर मनाचे लोक असले ह्मणजे त्यांचें मन कळण्यास फार वेळ लागत नाहीं, एक दोन भेटींतच तें कळतें. परंतु जे कवंडलासारखे — ह्मणजे बाहेरून मात्र सुंदर ( गोड ) पण आंत कडू कडू झर! — तसले मात्र फारच वाईट. आणि असलेच लोक पुष्कळ असतात. विश्वासघातक, दुर्जन, ठक, दांभिक, मानभावी, गोडबोले अशाप्रकारच्या लोकांच्या वाऱ्यास देखील भल्या माणसानें उभें राहतां कामा नये. आतां सज्जन व दुर्जन यांची मैत्री कशी असते ह्मणाल तर—सकाळपासून दुपारपर्यंत जशी झाडाची सावली होत जाते व भर दुपारीं ती अगदीं पायां खालीं येते ह्मणजे नाहींशी होते ह्मटलें तरी चालेल— याच प्रकारची दुर्जन लोकांची मैत्री. प्रथम मात्र हवी तितकी असते — जणूं काय ते अत्यंत जिवलग मित्रच आमरण आहेत — आणि मग मग अगदीं नष्ट होऊन तोच कट्टा दुश्मन ही होतो, तर क्षणोक्षणीं बदलणारा असला मनुष्य कुच कामाचा. खरें कीं नाहीं? बरें तेंच उलट पहा— दुपारपासून सूर्य मावळेपर्यंत जशी झाडाची सावली होत जाते तशीच सज्जनाची मैत्री. आणि ती एकदां पक्की जमली कीं तुटावयाची नाहीं. वज्रलेप झाली! तेव्हां मैत्री अकृत्रिमपणाची असल्यावांचून कोणताच कार्यभाग होणें नाहीं. आतां या जगांत असे निष्कपटी व निःसीम प्रेमळ मित्र फारच थोडे असतात. आणि खरेंच आहे कीं उत्तम वस्तूच मुळीं या जगांत अगदीं थोडी. असो तर असले जिवलग मित्र असतील, त्यांच्याचजवळ आपल्या खऱ्या गुह्य गोष्टी बोलल्या पाहिजेत. आतां स्नेह जडण्याला प्रथमतां सर्व लोक चांगल्या स्वभावाचे आहेत असेंच मानिलें पाहिजे, व त्यांजवर साधारण किंवा बराच भरंवसा ठेवला पाहिजे; आणि मग तो जसजसा अनुभवाला येत जाईल, तसतसा कमज्यास्त किंवा अगदीं नाहीं अथवा पूर्ण भरंवसा त्यावर ठेवावा लागतो. माझा कोणावर भरंवसा नाहीं, मला कोणी विश्वासू दिसत नाहीं असें प्रत्येकानें ह्मटलें तर व्यवहार कसा चालेल? ह्मणजे आपण कायते चांगले—विश्वासू आणि बाकीचे चटसारे वाईट—बेइमानी असें मानिलें तर त्याला व्यवहारांत पाऊल टाकण्याला किंवा एक दिवस तरी सुखानें घालवायाला सांपडेल काय? तरमग तसें मानतां येणारच नाहीं. सर्वांला कपटी व दुष्ट मानण्या-

पेक्षां आपणच तसा आहें असें मानणें हें बरें! कां खरेंना? समजा — मी तुमच्या एवढ्या मोठ्या समाजांत दोन तीन माणसांनिशीं आलों आहें, आणि मी एथें निःशंकपणानें असून बोलतों आहें, पण तह्मीं सर्वांनीं धरून मला सोवत्यांसुद्धां ठोकलेत तर आह्मीं काय करणार? पण मनुष्याचें स्वाभाविक अंतःकरण इतकें हलकट, कठोर किंवा नीच असत नाहीं, तर त्यास कांहीं कारणें घडून तो संस्कार त्याचे मनावर दृढ होत चालला ह्मणजे तो दुष्ट होतो. दुसऱ्यास वाईट ह्मणणें, त्याच्या बरोबर भांडणें, त्याचा नाश करणें किंबहुना त्याचा जीव घेणें या गोष्टी खरोखरच वाईट व निंद्य आहेत. होय; पण हें केव्हां? तर सर्वच लोक नीतिमान, सभ्य, पापभीरु, दुसऱ्याचें कोणत्याही प्रकारें द्वेष संपादून नुकसान करीत नाहींत किंवा अपहार करीत नाहींत तेव्हां मात्र हें चालणार. पण जो वरील सर्व गुणांहून विरुद्ध गुणांचा पुतळा आहे त्याची दया करून चालेल काय? तुमच्या घरांतील एकादें भांडें, वस्त्र किंवा दुसरा एकादा जिन्नस एकजण येऊन उचलून न विचारतां नेऊं लगला ह्मणजे चोरून नेऊं लागला तर त्याला तुह्मीं चांगला खर्पूस मार नाहीं का देणार? अवश्य द्याल आणि दिलाच पाहिजे! जो दुसऱ्याचें स्वत्व हरूं पाहतो, त्याचा चांगला समाचार घेतल्यानें ह्मणजे त्याला शिक्षा केल्यानें कोणीही दोषी होणार नाहीं. तसें नाहीं केलें तर मनुष्य वस्तीच टिकणें नाहीं. सरकार इतका बंदोबस्त कडक करतें — अपराध्यास दंडीतें तरी मनुष्य गुन्हे करण्यास चुकत नाहीं. मनुष्यें सुद्धां सरकारापर्यंत जाण्याचे पूर्वीं देखील कित्येक बंदोबस्त करतात, तरी गुन्हे होत नाहींत काय? आपलें कोणी कितीही कोणत्या ही प्रकारचें नुकसान केलें तरी आपण ह्मणून त्याला हूं कीं चूं सुद्धां करावयाचें नाहीं; बोलावयाचें सुद्धां नाहीं मग दुसरें तिसरें तर बघावयासच नको अशी परम साधुता धरून बसलें तर व्यवहार चालेल काय? जेव्हां प्रत्येक माणूस तसा साधु होईल तेव्हां अनीति कसली ती होणार नाहीं. पण अशी स्थिति कधीं तरी किंवा कोठें तरी झाल्याचें अथवा असल्याचें कोणीं ऐकलें पाहिलें आहे काय? पुराणादिकांत तरी काय— जिकडे तिकडे घोटाळाच—ह्मणजे नीतिमान व सदाचारी लोक फारच थोडे. माझ्यापेक्षां पुष्कळ वडील माणसें एथें आहेत तर अनीति करणारा मुळींच नव्हता असा एखादा काळ किंवा देश सांगा पाहूं. बापहो, चांगले विचार, चांगले आचार, चांगल्या कृति होण्याला चांगल्याचाच समागम पाहिजे. जरी गारगोटी आहे तरी पण ती कोंदणांत उत्तम कारागिरानें बसविली असतां तिला लोक हिरकणी मानतील. सदाचार संपन्न मनुष्याचे संगतीनें किंवा विद्वानाचा हात धरून चालल्यानें जाणाऱ्यास सदाचार संपन्न किंवा विद्वान मानतील. गवळ्याचे घरीं जाऊन दारू प्याला तरी दूध प्याला आणि कलालाचे घरीं जाउन दूध प्याला तरी दारू प्याला असेंच लोक मानतील कीं नाहीं! असें कां तर संगत व स्थान यांचाच तोगुण होय. चोराची संगत धरा चोरी करावीसे वाटेलच. बरें शिपायाची

लागत धरा, तुह्मास शिपायी होण्याची इच्छा सहजी होईल. तुमच्या गांवचे कांहीं लोक शिपायगिरी करतात कीं नाहीं? हो करतात. त्यांचा तो डामडौल त्यांची मिजास, त्यांचा मानपान वगैरे जे शिपायी नाहींत ते ज्यास्त ठेवतात कीं नाहीं! अहाहा! काय सांगावें! एका हातांत ढाल, एका हातांत तरवार धरली आहे, ती गरगर फिरवीत आहे, विजेसारखी चमकावीत आहे, दहावीस हातांवर सुद्धां कोणास फिरकूं देत नाहीं असा बहादर तुमच्या समोर असला तर तुह्मांस तसें आपण व्हावेंसें वाटेल कीं नाहीं? हो. शूराचें कर्म पाहून शूरासच तसें करावेंसें वाटेल. तागडी धरणाराला, किंवा भट्टभिक्षुकाला त्यापासून काय वाटणार! ह्मणजे ज्याचें जें पिढीजादें कसब तें त्यानें केलेंच पाहिजे. अद्बच करीन ह्मटल्यास होत नाहीं आणि होऊन ही उपयोग नाहीं, तर ज्याचें जें काम तेंच त्यानें करावें ह्मणजे ब्राह्मणाचें कर्म ब्राह्मणानीं, क्षत्रियांचें क्षत्रियांनीं याप्रमाणेंच सारें. हव्या त्या जातीनें हवा तो धंदा करीन ह्मटल्यास उपयोग नाहीं, आणि तसा करण्यास शास्त्राची आज्ञाही नाहीं. भले लोकहो, आतां सर्वांस शिपायी होववत नाहीं, बरें झाले तर लाभापेक्षां एकादेवेळीं हानी मात्र फार होईल. तुह्मां सर्वांसच ह्मटलें कीं शिपायाचें कसब शिका तर तें ही योग्य नाहीं; तर जे होतकरू शिपायांच्या कुळांतले आहेत असल्या लोकांनीं शिपायगिरी न करितां काय गुरें हांकावीं कीं नांगर धरावा? नाहीं. बरें न करावें तर काय करावें? शिपायगिरी शिकावयाला नको काय? किंवा एकादा शिकला तर त्याला ठेवणार कोण? बरें राहिलातर त्यास आपली कामगिरी गाजविण्याची संधि पाहिजे कीं नको? या सर्व गोष्टी खऱ्या आहेत. पण मी असें ह्मणतो, कीं बाजारांत जिन्नस आला ह्मणजे त्याला कोणीतरी गिऱ्हाईक मिळतेंच, पण अमुक एक तऱ्हेचा जिन्नस कोणीतरी खास घेणार झाल्या खेरीज जिन्नसच तयार करावयाचा नाहीं, असें ह्मणणें शहाणपणाचें होईल काय? गिऱ्हाईक जसें आयतेवेळेस तयार करतां येतें तसें जिनसाचें होईल काय? नाहीं. तसें कसब ही आयतेवेळीं यायचें नाहीं. पृथ्वी मोठी आहे व काळास अंत नाहीं, आणि गुणग्राही जगांत नाहींत असेंही नाहीं, तर कसब असलें पाहिजे. आपल्या वाडवडळांनीं जो धंदा चालविला तोच चालविला पाहिजे. होय, पणतो चालविण्याची वेळ कुठे आहे? त्या कसबास कोण विचारितें? तें गेलें मागचे मागें. ते राजे गेले, ते लोक गेले, तो काळ गेला, तेव्हां तें कसब ही गेलें. हल्लींची सगळी तऱ्हा निराळी—आमच्या लोकांची सुद्धां गरज फारशी उरली नाहीं मग कसबास कोण विचारतें? मोठा पंचहत्यारी सर्व कसबांत निपूण आहे, पण पोटास मिळत नाहीं तर काय उपयोग? अगोदर पोटोबा आणि मग विठोबा अशी ह्मणच आहे, असें कित्येक ह्मणतील. होय, हें त्यांचें ह्मणणें खरें असून मी कबूल करतों. आपल्या शिपायगिरीच्या कसबाचा तूर्त उपयोग नाहीं ह्मणजे त्याचे योगानें जर पोटास अगदीं मिळत नाहीं, तर फक्त निर्वाहा साठीं दुसरा कोणताही—

पण योग्य—धंदा करावा ह्मणजे हे पक्कें ध्यानांत धरलें पाहिजे कीं मी ज्या देशांत झालों त्याचा नांवलौकिक राखण्या करितां व तेंच आपलें खरें कर्तव्य कर्म आहे असें समजून तो धंदा अवश्य शिकलाच पाहिजे. कोणत्या वस्तूस केव्हां व कसा दर येईल याचा काय नेम आहे? दाणेवाले लोकांचें पाहाना. पुढें चांगला दर आल्यावर विकून नफा मिळवूं एरव्हीं विकावयाचें नाहीं असें ह्मणून बाळगून ठेवतात कीं नाहीं? आतां एखादे वेळेस भाव उतरल्यामुळें तोटा होईल, किंवा कदाचित् कांहीं आकस्मिक कारणानें सफाई बुडेल ह्मणून अथवा तसें झालें तरीं पुन: बाळगून ठेवीत नाहींत काय? चोरी केली ह्मणजे शिक्षा खचीत भोगावी लागते ह्मणून चोरांनीं आपलें कसब टाकलें आहे काय? बरें आपल्या कसबाची परीक्षा करणारा किंवा ती करून ही बाळगणारा आज नाहीं ह्मणून कसबच सोडावें का? घटकेंत काय होईल याचा भरंवसा आहे? नाहीं ह्मटलें तर आपण शंभर वर्षें जगणार आहों असें मानूनच सर्व कांहीं केलें पाहिजे. देह क्षणभंगूर आहे असें जरी सांगतात तरी त्याचा अर्थ निराळा—ह्मणजे जें कर्म करावयाचें मनांत येईल तें करण्यास अगदीं विलंब लावूं नको, कांकीं दुसऱ्या क्षणीं तुझी तीच बुद्धि राहील असा नेम नाहीं एवढाच हेतु—कीं लागलेंच करावें. नाहीं तर हीं घरें दारें, बागबगीचे, वतन वाड्या, बायकामुलें वगैरे सर्वांसच आज सोडावें असें होणार नाहीं काय? आज जो सुखी दिसतो तो उद्यां दु:खी, काल भीक मागत होता तो आज राज्यावर बसतो अशी स्थिति आपण पाहतों कीं नाहीं? समजा एक मोठा लाख्या सावकार आहे, त्याचे कांहीं पूर्वकर्मामुळें ह्मणा किंवा अनिष्ट ग्रहांमुळें ह्मणा घरावर दरवडा पडून किंवा सर्वस्वी अग्निनारायणानें जाळून भस्म केलें तर त्यास कितीवरें दु:ख होईल? ह्मणजे इतकेंच कीं सुख किंवा दु:ख आपणास केव्हां प्राप्त होईल याचा नियम नाहीं. आणि तें कोणाला कळतही नाहीं. तथापि मनुष्याचें काम एवढेंच कीं दु:ख न येण्यासाठीं व सुख होण्यासाठीं सदोदित हरएक यत्न करावा. तसेंच आपलें कसब तूर्त कांहीं उपयोगी नाहीं, जातो दिवस तो खरा, किंवा कसा जातो कोण जाणें या विवंचनेंत पडलेले लोकांनीं तसले विचार मनांततरी आणून कायउपयोग? असें कदाचित् वाटेल. कित्येक नव्हे पुष्कळ असें ही ह्मणणारे आहेत; पण बापहो, ही भ्रांति आहे. पहा; लोकांची चाल अशी आहे कीं नाहीं? कीं घराच्या जवळ विहीर खणावी, ह्मणजे असें ह्मणाना कीं पाण्याचा आश्रय जितका जवळ तितका करून राहावें. याचें कारण तरी हेंचना, कीं कदाचित् रातबेराती घरास आग लागली तर पाणी नजीक असेल तितकें बरें; कांकीं लौकर विझवितां येईल. पण आग लागावयाचीच नाहीं, असें कोणी खात्रीनें सांगू शकेल काय? बरें आग लागल्यावर विहीर खणून पाणी लागलें ह्मणजे त्यानें ती विझवूं ह्मणणारास तुह्मी काय ह्मणाल? अतिशय अडाणी व वेडा नाहीं का ह्मणणार? बरें घर जळून खाक झाल्यावर पाणी

आणलें तर उपयोग काय? या वरून पुढें कधींतरी ज्या वस्तूची आपणास गरज लागेल ती जतन करून ठेवणें हेंच मनुष्याचें शहाणपण होय. आणि बहुतेक व्यावहारिक गोष्टी याच धोरणावर चालतात. या गोष्टीस कदाचित् अपवाद आला—ह्मणजे पाणी नजीक असून ही घर जळून जातें —तर ही एकदेशीय व फारच क्वचित् घडणारी गोष्ट असल्यामुळें वरील नियमास बाध आणूं शकत नाहीं. कांहीं गोष्टी किंवा वस्तू आपल्या उपयोगी नाहीं पडल्या तर आपले मुलांबाळांच्या, आप्त लोकांच्या, इष्ट मित्रादिकांच्या तरी उपयोगी पडतील असें समजून देखील शहाणे लोक जतन करून ठेवतात. या प्रमाणेंच कसबाची गोष्ट आहे. बापाचा कित्ता मूल; गुरूचा शिष्य, आणि राजाचा प्रजा असा क्रमच आहे. तुमचीं मुलें तुमच्या वळणावर जाणार, तेव्हां तुह्मांलाच जर कांहीं मर्दुमकीचें कसब नसलें. तुमच्या आंगीं शौर्य, धैर्य, धाडस स्वदेशाभिमान वगैरे कांहींच नसेल तर मुलांस तें कोठून यावें? आणि तसें होत गेलें ह्मणजे सर्व लोक भागूबाई बनणार. आणि सध्यां काय अशीच स्थिति झाली आहे ह्मणण्यास फारशी हरकत नाहीं. आयते वेळेस जशी विहीर खणणें तसेंच आयते वेळेस—ह्मणजे दुसरा आपले आंगावर चालून आल्यावर— कसब शिकण्यास आरंभ करणें. ज्या मनुष्यास कोणतेंही कसब पुरें नाहीं तें काय कामाचें! आणि त्यास विचारतें तरी कोण? ते आहेनी नाहीं सारखेंच. हेच बाजीकुळकर्णी आहेत, यांस लिहिण्याचें कसब नसतें तर त्या ( कुळकर्ण्याचे ) कुळांतले असते तरी त्यांस कोणी ठेवतें काय? मिळून काय कीं कसब असलें पाहिजे, मग त्याचा उपयोग तात्काळ किंवा तादृश हो कीं नहो. हत्यार असलें तर कधींना कधीं तरी तें हातीं धरावेंसें वाटेल पण तें मुळींच नसलें तर वाटून तरी काय होणार? असो; मित्रहो, मीं तुह्मांस बराच वेळ त्रास दिला यामुळें कंटाळलां असाल या करितां जरी आणखी चार शब्द बोलावयाचे होते तरी तसें मला करतां येत नाहीं. ( बसतो )

बा०— अशीं भाषणें आह्मांस कधींच, ऐकण्यास मिळावयाचीं नाहींत व मिळालीं नाहींत. जों जों ऐकावें तों तों अधिकाधिकच इच्छा होते. आपल्या भाषणानें कोणास कंटाळा आलाच नाहीं, तर ऐकण्याचीच ज्यास्त उमेद आहे अशी हे सर्वांचे चेहरे साक्ष देत आहेत. कित्येकांची वृत्तितर आपल्या भाषणांत अगदीं गढून गेली आहे, व असा अलभ्य लाभ या सर्व मंडळीस आजपर्यंत झाला नाहीं, व पुढेंतरी होईल कीं नाहीं कोणजाणें! मेघवृष्टी जितकी होईल तितकी चांगलीच! कांहींकांचे मनावर आपले भाषणाचा बराच ठसा उठला असावासें दिसतें, यासाठीं आपली मर्जी असली किंवा नसली तरी आमची इच्छा तृप्त करण्या करितां आणखी कांहींतरी गोष्टी ऐकवाव्या, अशी सर्वांच्या तर्फे मी विनंति करितों.

शि०— ( हर्षानें ) मी आपणा सर्वांचा फार फार आभारी आहें. मी या आपले चिरंजिवा सारखाच आहें, यास्तव विनंति करण्याचें कारण नाहीं. आपआपले

काम धंदे सोडून व एक सारखें तिष्ठत बसून ऐकण्याचा त्रास प्रथमच्याच खेपेला मी आपणांस दिला,ह्मणून भाषण आटो-पलें. तथापि आणखी ऐकण्याची आपली बलवत्तर इच्छा असल्यामुळें मला हा फार-च मोठा मान मिळाला. सत्पुरुष हो, या तुमच्या शुश्रूषेनें मी मोठा धन्य आहें. ऐ-कण्याची इच्छा ज्यास मनापासून आहे व जो तसें ऐकून करतो त्यासच ऐकवावें. नाहींतर पालथ्या घागरीवर पाणी कि-तीही ओतलें तरी एक बिंदूही तींत शिरत नाहीं, आणि पाणी ओतणाराचे श्रम फुकट जातात. लक्षपूर्वक ऐकणारा असल्यानेंच सांगणाराचें सार्थक होतें. असे तुमच्या सारखे अपूर्व व हौसी श्रोते मिळाले असतां वक्ता चांगला पाहिजे होता, पण हा (मी) फारच अल्पमति आहे. असो; आपल्या परवानगी वरून ह्मणतों कीं वक्ता आणि श्रोते यांचें ऐक्य झालें तरच त्याची सार्थकता, नाहींतर व्यर्थ बडबड. "नळी फुंकिली सोनारें, इकडून तिकडे गेलें वारें" अशी अवस्था काय कामाची? तेणें करून दोघांस ही फायदा नाहीं.

सर्व०—— आपल्या बोलन्यान तरास कुनाला-च न्हाई, आनू आनीक आनीक ऐकूसच वाटतया तर आपन सांगाच.

बा०—— आपल्या बोलण्याचा ज्यास कंटाळा येईल, तो नीच, फारच अडाणी समजला पाहिजे. हे सर्व लोक जरी अशा कामांत अजाण आहेत, तरी त्यांना ऐकावेंसें वाटतें; मग समंजस किंवा ज्यांस अनु-लक्षन हें भाषण चाललें आहे त्यांच्या निवास तें किती प्रोत्साहन करीत आहे तें सांगवत नाहीं! हे आमचे प्रतापरावजी (विश्वासरावाचा मुलगा) तर आपल्या भाषणामृताचे घटाघट घोट गिळता हेत! यांची तृप्ति झाली नाहीं, तशीच इतरांची ही—तर चालूंद्या.

शि०—— (आनंदानें) शाबास शाबास! सज्जन व शूर लोकहो!! आजचा दिवस माझ्या हृदयांतून कधीं ही जावयाचा नाहीं. विजयादशमीचाच दिवस आहे असें मी तर निश्चयानें समजतों! तुमच्या सारखे ग्राहक मिळणारच नाहींत. या तुमच्या प्रतापरावाचें लक्ष एकसारखें माझ्या भाषणाकडे आहे, हें मी निःसंशय जाणतों, आणि असें ही मी खात्रीनें सांगू सकतों कीं त्याच्या नांवाप्रमाणेच तो कर-णी करील! (हें ऐकतांच प्रतापरावाचे अंगीं वीरश्री स्फुरण पावते तें पाहून सर्वा-स मोठें आश्चर्य वाटतें) कसें झालें तरी थोर नामांकित व शूर कुळांतला खरा!! ज्याला जो विषय मनापासून आवडतो, तो निघाला असतां त्यांत तो तल्लीन व्हायचाच! पहा, मंजुळ व मधुर ध्वनि ऐकला, कीं हरिण किंवा भुजंग लुब्ध व्हायचा. आतां माझे बोलण्यानें लोकांचें अंतःकरण तसें वेधायाचें नाहीं, कांकीं मला ज्ञान नाहीं, बोलण्याची तशी संवय नाहीं,वाक्चातुर्यादि गुण नाहींत कांहींच नाहीं. तथापि असें ह्मणण्यास चिंता नाहीं, कीं वेड्या मुलाचे मुखांतून कसे ही वेडे वांकडे, बोबडे व अनान्वित शब्द निघाले तरी त्याच्या सर्व आप्त स्नेही मंडळास तें गोड व कौतुक प्रदच होतात. तसें

तुह्मी हा जो मला मान देतां तो तुमच्या थोर स्वभावास योग्यच आहे. तुमच्या सारख्या थोर मनाच्या, दृढ निश्चयाच्या व एकवेळ आपला ह्मटल्यावर त्याच्या निवास जीव देणाऱ्या अशा लोकांनीं माझा अंगीकार करून मला "आपला" असें ह्मटलें तर याहून अधिक तें काय पाहिजे! असो; ऐका.आपलें बोलणें कसब असावें यावर चाललें होतें व तें असावें कीं नसावें याविषयीं पूर्वी थोडेंसें सांगितलें, तेवढ्यावरून ही असावें अशाविशीं सर्वांची खात्री झालीच असेल. आतां असून उपयोग काय? हें कोणी बहुधा ह्मणणारच नाहीं. येऊन जाउन राहिलें काय कीं तें दाखवावें कोणास व केव्हां एवढेंच कायतें.तर पहा—या तुमच्या गांवच्या आसपास रानांत पुष्कळ क्रूर जनावरें रहात असतील, व त्यांचे पासून नेहमीं तुम्हांस मोठा त्रास व उपद्रव होत असेल, आणि त्यांचे निवारण तुह्मी यथाशक्ति करीतही असाल, पण तें किती तुटपुंजीचें बरें! ससा, हरिण वगैरे पेक्षां कोल्हा, लांडगा, तरस यांचा उपद्रव मोठा व यांवर शस्त्र उचलणें धीराचें काम. पण यांहून आस्वल, डुकर, चिता, गेंडा, ढाण्यावाघ इत्यादिकांचें भय मोठेंना? तेव्हां असल्यांवर शस्त्र चालवून आपलें संरक्षण करणें मोठ्या धारिष्टाचें व कसबाचें काम आहे कीं नाहीं? खचीत आहे. जशीं जनावरें क्रूर आणि घातक आहेत तशींच मनुष्यें ही आहेत. जनावरें जशीं सरस निरस आहेत तशींच मनुष्यें ही आहेत. साधारण चोरापेक्षां हत्यारबंद चोरावर जाणें कठीण. आणि एकट्या दुकट्या पेक्षां दहापांचांवर याच प्रमाणे अधिक अधिक लोकांवर जाणें ज्यास्त ज्यास्त कठीण व धोक्याचें आहे. चोरादिकांपासून ही तुह्मास थोडासा तरी उपद्रव सोसावा लागत असेल,पण तुमच्या हातून त्यांचें व्हावें तसें पारिपत्य होतें काय? होतनसेल तर तें कांबरें? कीं आपलें संरक्षण करण्याजोगें शौर्य धैर्य, व शस्त्र कसब किंवा आंगबळ हीं किंवा यां पैकीं बरींच नाहींत ह्मणूनना? प्रत्येकव्यक्तीमध्यें या सर्व गोष्टी कमज्यास्त मानानें आहेतच. तथापि त्यांची जमात नसेल तर उपयोग काय? तुह्मा[illegible]मध्यें वरील सर्व गुण कमज्यास्त मानानें आहेत पण तुमची जूट नाहीं, आणि पन्नास साठ दरोडेखोर हत्यारबंद तुमचे गांवावर आले तर तुह्मी काय करणार? भिऊन लपून बसाल, नाहीं तर घर—दार—चीज वस्त किंवा बायकापोरें यांस देखील टाकून पळून जाल हेंच कीं नाहीं?पण पहा—जर तुमच्या गांवची एक जूट असेल व तुह्मी सारे एक दिलानें तुटून पडतां असें दिसेल तर दरोडेखोर लागलाच पोबारा नाहींका करणार? इतकेंच नव्हे पण तुमच्या गांवाकडे—तुमच्यापेक्षां ज्यास्त जमात असल्याविना— ढुंकूनसुद्ध पाहणार नाहींत! ह्मणजे जमात ही एक मोठी वर्णनीय गोष्ट आहे.मग ती थोडया लोकांची किंवा साधारण शक्तिमानांची कां असेना? पण ती एक दिलाची मात्र

पाहिजे- कीं एकावर जें संकट तेंच सर्वांवर—एकाचा जो लाभ किंवा हानि तीच सर्वांची—एकाचें बोट कापलें तर दुसऱ्यास कळ येणें—जें एकानें केलें तेंच सर्वांनीं—वेहेतर कीं एकाचा प्राण तेथें सर्वांचे प्राण— फूट ह्मणून व्हायची नाहीं—मग दुसरा मारो कीं सुळी देवो— फंद फितुराची वार्ता सुद्धां असतां कामा नये—अशी जूट असल्यावर, शूरलोकहो, दरोडेखोर नव्हे सरकार सुद्धां तुह्मांस भिऊन वागेल! अद्वा तद्वा किंवा अवाच्यासव्वा अथवा मनसोक्त कर बसवणें अथवा दुसऱ्या प्रकारची जुलूम जबरदस्ती करणें त्यास जडच जाईल. "आतां कसें— आज काय राखा जंगलें—पान तोडलें कीं करा दंड— शिक्षा; दोन माणसांनीं मिळून आणलें लांकूड कराजप्त; ज्याचे दारांतलें झाड त्यानें तोडतां नये—असले प्रकार जूट असल्यावर चालतील काय? हें आपलें एक उदाहरणार्थ सांगितलें. असे शेकडों अयोग्य कर व पट्ट्या आहेत.,, असो. मिळून इतकें खरें कीं जूट ही केवढी अजब गोष्ट आहे बरें! नाहींतर एकाचें तोंड पूर्वेस तर दुसऱ्याचें पश्चिमेस— आपलेकांत— नवरा बायकोंत—शेजाऱ्या शेजाऱ्यांत सातमाणसें आणि तेरा वांकडीं असलीं ह्मणजे एकादी हलकी रांड सुद्धां चोपण्यास कमी करणार नाहीं. " आणि हल्लीं आमच्यांत असेंच चाललें आहे ह्मणूनच ही आमची अशी दशा " मित्रहो, क्षमा करा; रागावूं नका. हा मी साधारण सिद्धांत सांगितला. असेंच तुमचें आहे असें माझें बिलकूल ह्मणणें नाहीं; ओढून ताणून आपल्या अंगावर घेऊन क्रोध कराल तर मी कोपरा पासून हात जोडून क्षमा मागतों. असो कोणतेंही एकादें काम करण्याचें त्या मंडळींनें मनांत आणिलें तर तें तावडतोब व सहजी होऊन जातें. द्रव्यबळ व मनुष्यबळ अशीं दोन बळें आहेत. त्यांत द्रव्यबळापेक्षां देखील मनुष्यबळ ज्यास्त होय. समजा, एकापाशीं लाखरुपये आहेत. पण कांहीं कारणानें त्याला मनुष्यें मिळत नाहींत, आणि त्याला घर बांधावयाचे आहे, तर तें त्यानें कसें बांधावें? नुसत्या पैशानें काय होणार? परंतु जूट असेल तर अल्प खर्चानें त्वरित काम उठतें. मुंग्या, मधमाशा वगैरे क्षुल्लक जिवांकडे दृष्टि द्या ह्मणजे जुटीचें महत्व तुमचे लक्षांत येईल. दहा पांच मनुष्यांची जमात एकेकट्या शंभरांस भारी; गांवचि जमात दहा पांच गांवास भारी; दहा वीस गांवाची जमात प्रांताला भारी; व दोन तीन प्रांतांची देशाला भारी होते. एकीचा ह्मणजे जुटीचा महिमा सांगतां येत नाहीं. पहावें, ती तेथें एक लांकडाची मोळी पडली आहे, तींत बारीक बारीक काटक्याच आहेत. पण ती मोळीच्या मोळी तुमच्यापैकीं कोणी एखादा मोडील असा जोरदार आहे काय? खचीतच नाहीं. परंतु तीच एक एक काटकी निराळी केली, कीं हां हां ह्मणतां सहज एका क्षणांत मोडील. कोणतें ही क्षुल्लक कां असेना—काम एकीनें तेव्हांच होतें. हें तर काय, पण ही तुमच्या समोरची टेकडी पहा—ती मोठी आहेना? ती जर अगदीं मुळासकट खणून साफ जमिनीबरोबर करण्याचें तुह्मीं सर्व गांव

कऱ्यांनीं मनांत आणून एकसारखा रात्रंदिवस धोशा लावला, तर तसें होण्यास कितीसा वेळ लागेल? टेकडीच्या पेक्षां डोंगर फारच मोठा आहेना? पण तो देखील फोडण्यास तुह्मीं तयार झालां तर यदा कदाचित् तुमच्या हयातींत नफुटला तर तोच क्रम चालल्यास तुमच्या मुलांबाळांच्या हातून फुटेल कीं नाहीं? तर यावरून काय सिद्ध होतें? एकी आणि दृढ निश्चय हीं दोन अवश्य असलीं ह्मणजे बस! शिवाय अवांतर साधनें हातींतच. एकी आहे—'कसब नाहीं; दोन्ही आहेत हत्यारादि सामग्री नाहीं तर काय होणार? हें सर्व जमलें—ह्मणजे एकी—कसब—सामग्री—नरीस्थळ पाहिजेना. त्यांचा उपयोग करण्यास! स्थळही सांपडलें आणि त्या सर्वांचा यथास्थित उपयोग होऊन त्यापासून महत्प्राप्ति झाली ह्मणजे कितीतरी आनंद होईल! प्रत्येकास किती धन्यता वाटेल! जन्मास आल्याचें सार्थक झालेंसें वाटेल. रानांतील यःकश्चित् जनावर ससा. हरिण. किंवा कोल्हा या सारखें मारून आणलें तर त्याला जो गर्व होतो त्यापेक्षां व्याघ्रादिकांवर जय मिळविल्यानें ज्यास्त कीं नाहीं? तसेंच साधारण मनुष्यापेक्षां हत्यारबंद चोरादिकांवर जो जय मिळेल, त्याहून आपल्या बरोबरीच्या, कसबी व जुटीच्या लोकांवर जय मिळाला असतां तो अधिक! खरेंना! अहाहा !! एकादा रणशूर रणांत जाऊन शत्रूचें मोठें सैन्य असतांही त्यांत घुसून आपल्या अद्भुत हस्तकौशल्यानें व युद्ध चातुर्यानें, आपल्या आंगावर शस्त्रप्रहार करणाऱ्यांचें कांहीं चालूं नदेतां त्यांच्या गर्दाना उडवून किंवा त्यांस पाडाव करून आणि शत्रूच्या सैन्याची दाणादाण करून व त्यांस पळवावयास लावून मिळालेल्या जयश्रीच्या योगें प्रसन्नांतःकरण होत्साता आपल्या समाजासह गांवीं परत येत असतां, हजारों लोक त्याला पाहण्यासाठीं उभे आहेत—सर्वांच्या मुखांतून जय घोष होत आहे—रणवाद्यें मोठ्यानीं धडकत आहेत— गांवच्या सुवासिनी स्त्रिया आरत्या ओवाळताहेत—इत्यादि अशा प्रकारचे थाटानें तो बहाद्दर शिपाई आपल्या घरीं आला तर त्याच्या आई बापांस, आप्तस्नेहादिकांस केवढा बरें आनंद होईल!! किंवा तो आपल्या धन्याकडे तसा सोहळा भोगीत भागीत गेल्यावर धन्यानें त्यास आपल्या हातानें शाबासकी देऊन जवळ बसवून घेतलें आणि त्याच्या कर्तबगारी प्रमाणें त्यास इनाम दिलें तर त्या सुखानंदापेक्षां काय बरें ज्यास्त आहे !!! अशा आपल्या बहाद्दर पुत्रास पाहून त्याच्या आईबापांस स्वर्ग देखील ठेंगणा होईल! सर्व लोक त्याची मोठी वाहवा करतील आणि जगभर त्याची कीर्ति पसरेल! मग यापेक्षां मनुष्य जन्मांत काय अधिक मिळवावयाचें आहे सांगा बरें !! शूर लोकहो, आतां या तुमच्या मंडळींत कित्येक चांगले होतकरू, तरुण, उमदे लोक आहेत. हे प्रतापराव आहेत— यांचें नांव आहे तेंचजर यांणीं खरें करून दाखविलें— आणि ईश्वरी संकेत तसाच असेल तर— यांस ( विश्वासरावास ) किती ह्मणून

आनंद होईल व धन्यता वाटेल !! मित्र हो, शेवटीं माझें तुह्मां सर्वांस सांगणें एवढेंच आहे, कीं जे मी दोनशब्द बोललों त्यांचा विचार करा, आणि जर नरें वाटेल तर त्यांचा अंगीकार करा. कदाचित् तुमचें सर्वांचें ऐक्य झालें व कसब शिकण्यास तयार झालांतर शिकवण्यास किंवा जे कसबांत तयार असतील अथवा होतील त्यांस बाळगणारा पाहिजे असेलतर तो ही मी तुह्मांस दाखवीन. ( असें ह्मणून बसतो )

( सर्व लोक आनंदानें टाळ्या वाजवितात )

ता०— एवढावेळ पर्यंत या शिवराजानें जें भाषण केलें त्याहून ज्यास्त मला कांहींच बोलावयाचें नाहीं, तथापि एक दोन शब्द सुचले आहेत तेवढे बोलल्या वांचून राहवत नाहीं ह्मणून——जरी सर्व लोकांस एथें बसून पुष्कळ वेळ झाला आहे तरी माफी मागून— बोलतों. मनुष्यानें कोणत्यातरी योगानें सर्व लोकांत प्रसिद्ध व्हावें, हें मनांत आणलें ह्मणजे दोन प्रकार दिसतात; एक चांगला व एक वाईट. वाईट मार्गानें गेलें असतां ही प्रसिद्ध होतो— उम्या रामोशी कोणास बरें माहित नाहीं? दुर्गुणांचे योगें अपकीर्ति होते व सग्दुणांचे योगें सत्कीर्ति होते. आणि या दोन्ही चिरकाळ राहणाऱ्या आहेत. सर्व लोक ज्याचें नांव आनंदानें व पूज्यबुद्धीनें आठवतात किंवा घेतात तो सत्कीर्तिमान् आणि ज्याचें नांव तिरस्कारानें व त्रासानें आठवतात तो अपकीर्तिमान् होय; भेद ह्मणून काय तो इतकाच—एकाचे योगें वंशास भूषण येतें व दुसऱ्याचे योगें दूषण लागतें. चोर चहाड वगैरे लोकांचे कोणी पवाडे गात नाहींत, पण शूर, सद्गुणी अशा लोकांचे पवाडे व बखरा नेहमीं गातात व वाचतात. राम रावणाकडे, पांडव कौरवांकडे दृष्टि द्या. लांब कशाला शिर्के मोहिते यांविषयीं—आणि त्यांचेच प्रतिस्पर्धी पहा——अथवा याचेच ( शिवाजीचे ) वंशाकडे पहा! ज्या कर्मांत जो पटाईत त्याला तत्कर्मशूर ह्मणतात. दानशूर रणशूर वगैरे ऐकले आहेतच. पैकीं दानशूरपणाचें काम फारच कठीण. रणशूरापेक्षांही त्याची पायरी वरची, तेव्हां तो प्रकार तूर्त मनांत आणतां कामानये. बळी सारखा, कर्णासारखा असेल त्यासच तें नांव शोभणार. ह्मटलें आहे कीं शंभरांत शूर एक, सहस्रामध्यें एक पंडित, दहा सहस्रांत वक्ता एक, पण लक्षांत देखील दाता होतो कीं नाहीं याची वानवाच!तर दानशूर हें नांव मिळवण्यास अतिशय अडचण. तर— मग दुसरा प्रकार सोपा असून तो साधण्यासारखा आहे. तोच साधण्याविषयीं प्रयत्न करावा हें बरें. त्याची योग्यता किती तें नुकतें सांगण्यांत आलेंच आहे.

वि०——आज तुह्मीं उभयतांनीं या गरीबाच्या घरीं येऊन जो अमृताचा वर्षाव केला, तो या सर्व मरणोन्मुखवत् हतवीर्य लोकांस ताजे तवाने व आपलें इष्ट कार्य साधण्याजोगे करण्यास कारण झाला, तर जेव्हां प्रसंग येईल तेव्हां याचा अनुभव येईल, याहून ज्यास्त बोलणें तूर्त योग्य होणार नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

शि०—खरें आहे. बोलण्या प्रमाणेंज्याचें चालणें तोच वंद्य. थोरांचें भाषण जें केलें तें खरेंच असतें. तानाजी, आपण यांस बराच वेळ बसविलें तर परवानगी घेऊन—

त्रि०—आपणा सर्वांचा मी फार फार आभारी आहें. हा मुलगा ( प्रतापराव ) आपले सेवेस अर्पिला आहे. या आमच्या कंकाचे योगानें आपलें दर्शन होऊन अलभ्य लाभ झाला. असा योग पुन: यावा हीच माझी मन:पूर्वक मनीषा आहे. ईश्वर करो आणि तो सुदिन येवो.

शि०— आपला वडिलांचा आशिर्वाद असलातर तसा दिवस येण्यास फार कालांतर लागणार नाहीं. असो; परवानगी मागतों.

( नंतर सर्व मंडळी त्यांस फार दूरपर्यंत पोहोंचवायास जातात व आलिंगनादिक होऊन परत येतात आणि शिवाजी वगैरे आपले गांवीं हर्षानें जातात )

---

**पंचम अंक समाप्त.**